
# शब्द रुची

एप्रिल २०१७
मूल्य १० रुपये
पृष्ठे ५२





डॉ. अनिल काकोडकर





शिल्पा खेर





डॉ. लतिका भानुशाली

'ग्रंथाली' आणि 'बुकगंगा' यांच्या संयुक्त विद्यमाने शिल्पा खेर लिखित 'यश म्हणजे काय?' आणि 'कामयाबी का मतलब? या मराठी व हिंदी पुस्तकाचे प्रकाशन झाले. त्यासमयी सुदेश हिंगलासपूरकर, जितेंद्र खेर, डॉ. पी.एस. रामाणी, डॉ. अनिल काकोडकर, लेखिका शिल्पा खेर, भरत दाभोळकर, डॉ. रवींद्र प्रभुदेसाई, बुकगंगाच्या सुप्रिया लिमये आणि डॉ. शुभा चिटणीस



छाया दातार लिखित 'तरीही शेषप्रश्न' या पुस्तक प्रकाशनसमयी जयश्री गोडसे लेखिका छाया दातार विद्या बाळ आणि संजीव खांडेकर



'शब्द रुची' महिलादिन विशेषांकाचे प्रकाशन ८ मार्च २०१७ रोजी झाले. त्या समयी जयश्री गोडसे, छाया दातार, विद्या बाळ, संजीव खांडेकर, शब्द रुची कार्यकारी संपादक डॉ. वीणा सानेकर आणि धनश्री धारप

विवेकशील विचार, व्यापक संवाद, कलात्म
जाण आणि सजग समाजभान अर्थात शब्दरुची

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची

एप्रिल २०१७, वर्ष चौथे
अंक बारावा, मूल्य १० रु.

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
कार्यकारी संपादक : **डॉ. वीणा सानेकर**
मुखपृष्ठ : **सतीश भावसार**

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे, अनिरुद्ध गद्रे**
granthaliruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com
**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल**

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी २५० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, तळमजला,
यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६ ☎ २४२१६०५०
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com

**ऑफिस वेळ : सकाळी १२ ते सायं. ६**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

४२ ग्रंथाली

## अनुक्रम

**अविस्मरणीय**
- 'स्मृतिचित्रा'तील लक्ष्मीबाई टिळक / २
  **नेहा किशोर सावंत**

**स्मरणवेळा**
- प्रा. पुरुषोत्तम पाटील यांची 'काव्य-रती' / ११
  **एकनाथ पगार**
- उत्कर्षा : उत्साहाची सळसळ / १७
  **प्रमोद लिमये**

- **कविता आणि मी** / २०
  **सत्यपालसिंग राजपूत**

**शिक्षणमंथन**
- आमचा अभ्यासगट / २२
  **प्रल्हाद काठोले**

**गौरव**
- वनव्रतस्थ मारुती चितमपल्ली / २८
  **प्रवीण बर्दापूरकर**

**निमित्त**
- इतिहासाच्या पाऊलखुणांचे संवर्धन / ३०
  **अरुण मळेकर**

**रंगस्वर**
- 'समाजस्वास्थ्य' समजावून घेताना / ३२
  **डॉ. अनंत देशमुख**

- निश्चलनीकरण : रिझर्व बँकेचा भोंगळ कारभार / ३४
  **डॉ. अनंत पां. लाभसेटवार**

- **ग्रंथाली पुस्तक प्रकाशन वृत्तांत** / ३८
- ग्रंथपाने – **मेहता पब्लिशिंग हाऊस, साधना प्रकाशन** / ४५
- ग्रंथाली ग्रंथपाने – **चांगदेव काळे** / ४७

## संपादकीय...

काही वर्षांपूर्वीची गोष्ट रात्री उशिराच्या एका कार्यक्रमाचे निवेदन होते. ठाणे स्टेशनवर पोहोचेपर्यंत रात्रीचे जवळपास सव्वाबारा. मी पुरुषांच्या डब्याजवळ गाडीची वाट पाहात उभी होते. दोन तरुण अचकट-विचकट बोलत आसपास घुटमळू लागले. गाडी अजून येत नव्हती. मी अस्वस्थ! इतक्यात कुठूनशी तीरासारखी एक तरुणी आली 'ब', 'भ' आणि 'ह' या मुळाक्षरांपासून सुरू होणाऱ्या शिव्यांची लाखोली वाहत तिने त्या तरुणांचा उद्धार करायला सुरुवात केली. माझा हात धरून तरातरा ओढतच तिने मला महिलांच्या डब्याकडे नेले आणि प्लॅटफॉर्मला नुकत्या लागत असलेल्या गाडीत बळेबळे चढवलेच. तिच्याकरता थांबलेली तिची मैत्रीणही डब्यात चढली. स्पष्ट आठवतंय, कुणीही पोलिसी वर्दी त्या डब्यात नव्हती. आत चढताच तिने माझी कडक हजेरी घेतली. ''तेरेकू क्या लगता है, साले मरद अकेली औरतकी रक्षा करेंगे? तुम जैसी लडकियोंपर मुझे हँसी आती है। अरे समझो, औरत कोही औरत का साथ देना पडेगा।'' माझा मध्यमवर्गीय मुखवटा ओढून काढत तिने मला बाईच्या जगण्याचा खरा धडा शिकवला.

त्या दोघी बारबाला होत्या. पुरुषांबाबतचे अनेक अनुभव त्या दिवशी आम्ही दिले-घेतले. तिच्या आणि माझ्या खूप वेगळ्या असलेल्या जगाच्या भिंती आपसुकच गळून पडल्या.

स्त्रियांच्या मोठ्या जगात वेगवेगळी छोटी-छोटी जगं आहेत. जातीपातीच्या चौकटींनी आणि वर्गीय सीमारेषांनी स्त्रियांच्या वेदनांची जातकुळी एक-बिक हेही धुडकावून लावलं आहे. खैरलांजी-कोपर्डीसारख्या घटनांच्या केंद्रस्थानी बलात्काराचा धागा समान असला तरी जातीय आधारावर स्त्रियांचे तट पडलेच. आर्थिक सुबत्ता असलेल्या अनेक स्त्रियांना 'एम्प्टीनेस' सतावतेय तर कष्टकरी बाईपाशी विसाव्याला एकही 'एम्प्टी' क्षण नाही.

कचरावेचक महिला, कोळसाखाणीत काम करणाऱ्या स्त्रिया, देवदासी, देहविक्रय करून पोट भरावं लागणाऱ्या स्त्रिया, रोजंदारीवर काम करणाऱ्या मजूर स्त्रिया, घरकाम करणाऱ्या स्त्रिया अशा कितीतरी स्त्रिया गरिबीशी-आयुष्याशी टक्कर देत जगताहेत. त्यांच्या जगाशी उच्चभ्रू वर्गातील स्त्रियांचा किती संबंध आहे? उच्चजातीय-उच्चवर्णीय स्त्रिया समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेत सामील होतील असे ज्योतिबा फुलेंना वाटले होते, ते कितपत खरे झाले? आणि थोडं आणखी पुढे जाऊन बोलायचे तर स्त्रियांच्या साहित्यातून वंचित-शोषित स्त्रियांच्या दुःखाचे किती पोत उलगडले गेले? आपल्या भावविश्वापलीकडे जाऊन दलित-वंचित स्त्रियांचे दुःख किती स्त्रीवाचकांनी समजून घेतले?

अलीकडे एका परिसंवादातील स्त्रीसाहित्यावरील सत्रात दूरदर्शन वलयांकित एक वक्त्या म्हणाल्या, ''दलित स्त्रियांचे लेखन मी फारसे वाचलेले नाही.'' संबंध मराठी साहित्याचा प्रवास आमूलाग्र बदलून टाकणारी दलित स्त्री आत्मकथनं-कविता वगळून स्त्रीसाहित्याचा आलेख कसा काय समजून घेता येईल? आपल्या वर्गाची झूल घालूनच साहित्याचा इतिहास मांडायचं ठरवलं तर तो कायम एकांगीच राहणार.

नासिरुद्दीन शहांच्या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात स्वतःच्या आयुष्यातील आकाशवाणीच्या दिवसांची 'सय' काढताना एका ज्येष्ठ दिग्दर्शिकेने आकाशवाणीतील विठाबाई नारायणगावकरांच्या कार्यक्रमाबाबत सांगताना 'अंगविक्षेप' हा शब्द वापरावा आणि त्यावेळी त्यांच्या सुरांतून कलावंत या नात्याने विठाबाईविषयी किंचितही आदर व्यक्त होऊ नये याचे विलक्षण आश्चर्य वाटले होते. भल्याभल्यांना आपल्या वर्गीय झुली विसरता येत नाहीत हेच खरे!

स्त्रियांची जगं अशी सुटी-सुटी राहिल्याने एकूण स्त्री चळवळीचं देखील नुकसान झालं, असाही विचार मनात येतो. अर्थात तोही नवा नाही. याविषयी विविध अंगांनी मांडणी होत राहिलेलीच आहे.

आज 'जेन्डर स्टडीज'वर लक्ष केंद्रित करून विद्यापीठांमध्ये स्वतंत्र विभाग आणि स्त्री-अभ्यासकेंद्राची उभारणी झाली आहे. संशोधन प्रकल्प, परिसंवाद, चर्चासत्रं या सर्वांनी ठिकठिकाणच्या केंद्रांचे वातावरण गजबजलेले आहे. जग बदलण्याची तात्त्विक मांडणी या विद्यापीठीय जगातून होते आहे; पण या जगाची भाषा तळागाळातल्या बाईला किती कळते? आणि तळागाळातल्या बाईचे मन 'सॉफिस्टिकेटेड' महिला विश्वाला किती उमगते?

संथाळ आदिवासी कुटुंबात जन्मलेल्या निर्मला पुतुल

यांची एक कविता आहे. जागतिक महिला दिनानिमित्त एका मोठ्या सभागृहात गरीब आदिवासी स्त्रियांची गर्दी जमवलेली आहे आणि या गर्दीचे नेतृत्व उच्चविद्याविभूषित स्त्रिया करीत आहेत. त्या व्यासपीठावर विराजमान... माईकवरून व्यवस्थेच्या विरोधात जोरजोरात भाषणे देताहेत. समोर बसलेल्या आदिवासी बायांच्या टाळ्या घेताहेत. या बायांना ठाऊक आहे. पुन्हा चर्चांच्या गरम वाफा शिजतील. हुंडाबळी, बलात्कार, वेश्यांचे लैंगिक शोषण यांच्याविरुद्ध मोर्चे काढण्याची संकल्प केले जातील. मात्र यातून खरोखर हाती काय लागेल याविषयी त्यांच्या मनात शंका आहे. कवयित्री निर्मला पुतुल म्हणते,

''पुन्हा एकदा शब्दांच्या उडत्या गालिच्यावर बसवून
त्या आम्हाला संसदेत घेऊन जातील
जिथे पुरुषांच्या अहंकाराशी टक्कर होईल आमच्या मुद्यांचीआणि तुकडे-तुकडे होतील आमची स्वप्नं!''

या महिलादिनी 'ग्रंथाली'तर्फे छाया दातारांचे 'तरीही शेषप्रश्न?' प्रकाशित झाले. तेव्हा विद्या बाळ यांनी दलित स्त्रियांच्या प्रश्नांबाबतचे खूपसे काम राहून गेल्याचा उल्लेख केला आणि स्त्रीचळवळीच्या वाटचालीत पडत गेलेले अंतर दोन्ही बाजूंनी मिटवले गेले पाहिजे हेही नोंदवले. विद्याताईंचा हा उच्चार महत्त्वाचा वाटतो. स्त्रियांची जगं आता जवळ आली पाहिजेत.


सुहृद वाचकहो, या अंकाबाबतचे आपले अभिप्राय जरूर कळवा. 'शब्द रुची'चा प्रत्येक अंक परिपूर्ण असावा म्हणून 'ग्रंथाली' टीम परिश्रमपूर्वक झटत असते.

ज्ञानाने समाज समृद्ध करणाऱ्या माणसांची आठवण अक्षय सोबत राहते. शिक्षणतज्ज्ञ आणि समाजशास्त्राचे गाढे अभ्यासक डॉ. द.ना. धनागरे सर, पत्रकारितेच्या विश्वावर आपली नाममुद्रा उमटवणारे गोविंदराव तळवलकर आणि 'ग्रंथाली' परिवारातील लेखक, निर्माते, दिग्दर्शक 'सरकारनामा'कार अजेय झणकर यांना भावपूर्ण आदरांजली!

– डॉ. वीणा सानेकर
भ्रमणध्वनी : ९८१९३५८४५६
veenasanekar1966@gmail.com

ग्रंथाली


शब्द रुची


पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, बुलन मिल म्युनिसिपल स्कूल,
तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६ ☎ २४२१६०५०
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com

वार्षिक वर्गणी २५० रुपये








# 'स्मृतिचित्रा'तील लक्ष्मीबाई

नेहा किशोर सावंत

एखाद शिल्प जसं मनात ठसून राहावं तसंच या 'स्मृतिचित्रा'बाबत झालं. अध्ययन व अध्यापनाच्या क्षेत्रात आल्यावर विद्यार्थ्यांना शिकवण्याच्या दृष्टीने पुन्हा पुन्हा 'स्मृतिचित्रे' वाचलं गेलं. प्रत्येकवेळी या साहित्यकृतीबाबत नवनवीन आयाम सापडत गेले.

> रमाबाई रानडे यांनी लिहिलेल्या 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी'च्या रूपाने मराठीत पतीपत्नी यांच्या सहजीवनाच्या आठवणी रेखाटण्याची परंपरा निर्माण झाली. या परंपरेतील लक्ष्मीबाई टिळक यांचे 'स्मृतिचित्रे' आज ऐंशी वर्षानंतरही अविस्मरणीय ठरते ते त्या काळातही त्यातून व्यक्त झालेल्या आत्मभानामुळे!

एकाच वेळी चरित्रात्मक साहित्यकृती व आत्मचरित्रात्मक साहित्यकृती असे दोन पैलू 'स्मृतिचित्रात' ठळकपणे दिसून येतात. चरित्रात्मक साहित्यकृतीसाठी आवश्यक असणारी तटस्थता व अवलोकनशक्ती तर दुसरीकडे आत्मचरित्रात्मक साहित्यकृतीसाठी आवश्यक असणारी तादात्म्यता, तटस्थता, प्रांजळपणा व प्रामाणिकपणा हे गुणधर्म हे या साहित्यकृतीचे सामर्थ्य म्हणावे लागेल. या साहित्यकृतीचे शीर्षक 'स्मृतिचित्रे' असले तरी यात केवळ आठवणींची एकामागून एक अशी चित्रे साकारलेली नाहीत. तर त्यात चरित्रनायक/नायिकेचा सलग असा व्यक्तिमत्त्व विकासही दिसून येतो. कधी सुटेसुटेपणाने जगताना तर कधी पतीपत्नी म्हणून सहजीवन जगताना एकमेकांच्या सान्निध्यात तर कधी एकमेकांशिवाय जगताना येणाऱ्या प्रसंगांना तोंड देताना, स्वत:ला घडवण्याचा अथक प्रवास दोघांनी केला आहे, त्याचा लेखाजोखा या आत्मचरित्रात अत्यंत परखड व प्रांजळपणे मांडलेला दिसतो.

मराठी वाङ्मयेतिहासात आत्मचरित्रांची परंपरा जर पाहिली तर रमाबाई रानडे यांनी लिहिलेले 'आमच्या आयुष्यातील आठवणी' हे इ.स. १९१० मध्ये लिहिलेले आत्मचरित्र पहिले म्हणता येईल. त्यानंतर २४ वर्षांनी म्हणजेच १९३४ साली लक्ष्मीबाई टिळकांचे 'स्मृतिचित्रे' प्रसिद्ध झाले. एका अशिक्षित, निरक्षर स्त्रीने केवळ अक्षरओळख करून घेऊन, स्वत:ला साक्षर केले आणि हा अमूल्य ठेवा लिहून ठेवला यावर विश्वासच बसत नाही. लेखनाचे कोणतेही शिक्षण नसताना, पूर्वसंस्कार नसताना उपजत असलेल्या प्रतिभेच्या जोरावर तिने लेखिकेपासून विदुषीपर्यंत मजल गाठली. हा सारा प्रवास थक्क करणाराच आहे. या स्मृतिचित्रांची रचना करताना 'आत्मचरित्र' लिहिण्याचा लक्ष्मीबाईंचा हेतू अजिबात दिसत नाही. तर अखेरच्या क्षणी रेव्ह. टिळकांनी म्हटल्याप्रमाणे- ''माझे चरित्र लिहायचे असेल तर घडले तसे लिहा.'' या पतीच्या आज्ञेला जागून, त्यांनी लेखन केलेले दिसते. आपण पतीचे चरित्र कथन करीत आहोत ही जाणीव लक्ष्मीबाई विसरलेल्या नाहीत. म्हणूनच यात आत्मप्रौढी दिसत नाही. जे घडले, जसे घडले तसेच सांगण्याच्या शैलीमुळे त्यात सच्चेपणा, संयम व संयतपणा तसेच साधेपणा अवतरलेला दिसतो. म्हणूनच ही 'स्मृतिचित्रे' वाचकाला आपलंसं करून घेतात.

'स्मृतिचित्रे' या ग्रंथाची रचना चार भागात झालेली आहे. पहिल्या भागात टिळकांची व लक्ष्मीबाईंची बालपणाची हकिकत ते टिळकांच्या बाप्तिस्म्याची हकिकत (धर्मांतर) दुसऱ्या भागात टिळकांनी केलेल्या धर्मांतरामुळे कुटुंबात उडालेला हाहाकार, लक्ष्मीबाईंचा आंतरिक संघर्ष ते लक्ष्मीबाईंचा बाप्तिस्मा असा दिङ्मूढ करणारा प्रवास रेखाटला आहे. तिसऱ्या भागात टिळकांची प्रचंड वाङ्मयसेवा, ख्रिस्तसेवा, मित्रपरिवाराच्या आठवणी, समाजप्रबोधनात्मक कार्य ते रेव्ह. टिळकांचा मृत्यू अशा घटना मांडल्या आहेत. हा सारा भाग एकीकडे उद्‌बोधक तर दुसरीकडे हृदयद्रावकही आहे. चौथा भाग हा पूर्णपणे लक्ष्मीबाईंनी लिहिलेला नसून काही भाग त्यांच्या चिरंजीवांनी म्हणजेच देवदत्त टिळकांनी लिहिला आहे. यात लक्ष्मीबाईंच्या जीवनाचा उत्तरार्ध व अखेरचा भाग टिपला आहे. 'एका सुपुत्राने लिहिलेले मातेचे चरित्र' असेही या भागाला म्हणता येईल. मातेच्या जीवनाची किंवा व्यक्तिमत्त्वाची त्याला जाणवलेली वेगळी बाजू यात चित्रित झाली आहे. (लेखनात आत्मप्रौढी असू नये या जाणिवेमुळे जो भाग लक्ष्मीबाईंनी टाळला तो देवदत्त टिळकांनी अतिशय प्रामाणिकपणे व मूळ लेखनशैलीला धक्का न लावता लिहिला आहे हे विशेष)

आपल्या व रेव्ह. टिळकांच्या आयुष्यातील आठवणींचे कथन करीत असल्याचे भान लक्ष्मीबाईंनी पूर्णपणे राखलेले दिसते, म्हणून 'आठवणींच्या चित्रांची मनोवेधक साहित्यकृती' लिहिताना त्यांनी शीर्षकही वेधक व अर्थपूर्ण निवडले आहे - 'स्मृतिचित्रे'! म्हटलं तर या आठवणी सुट्या सुट्या आहेत, पण त्यात एक अंतर्गत व कालानुक्रमेही सुसंगती, घटनासंगती राखलेली दिसते. प्रत्येक आठवणींना स्वतंत्र बोलके शीर्षक देण्याची योजनाही कौतुकास्पद आहे. लक्ष्मीबाईंच्या स्मरणशक्तीचे, अवलोकनशक्तीचे व लेखनशैलीचे दर्शन यातून वाचकाला होते.

स्मृतिचित्रे वाचत असताना लक्ष्मीबाईंच्या वेगवेगळ्या भूमिका ठळकपणे जाणवतात. 'सोवळे' झालेल्या कर्मठ बापाची लेक, भिकूताईची लाघवी बहीण, टिळकांची पत्नी, कडक शिस्तीच्या सासऱ्यांची सून, देवदत्ताप्रमाणेच इतर निराधार मुलांची आई, ख्रिस्तसेविका ते लेखकपत्नी आणि लेखिका अशा विविध भूमिकांतून त्यांचे सच्चेपण निखळपणे जाणवत राहते. जो सच्चेपणा, निर्मळपणा लक्ष्मीबाईंच्या स्वभावात आहे तोच त्यांच्या लेखनशैलीतूनही वारंवार जाणवत राहतो हे या ग्रंथाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. 'स्मृतिचित्रे' लिहिताना किती तटस्थता, अलिप्तता राखायची व किती तदाकार तादात्म्य साधायचे याचे विलक्षण भान लक्ष्मीबाईंना आहे. अनेकदा आत्मचरित्र लिहिताना स्वत:बद्दल विशेष न सांगता पतीचा गुणगौरव करायचा किंवा पतीबद्दल लिहिताना स्वत:बद्दलच अधिक सांगायचे असा दोष मोठमोठ्या लेखिकांच्या लेखनात जाणवतो. परंतु 'स्मृतिचित्रे'मध्ये असे दिसत नाही. स्वत:च्या कौतुकापेक्षा स्वत:तील दोष, वैगुण्य लक्ष्मीबाई अतिशय खेळीमेळीत व मिश्कीलपणे सांगतात. स्वत:चे वर्णन त्या नेमकेपणाने करताना म्हणतात, 'मी मनाने जिवट व शरीराने चिवट आहे' - या विधानाचा प्रत्यय 'स्मृतिचित्रे' वाचताना वारंवार येत राहतो.

बालपणी बाहुल्यांशी खेळणारी, लग्नानंतरही काही काळ बाहुल्यांशी खेळणारी लक्ष्मीबाई, कडक सोवळ्याच्या वडिलांच्या कचाट्यात सापडलेली लक्ष्मीबाई तर लग्नानंतर शिस्तबद्ध, तऱ्हेवाईक मामंजींच्या स्वभावाशी तितक्याच खमकेपणाने टक्कर देणारी लक्ष्मीबाई, पती अभ्यास घेत असता उगीच हसत राहणारी लक्ष्मीबाई तर दुसरीकडे पतीच्या धर्मांतराने मनोमन खचलेली, पिचलेली तरीही पतीवर जिवापाड प्रेम करणारी, श्रद्धा ठेवणारी लक्ष्मीबाई अशी विविध रूपं वाचकाला भावणारी आहेत.

बऱ्याचदा स्त्रियांचे आत्मकथन हे 'स्व-कथना'पेक्षा पती गुणगायनाचे किंवा पतीचे दोष चव्हाट्यावर आणणारे किंबहुना आपले घर व कुटुंब यांचीच कहाणी सांगण्यापुरते मर्यादित असते. इथे तसे दिसत नाही.

पतीच्या आयुष्यात घडणाऱ्या घडामोडींच्या त्या केवळ साक्षीदार नसून बरोबरीच्या वाटेकरीही आहेत. शिवाय त्यांचे जीवन सर्वार्थाने एकरूप असल्यामुळे खऱ्या अर्थाने उभयतांचे सहजीवन रंगविण्यात लक्ष्मीबाई यशस्वी झाल्या आहेत. आंधळेपणाने पतीच्या वागण्या-बोलण्याचे त्या अनुकरण करीत नाहीत तर बुद्धीला आणि तर्काला पटलेल्या गोष्टी त्या आचरणात आणतात. म्हणूनच कट्टर धर्माभिमानी असणाऱ्या लक्ष्मीबाई पतीच्या धर्मांतराने आतल्या आत धुमसत राहतात, पण शेवटी बहीण, मेहुणे, आप्तेष्ट यांच्याशी संघर्ष करून पतीच्या धर्मांतरामागचा तर्कविचार समजून स्वत:ही ठामपणे धर्मांतर करतात. हे केवळ पतिनिष्ठा किंवा पतीप्रेमामुळे घडत नाही, तर विद्वान पतीच्या साहचर्यामुळे आणि डोळस जाणिवेमुळे घडते. या साऱ्या प्रकरणातून लक्ष्मीबाईंचा व्यक्तिमत्त्वविकास घडत गेल्याचे अधोरेखित होताना दिसते.

स्वत:च्या गुणावदोषांकडे पाहण्याची लक्ष्मीबाईंची सडेतोड व समंजसवृत्ती या आत्मचरित्रात ठायी ठायी दिसून येते. नेमक्या व परखड शब्दात त्यांचे आत्मपरीक्षण दिसून येते. उदा. १) ''मी जी काही आहे ती टिळकांमुळेच. टिळकांनी आपली ध्येये ठरवावी, मी डोळे झाकून ती आचरणात आणावी... मला त्यांची ध्येये पटवून घेण्यास अवसर मिळाला की मग मात्र आमचे गाडे सुरळीत चाले.''

२) आमच्यात जे खटके उडत ते जेव्हा जेव्हा मला त्यांच्या प्रगतीचा वेग सहन होत नसे तेव्हा तेव्हा.' या विधानांतून लक्ष्मीबाईंची स्वत:कडे पाहण्याची दुय्यमत्वाची जाणीव, नवऱ्याबद्दलची आदराची भावना दिसून येतेच, पण आपल्यातला दोष मोकळेपणाने सांगण्याची सडेतोड आणि निर्मळ वृत्तीही दिसून येते.

स्वत:च्या न्यूनत्वाकडे खिलाडूवृत्तीने पाहण्याचा त्यांचा स्वभाव अनेक ठिकाणी जाणवत राहतो.

उदा.- मुंबई येथे घडलेल्या एका भयंकर प्रसंगाच्या निमित्ताने दोषी म्हणून लक्ष्मीबाईंना कोर्टात उभे राहावे लागते, मानसिक धक्क्याने त्यांची मान थरथरू लागते त्याचे वर्णनही त्या अत्यंत खिलाडूपणाने करतात, ''जणू काय लक्षुंबाई डेराच घुसळण्यास उभ्या आहेत. सर्व अंग हालते आहे. पाठीवर मोकळे केस लोळत आहेत. पुढे कठड्यावर मान आपटत आहे. आता उद कापराचाच उशीर, की हे वारे लागणार बोलायला''- स्वत:कडे पाहण्याची लक्ष्मीबाईंची इतकी खिलाडूवृत्ती, विनोदीवृत्ती वाचकाला थक्क करून सोडते. लक्ष्मीबाईंचा मूळचा स्वभावच मिश्कीली करण्याचा, थट्टा करण्याचा असल्यामुळे प्रसंगी स्वत:च्या दोषांकडेही त्या खेळकरपणे पाहतात. तर कधी चिडक्या नवऱ्याशी खिलाडू आणि खेळकरवृत्तीने जुळवून घेताना समाजासमोर नातेसंबंधांतील एक आदर्श वस्तुपाठच घालून देतात.

एकदा टिळक पतीपत्नी दोघंही सोंगट्या खेळत असताना टिळकांचा डाव त्यांच्या अंगावरच उलटायचा ते पाहून लक्ष्मीबाईंना हसू आवरायचे नाही. त्यांचे हसू पाहून टिळकांचा पारा चढत असे. या प्रसंगाचे अतिशय मनोज्ञ वर्णन लक्ष्मीबाई करतात. त्यातून त्या दोघांच्या स्वभावातील विसंगती रेखाटतातच. शिवाय नवऱ्याच्या

स्वभावातील दोष फार स्पष्टपणे पण तितक्याच विनोदी वृत्तीतून, गंमतीदारपणे सांगतात. यातून लक्ष्मीबाईंची सहनशीलवृत्ती दिसून येते.

उदा. – 'सोंगट्या, पट, फांसे थरथर कापूं लागली.... सगळ्या समाजाने बंड पुकारले.... जागच्या जागी काय राहिले असेल तर ते फक्त दिवा आणि बायको. ...आता युद्धकांडातील शेवटला भाग! जिन्याला नव्हते दार! टिळकांनी मला अंधारात लोटले. मी जिन्यातून 'घालीन लोटांगण वंदीन चरण' करीत खाली तबकडीत येऊन पडले. टिळकांचा राग पळाला व माझे हास्य निमाले. ....विद्यानंदाचे वेळी मला तो सातवा महिना होता.'

एक स्त्री म्हणून, पत्नी म्हणून त्या जितक्या सोशिक सहनशील आहेत तितक्याच त्या निर्भीड व बंडखोर असल्याचेही अनेक प्रसंगांतून दिसून येते. वेळप्रसंगी मामंजींना आणि स्वत:च्या नवऱ्यालाही त्यांचे दोष स्पष्टपणे दाखवून देऊन, खणखणीत प्रत्युत्तर देण्याचा परखड स्वभाव अनेक प्रसंगांतून दिसून येतो. आयुष्यात अनेक बिकट प्रसंग आले अशा संकटकाळी त्या अतिशय धैर्याने व आत्मविश्वासाने त्यांना सामोऱ्या जातात. टिळकांच्या धर्मांतरानंतरची त्यांची घालमेल, मानसिक कोंडमारा, परिस्थितीशी व नातलगांशी संघर्ष करूनही आपला बाणा टिकवून ठेवतात. लाचारीचे प्रसंग येऊनही त्या खचून जात नाहीत तर एकट्या मुलाला घेऊन स्वाभिमानाने जगतात. अशा बिकट आणि खडतर प्रसंगांमुळे लक्ष्मीबाईंकडे एकप्रकारचे व्यावहारिक शहाणपण आले होते, जे टिळकांच्या स्वभावात अजिबात नव्हते त्याविषयी त्या नेमकेपणाने सांगतात, 'टिळकांचा वाटेल त्या माणसावर विश्वास बसे.' 'टिळकांच्या ह्या सद्‌गुणाला त्यांच्याच सहवासामुळे माझ्या संशयवृत्तीचा ब्रेक उत्पन्न झाला होता. त्यांचा एखाद्या माणसावर विश्वास बसला की माझा हटकून त्याच्यावर अविश्वास ठेवलेला! ह्यावरून आमचे नेहमी खटके उडायचे' – दोघांच्या स्वभावातील ही विसंगती त्या स्पष्टपणे सांगतात.

स्मृतिचित्रे वाचताना लक्ष्मीबाईंच्या स्वभावातील आणखी एक ठळक विशेष जाणवतो तो म्हणजे तत्कालीन सामाजिक स्थितीचे भान त्यांना आहे. टिळकांसोबत त्यांचे जिथे जिथे स्थलांतर झाले अशा सगळ्या परिसरातील सामाजिक, सांस्कृतिक परिस्थितीचे चित्र त्या रेखाटतात. इतकेच नाही तर न पटणाऱ्या सामाजिक रूढींविरुद्ध बंडही पुकारतात.

उदा.– ''दुसऱ्या दिवशी सकाळी टिळक नाटकाहून आले. दुसरा मुलगा पाहून त्यांना आनंद झाला. त्यांनी जलालपुरास तार करून आत्याबाईंना कळवले. तिकडे बाळंतिणीला तीन दिवस काही खायला देत नाहीत. आणि मुलाच्या पोटावर शंभर चोचे मारतात, पण ह्या चालीविरुद्ध मी बंड पुकारले. आनंदीबाईंकडून दोन पोळ्या घेऊन मी त्या गपचूप खाल्ल्या.''

एकीकडे असा बंडखोरपणा तर दुसरीकडे त्यांच्यावर असलेला पारंपरिक, जुन्या संस्कारांचा पगडा त्या प्रामाणिकपणे मान्य करतात. धर्मांतर केलेल्या टिळकांनी पुन्हा एकदा जातीत परत यावे म्हणून विविध व्रतवैकल्ये केल्याचे निवेदन प्रामाणिकपणे करतात.

स्वत:चा आत्मविकास करण्याच्या दृष्टीने लक्ष्मीबाई प्रयत्नपूर्वक कष्ट घेताना दिसतात. आत्मनिर्भर होण्यासाठी त्या कधी नर्सिंगचे काम शिकून घेतात, कधी टिळकांकडून कीर्तन कसे करायचे हे शिकून घेतात, मुलांकडून इंग्रजी शिकून घेतात, मेट्रनचे काम शिकतात. टिळकांच्या मृत्यूनंतर त्यांना आलेले आत्मभान हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील एक ठळक विशेष दिसून येतो. स्वत:चे अस्तित्व त्यांना जाणवू लागते. अशावेळी व्यक्त होण्यासाठी त्या 'कविता' हे माध्यम निवडतात. (स्वत:च्या कविता आत्मचरित्रात उद्‌धृत करणे टाळले आहे. येथे त्यांची प्रसिद्धिपराङ्‌मुख व संयमीवृत्ती दिसते.)

पतिनिधनानंतर समाजसेवा आणि ख्रिस्तसेवा यात त्या आयुष्याची इतिकर्तव्यता मानतात. तर दुसरीकडे कौटुंबिक जबाबदारीही शेवटपर्यंत पार पाडतात. अशा तऱ्हेने त्यांच्या व्यक्तिमत्त्वविकासाचे अनेक पैलू अधोरेखित होतात.

'स्मृतिचित्रां'मधून एक व्यक्ती म्हणून लक्ष्मीबाई जितक्या वैविध्यपूर्ण कंगोऱ्यांसह उभ्या राहतात तितक्याच लेखिका म्हणूनही त्यांचे वेगळेपण ठळकपणे जाणवते.

लक्ष्मीबाईंच्या या अचाट कर्तृत्वाचे वर्णन डॉ. सरोजिनी वैद्य यांनी नेमक्या शब्दात केले आहे. त्या असे म्हणतात, 'आपण कलाकृती निर्माण करीत आहोत ही जाणीव नसलेल्या लेखिकेच्या लिखाणात जेव्हा उच्च दर्जाचे आणि विविध प्रकारचे कलागुण प्रकटतात तेव्हा त्याचे श्रेय त्या लेखिकेच्या व्यक्तिमत्त्वातील जन्मजात अशाच काही शक्तींना द्यावे लागते. त्या जन्मजात शक्तीच्या बीजांचा विकास एक व्यक्ती म्हणून त्यांच्या वाट्याला आलेल्या दैनंदिन जगण्यातून होत गेला असला पाहिजे, पुस्तकी शिक्षणातून, वाचनातून तो होत नाही.'

लक्ष्मीबाईंना लहानपणापासूनच गोष्टी ऐकण्याचा व सांगण्याचा जो छंद आहे त्याचा अवलंब उत्स्फूर्तपणे या लेखनातून दिसून येतो. इतकेच नव्हे तर नकला करण्याचा स्वभावही या लेखनाला पूरक ठरलेला दिसतो. म्हणूनच बोलीभाषेचे विविध पैलू या आत्मचरित्रात सहज दिसतात. उदा. – मिशनऱ्यांची भाषा, भंगिणीची भाषा, ब्राह्मणी भाषा, ब्राह्मणेतरांची भाषा यांची योजना हेतुपूर्वक व कौशल्याने केलेली दिसते. केवळ चमत्कृतीसाठी किंवा कसब दाखवण्याच्या हेतूने ती केलेली दिसत नाही. या वैविध्यपूर्ण बोलींच्या उपयोजनातून लक्ष्मीबाईंचे सूक्ष्मावलोकन व बहुश्रुतता दिसून येते.

उदा.– नळावर पाणी भरताना एका स्त्रीने लक्ष्मीबाईंना दिलेले उत्तर– ''अग चल व्हय तिकडं. लय बाह्मनीन असलीस तर आम्हाला काय? बाह्मनीन झाली तर मंग आली कशाला ह्या नळावर?'' हीच सूक्ष्मावलोकनाची वृत्ती व्यक्तिचित्रं उभी करतानाही उपयुक्त ठरलेली दिसते. 'स्मृतिचित्रां'मधील भिकूताई,

मामंजी, नानासाहेब, पेंडसे, सखाराम भागोजी, धारूमाई अशा कितीतरी व्यक्तिरेखा त्यांच्या स्वभाववैशिष्ट्यांसह, बोलींसह जिवंत झालेल्या दिसतात. लक्ष्मीबाईंचे हे सूक्ष्मावलोकन इतरही अनेक बाबतीत दिसून येते. उदा.- तत्कालीन चालीरीतींचे, विधींचे, सण-समारंभांचे, सांस्कृतिक घडामोडींचे चित्रदर्शी वर्णन त्या करतात. लग्नसमारंभ, मुंज, हळदीकुंकू, सहस्त्रभोजने, खिरापत, सवाष्णभोजन इ. ब्राह्मणी चालीरीतींचे, सोवळ्याओवळ्याचे चित्रण, दागदागिने, वस्त्रालंकार, पेहराव यांचे नेमके वर्णन त्या करतात. कोकणातील ब्राह्मणी खाद्यसंस्कृती, देशावरील खाद्यसंस्कृती, नानाविध पक्वान्ने, खिस्ती खाद्यसंस्कृती यांचेही नेमके वर्णन करतात. इतकंच कशाला त्यांना स्वत:ला असलेल्या खेळाच्या आवडीतून बाहुलीचा खेळ, सागरगोटे अशा खेळांविषयीही त्या जिव्हाळ्याने लिहितात त्यामुळे एक सांस्कृतिक पटच डोळ्यांसमोर उभा राहतो. इतकेच नव्हे तर खिस्ती धर्मातील अनेक घटकांचे उल्लेख आढळतात. खिस्ती धर्मांवर विधी, त्यांच्या प्रार्थना, प्रवचनं यांचे वर्णनही त्या नेमकेपणाने करतात. समाजातील जातीयता, माणसामाणसांतील संबंध, कौटुंबिक नातेसंबंध, पती-पत्नी सहजीवन, धार्मिक-जातीय विषमता अशा सर्व घटकांमुळे या आत्मचरित्राला सांस्कृतिक, ऐतिहासिक, सामाजिक, अध्यात्मिक असे परिमाण लाभलेले दिसते. याचे श्रेय अर्थातच लक्ष्मीबाईंच्या कुशाग्रतेलाच द्यावे लागते.

'स्मृतिचित्रे' या ग्रंथात आलेल्या घटनाप्रसंगांची सुसंगत व नेटकी रचना हेही लक्ष्मीबाईंच्या लेखनाचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. नाट्यमयता हा त्यांच्या लेखनाचा एक विशेष जाणवतो. आयुष्यात घडलेल्या प्रसंगांची नाट्यपूर्ण रचना करून त्या प्रसंगातले नाट्य नेमकेपणाने अभिव्यक्त करतात. काही काही प्रसंगांच्या त्या प्रत्यक्ष साक्षीदार नसतानाही ते प्रसंग विलक्षण खुलवलेले दिसतात. उदा. - टिळकांच्या बालपणच्या आठवणी, सासूबाईंचा मृत्यू. अर्थात हे प्रसंग टिळकांनीच कधीतरी सांगितले असणार पण या सांगण्यातूनच पतीपत्नींच्या मोकळेपणाने व्यक्त होण्याच्या वृत्तीवर त्या नकळत प्रकाश टाकतात. काय सांगायचे आहे व कसे सांगायचे आहे आणि काय सांगायचे नाही याची पूर्ण जाणीव लक्ष्मीबाईंना असल्याचे दिसून येते म्हणूनच कलात्मकता आणि वास्तवतेचा सुंदर आविष्कार 'स्मृतिचित्रां'मध्ये दिसतो, असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

विनोदी वृत्ती आणि मिश्कीलपणा हा जसा लक्ष्मीबाईंच्या स्वभावाचा स्थायीभाव आहे, तसाच तो त्यांच्या लेखनाचाही असल्याचे ठायी ठायी दिसून येते.

उदा.- 'मामंजींचा क्रोधाग्नी विझला पण आत्याबाईंची वीज कडाडली.'

२) 'गुळगुळीत कंदिलाची टिळकांच्या तुळतुळीत डोक्याशी गाठ पडली.'

३) 'मी लंकेची पार्वती व टिळक कफल्लक शंकर.'

४) 'बाहेर चौघडा बंद झाल्यावर माझ्या हृदयात चौघडा वाजू लागला. बहिणीने पंचपक्वान्नांचे ताट मजपुढे वाढून ठेवले. त्यात कोणती पक्वान्ने नव्हती? गालगुरोळ्या होत्या, चापटपोळ्या होत्या, धम्मकलाडू होते, मुष्टिमोदक होते, मुरूडकानोले होते.'

बोलीभाषेची उपजत लय पकडणे हा आणखी एक विशेष लक्ष्मीबाईंच्या निवेदनातून जाणवतो.

उदा.- 'झाले होते काय की उपकरण्यांना डाग पडले होते. उपकरणे होती तांब्याची, पाणी विहिरीचे, राख लाकडाची व दिवस पावसाचे...' अशा लयीतून त्यांच्या भाषेला प्रवाहीपण आल्याचे दिसून येते. कधी कधी लक्ष्मीबाईंच्या स्वभावातील खाष्टपणा त्यांच्या औपरोधिक तर कधी उपहासिक शैलीतून व्यक्त होतो.

उदा.- 'मी बाहेर गेले की त्यांची दिवाळी उगवायची आणि नंतर माझा शिमगा सुरू व्हायचा.' 'नाणाजीचा पत्ता नसल्यावर अन्नाजी कसे येणार?'

'मी मोठी संसारी व माझी संग्राहक बुद्धीही मोठी अजब. टिळकांना जिकडेतिकडे अगदी स्वच्छ हवे असे; इतके की पैशाची पिशवी व पेटीही ते झाडून-पुसून ठेवीत.'

या आत्मचरित्रात केवळ लक्ष्मीबाईंचीच लेखनशैली दिसते असे नाही तर टिळकांची लेखनशैलीही जाणवते. टिळकांच्या डायरीतील विशिष्ट नोंदींची योग्यप्रकारे योग्य ठिकाणी सांगड घातली आहे, हे लक्ष्मीबाईंचे कसब कौतुकास्पद आहे. टिळकांची पत्रे, टिळकांचे प्रकाशित लेखन, कविता, इतर पत्रव्यवहार यांच्या नेमक्या योजनेमुळे या आत्मचरित्राची भाषाशैली बहुपेडी स्वरूपाची दिसते असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

एकूणच तत्कालीन स्त्रीजीवनाच्या पार्श्वभूमीवर व एकूण स्त्रियांच्या आत्मचरित्राचा विचार करता स्मृतिचित्रांचे वाङ्मयीनदृष्ट्या व ऐतिहासिक दृष्ट्या अनन्यसाधारण महत्त्व मोठे आहे, हे निश्चितपणे मान्य करावे लागेल.

संदर्भ

१) स्मृतिचित्रे - लक्ष्मीबाई टिळक, पॉप्युलर प्रकाशन
२) माती आणि मूर्ती - डॉ. सरोजिनी वैद्य, मॅजेस्टिक प्रकाशन
३) ज्ञानमंदिर - वत्सलाबाई आंबेगावकर, ऑक्टो.-नोव्हें. १९३७
४) वाङ्मय - नाथ निफाडकर, मार्च १९३५

**- नेहा किशोर सावंत**
भ्रमणध्वनी : ९९२०१८०१८३
nehasawant603@gmail.com

# मेहता पब्लिशिंग हाउस

किंमत : ₹ २५०/-



अंतरंग कोका-कोलाचे

मूळ लेखक : नेव्हिल इझडेल व डेव्हिड बीसले

अनुवाद : प्रदिप सिंदेकर

मोडकळीस आलेल्या जगप्रसिद्ध कंपनीचे अंतरंग वाचावे असेच!

किंमत : ₹ ४९५/-




एका अमेरिकन उद्योगाची आंतरराष्ट्रीय भरारी कहाणी मॅकडोनल्डस्‌ची

मूळ लेखक : जॉन एफ.लव्ह

अनुवाद : डॉ. सुधीर राशिंगकर

खाद्य संस्कृती बदलणारा हॅम्बर्गरच्या एका छोट्या स्टँडवरून कोट्यवधी डॉलर्सची उलाढाल करणारा... आंतरराष्ट्रीय उद्योगाची प्रेरणादायी कथा.

किंमत : ₹ २००/-



खैरखानाची वस्त्रोद्योजिका

मूळ लेखक : गेल झेमॉक लेमॉन

अनुवाद : वर्षा वेलणकर

जुलमी तालिबानी राजवटीमध्ये स्त्रियांना आत्मनिर्भर करणाऱ्या उद्योजिकेची प्रेरणादायक कथा

किंमत : ₹ २९५/-



कॉन-टिकी

मूळ लेखक : थॉर हेयरडाल

अनुवाद : श्रीया भागवत

१९४७ मधील प्रशांत महासागरातील सफरीची अद्‌भुत सत्यकथा

मेहता पब्लिशिंग हाउस । पुणे-३०. फोन - (०२०)२४४७६९२४, २४४६०३१३ एक्सटेन्शन क्र.२३८, २२९ Email : sales@mehtapublishinghouse.com

मेहता बुक सेलर्स कोल्हापूर. फोन - (०२३१) २५४२९०१ । Email : mehtabooksellers@gmail.com

WORDPOWER । कोल्हापूर. फोन - (०२३१) ६६१७६२५ / २६ । औरंगाबाद. फोन - ९९६०३०९८८८ । बेळगाव. फोन - ८४९४९४२८०६
Email : wordpowerbookshop@gmail.com

Website : www.mehtapublishinghouse.com ▪ m.dailyhunt.in / Ebooks / marathi ▪ www.amazon.in ▪
E-book available on : play.google.com / store / books | WhatsApp us on 9420594665



# प्रा. पुरुषोत्तम पाटील यांची 'काव्य-रती'

**एकनाथ पगार**

> **कवी पुरुषोत्तम पाटील हे 'पुपाजी' म्हणून परिचित होते. त्यांच्या कविताप्रेमामुळेच ते 'अनुष्टुभ'चे संपादक झाले, पुढे 'कवितारती' हे कवितेचे नियतकालिक त्यांनी स्थापन केले. वाङ्मयीन नियतकालिकांच्या संपादनाच्या इतिहासाचे एक पर्व त्यांच्या निधनाने संपले. मराठी कवी आणि कविता यांची जपणूक करण्यातच गेली ३९ वर्षे ते वावरले, मित्राची, शहाण्या आजाची ही भूमिका होती. पुरुषोत्तम पाटील यांच्या कर्तृत्वाच्या-काव्याच्या आठवणींना दिलेला हा उजाळा!**

॥१॥

अल्पाक्षरी, नादवती आणि रतिभावसंपन्न कविता पुरुषोत्तम पाटील यांनी लिहिली. सामान्यत: प्रेमानुभव-निसर्गानुभव सौंदर्यवादी जीवननिष्ठेतून त्यांनी कवितांमधून आविष्कृत केले. १९४८ पासून कवितानिर्मितीचा ओघ सुरू राहिला. आत्मरततेतून आपल्या भावविश्वाचा नादानुकूल शोध ते घेत राहिले. १९५२ ते १९७७ या काळातल्या निवडक कवितांचा समावेश 'तळ्यांतल्या सावल्या' (१९७८) मध्ये झालेला आहे. 'परिदान' या संग्रहाचे प्रकाशन १९९८ मध्ये झाले. जवळपास ६५ वर्षातले हे काव्यप्रवास स्वत:च्या चालींनी-लयींनी केलेले आहेत. 'परिदान'च्या प्रारंभी वॉल्ट व्हिटमनच्या पुढील ओळी आहेत-

ना वाङ्मयीन कीर्ती, ना बौद्धिक यश-
फक्त वाऱ्यावर अल्लड झुलत राहतील माझी झुबकाभर गाणी
लिहिलेली दोस्तांसाठी नि प्रेमिकांसाठी

पुरुषोत्तम पाटील यांची कविता आत्मनिष्ठ सौंदर्यानुभव प्रकट करणारी कविता आहे. प्रसिद्धी, यश अशा भौतिक प्रलोभनांना त्यांनी प्रतिसादही दिलेला नाही. बा.भ. बोरकर आणि वि.स. खांडेकर यांच्या काहीएक सान्निध्याचा परिणामही त्यांच्या कविवृत्तीवर, प्रसिद्धी-सिद्धीवर झालेला होता. जेव्हा भावगीतांना मोठी मागणी होती, तेव्हा पाटील आकर्षित झाले आणि क्षणांत मागे परतले.

पाटलांना वि.स. खांडेकर म्हणाले होते, ''तुझ्या या सुरुवातीच्या कविता, त्या कच्च्या असणारच. पण त्याची जाणीव तुम्हा तरुण मंडळींना नसते. उलट आपण काय छान लिहिले आहे अशी या वयाला साजेशी आत्मप्रौढीची ऊर्मी मनात उचंबळत असते. आपल्या या सदोष उथळ कच्च्या निर्मितीबद्दल एकप्रकारचे गाढ पण अनाठायी ममत्व मनात निर्माण झालेले असते. पुढच्या विकासाला ते फार बाधक ठरते. म्हणून ते मुळातच जाळून टाकण्यासाठी खूप साधना करावी लागते. काव्याभ्यास करावा लागतो.'' बा.भ. बोरकरांच्या सान्निध्यात तीन-चार वर्षे पाटील होते. बोरकरांनीही त्यांच्या प्रारंभीच्या कविता पाहिल्या होत्या. थेट संस्कार जरी पाटील यांच्यावर बोरकरांचे नसले तरी नादसौंदर्य-शब्दबंधांचे सौंदर्य-निसर्गाचे मानुषीकरण यांचे पडसाद त्यांच्या कवितेवर अप्रत्यक्षपणे जाणवतात. फर्ग्युसन कॉलेजच्या 'साहित्य-सहकार'नेही प्रारंभीची अभिरुची घडवली होती. सत्यकथेचा हा काळ तसा मर्ढेकरी संस्कारांचा काळही होता. पु.शि. रेगे यांच्या कवितांतील अल्पाक्षरी रमणीयत्व, ना.घ. देशपांडे यांचे नादानुकूल भाव याच काळात आंदोळत होते. कामभावाचे नाजूक-लाजरे संसूचन मराठी कवितेत विशुद्ध भावकाव्यात कल्पक रूप धारण करीत होते. पाडगावकर-बापट-करंदीकर यांची कविता इंदिरा संतांच्या काव्यावतरणाच्या काळात आपापले आशय-रूप-सौंदर्यरूप विकसित करीत होती. पुरुषोत्तम पाटील कवी म्हणून आपली स्वत:ची वेगळी ओळख निर्माण करू शकले, त्या काळाची ही पार्श्वभूमी आहे.

'जपानी रमलाची रात्र' या कवितेच्या आसपास 'एक अनुभव : जपानी' ही पुरुषोत्तम पाटील यांची कविता 'परिदान/पृ. ४९) ठेवली तर?

''...नृत्याच्या हेलावत्या मदमंथर लयीत
सैल किमोनोचीही शिवण उसवू पाहणाऱ्या
तिच्या धगधगीत बंडखोर मांड्या
न दिसूनही दिसणाऱ्या उसणाऱ्या

आता
माझ्या देहाची हाराकिरी
ज्वालामुखीत
एका सळाळत्या पुनर्जन्मासाठी!''

जपानी रमलाची अद्भुत - स्वप्नाळू कामभावाची उत्फुल्ल सहजता आणि 'एक जपानी अनुभव'चा रचनाबंध, मुक्तछंदात्मकता सारे बदलते-वेगळे ठरते. पाटील यांच्या कवितांमध्ये कामभाव, विरहभाव आणि सौंदर्यक्षणांच्या आकर्षणाचे भावतरंग सर्वत्र संचारलेले आहेत. स्त्रीरूपाच्या मनदेहाचे सौंदर्यपूर्ण शोषण, संश्लेषण त्यांच्या प्रतिमाबंधांत सामावलेले दिसते. एकूणच मराठीच्या सौंदर्यवादी-स्वच्छंदवादी जीवनदृष्टींचे विस्तरण करणारी कविता प्रामुख्याने पाटील यांनी रचली आहे.

स्व-कोषातील भाव-भावुक स्वप्नसृष्टी, क्षणांचे तरल अर्थ निर्णय करू पाहणारी प्रतिभाक्षमता त्यांच्या ठायी आहे. ऐंद्रिय संवेदनांचे शब्दचित्र-क्षणचित्रणही ते करू पाहतात. त्यासाठी कधी पुरुषी नजरेने, कधी स्त्रीच्या संगमोत्सुक. विरहशंकित भूमिकेलाही आपलेसे करतात. प्रेमभाव प्रकटीकरणातील भूमिका कायापालट करतात. आत्मलक्ष्यी कामभाव हा त्यामुळे स्थायीभाव बनतो.

येणाऱ्यासाठी
लगबग पहाट... चुळुक् झुळुक् सडा
हलकेसे स्वस्तिक, फुलकीशी रांगोळी
अन् थोडा दळदार सूर्य...

थांबलेल्यासाठी
एकुलता पाट, सुगरण ताट
अन् नखलेल्या कोवळ्या पानांचा
थोडा बेतशीर केशरविडा...

जाणाऱ्यांसाठी
अर्ध्या-उघड्या दाराआडचा
ओझरता इरकली पदर
अन् काकणांची थोडी अस्वस्थ किणकिण...

(पाहुणेर/तळ्यातल्या सावल्या)

'येणारा-थांबलेला-जाणारा' हा एकच पुरुष आहे. स्त्रीरूपाचे त्याच्यासाठीचे भावसज्ज असणे, उत्सुक असणे, झुरणे, प्रतीक्षा, सुखद भाव, अस्वस्थता अशा भावनिक प्रतिक्रिया, संवादी प्रतिक्रिया प्रिय पुरुषासाठी-पुरुषाबद्दल आहेत. स्त्रीमनातील पौरुषाचे सनातन आकर्षण प्रकट करताना कविमनाचा हा कायापालट आहे, मनोभावांचाही पालट आहे. 'तो' येणार तर प्रतीक्षा आणि तयारी - 'सडा-स्वस्तिक-रांगोळी-दळदार सूर्य' हे तिचे भावोत्सुक-प्रणयोत्सुक स्वागत आहे. 'हलकेसे-फुलकीशी', 'चुळुक-झुळुक', 'लगबग' हे शब्दबंध भावनांची गतिशील प्रतिमाचित्रे आहेत. विशिष्ट क्षणांची ही सौंदर्यपूर्ण कल्पकचित्रे आहेत. 'नखलेली कोवळी पाने', 'केशरविडा', प्रणयसमाधानातील 'शांती-समाधानता-स्वप्नरंजक' असे काही भावप्रकटन ठरतात. 'अर्ध्या-उघड्या', 'इरकली पदर', 'कांकणे', 'अस्वस्थ किणकिण' या शब्दबंधांतून त्याच्या दुराव्यातील वेदनांचे चित्रण आले आहे. शब्द-शब्दबंधांची निवड, शब्दांची जागा आणि शब्दस्वरूप अनुभव, सारे परस्परसंवादी बनतात.

'बंदिवास' (परिदान/पृ. २६) या कवितेतील निवेदक पुरुष आपल्या स्त्रीरूपाशी समरसता अनुभवतो, संगमोत्सुकतेचे, प्रशांत संगमाचे बंदिस्त होणे तो सांगतो आहे. स्त्रीरूपाला उद्देशून हे 'सांगणे' आहे. (आठवण करून देणे आहे!)

तुला ऐकू आहे
तुझ्या हृदयात
विरघळून विसावलेल्या माझे
मंदमधुर हासू...
आणि लगबगीने
तुझ्या कंचुकीतला
ओसंडणारा उभार
दोन्ही हातांच्या स्वस्तिकात
घट्ट दाबून धरलास,
तटबंदी तोडून आतला मी
बाहेर पळून जाऊ नये म्हणून!

या 'माझे' या शब्दाची जागा थांबायला लावते. 'विरघळून विसावलेल्या', 'मी-कोणी-काही' असे येण्याऐवजी 'माझे' हे शब्दरूप थबकवते आणि संहितेतील शब्दस्थानांकडे आकर्षित करते. 'मंदमधुर हासू' यांच्या आधी 'माझे' त्याच ओळीत अपेक्षित असताना तो त्याआधीच्या ओळीत-वाक्याशांचा भाग बनतो. शब्दस्थानांची-ध्वनींची जागा उत्स्फूर्त बांधणीमुळे लयदार बनते, अर्थविस्ताराचेही कार्य साधते. दोन शब्दांच्या जुळवणुकीतूनही सौंदर्यार्थाच्या खास जागा पाटील यांच्या कवितांमध्ये आलेले आहेत. उदा. 'बंदिवास' याच कवितेतले हे शब्दबंध पाहा- मनमाखले शब्द, डळमळत अडखळलो, तुझ्या चुंबक-नजरेत, अर्धस्फुट गुलाबाच्या कळीसारखा, कोमल अधरोष्ठ, कमलडोळे, पालवपापण्या, मंदमधुर हासू, कृष्णचतुर बंदिवास. तसेच आणखी काही शब्दबंध पाहू- सुगंधात हिंदकळली, सुलक्षणी वेणी, हुळहुळते टोक, मंजुधार शालीन शिडकावे, मोकळखळे आभाळ, पाठपन्हाळीची वाट, सायीची बोटे, आसक्त गालांना, स्पर्शाची भूपाळी, आरक्त पहाटपणात, किलबिल पापण्यांत (तोरड्यांची), घसरघुटमळ, स्मितस्तब्ध, मोहोरसुगंधी सळसळ, वेल्हाळवेलांटी, स्पर्शपावन, ओठांची महुर महिरप, ज्वालास्तंभ मांड्या, कारंज्यांची सूळशिखरे, सावल्यांच्या मुंडावळ्या, धगधगीत बंडखोर मांड्या, झाकचोपणीचा कहर, रंभागर्भ मांडीवर, देहाच्या चांदणवेलीने, छळपिवळी काचोळ, श्रावणओला प्रकाश इत्यादी.

'तळ्यांतल्या सावल्या' नंतरच्या कवितांमध्ये अल्पाक्षरत्व कमी होत गेले तरी सौंदर्यवादी भावविभोर हुरहुरते अनुभव, क्षणचित्रे, कल्पकनिसर्ग चित्रे कायमच आकारित होत राहिली आहेत. व्यक्तिगत जीवनातील सुखदुःखे, भोग-उपभोग 'परिदान'-मध्ये वस्तीला आली आहेत. स्त्रीमनाचे-स्त्रीदेहाचे आत्मपर चिंतन येथेही उसासत-उन्मळत राहिले आहे. पाटील यांच्या कवितांना ग्रामीण लोकजीवनाचे-स्त्रीजीवनाचे आशयद्रव्यही लाभले आहे.

'विडा' (परिदान/पृ. ६), 'गौरा' (परिदान/पृ. ७), 'बोल पहिलावहिला' (परिदान/पृ. ५), 'गांधार' (परिदान/पृ. ४), 'कुंकू लालजर्द झालं' (परिदान/पृ. ३), 'शेत: सुगीचे' (परिदान/पृ. ८), 'विसावा' (परिदान/पृ. ३९) या कवितांमधील स्त्रीरूप ग्रामीण परिवेशातले आहे. लोककथा-लोकगीते अशी लोकतत्त्वीय वातावरणनिर्मिती काही कवितांमधून झाली आहे.

महू-फुलांच्या यौवनाने झिंगलेल्या स्त्रीरूपाची 'झिंग', 'भिंगरी' या कवितेत वेगवान बनते-

झिंग झिंग बाई झिंग
नवसाचे भिंग
स्वाद झाली बिल्वरी
भिंग झाले भिंगरी... (परिदान/पृ. २३)

किंवा कुंकू लालजर्द होतानाचा अनुभव-

''संसाराची वाट वाटोळी वाटोळी
फडफड जिवाची पाकोळी पाकोळी
घटकाभर खेळून हसू-रूसू
कपाळीचा घाम पदरानं पुसू''
भिजभिजून कुंकू लालजर्द झालं
(आत्ताच तर घरचं बोलावणं आलं!)

मुलींच्या खेळगाण्यांची चाल-लय-मुक्तता संसारात नुकत्याच प्रवेशलेल्या स्त्रीरूपास मिळाली आहे. किंवा माहेराहून सासरी आलेले हे स्त्रीरूप वाड्यात प्रवेश करते-

तेव्हा, समोरच्या दिवाणखान्यातली
काचेची लोंबती झुंबरं
वाऱ्यानं झुलताना
हलकेच किणकिणली
हा छकुला रुणझुण आवाज
पदराच्या ओटीत भरून
मी उंबरठ्याच्या आत आले... (आवाज/परिदान/पृ. २)

'विसावा' (परिदान/पृ. ३९) या कवितेतील स्त्रीरूप पहाटेपासून कष्टच करीत राहते, त्या सखूचा अख्खा दिवस घरात-कुटुंबात-कामातच सरकत राहतो. तिची हालचाल कालक्रमिक कामे ओवीबद्ध झाली आहेत-

... झुंजुमुंजू प्रकाशात    जाग राहटाला येते
सारे भरून रांजण    सखू अंगण शिंपते
सडा जिवाचा टाकते
... आता पडली झांजर    सखू दिवटी लावते
तिच्या डोळ्यांतील    ज्योत थोडा अंधार मागते
थकलेल्या दिवसाला    थोडा विसावा वाटते...

'उजाडती पहाट, जात्याची माळ' यातील अनागर नाते स्त्रीजीवनात महत्त्वाचेच आहे, 'डोळ्यातील ज्योत' थकलेल्या दिवसाला थोडा विसावा/अंधार मागते. सारे जागेपणाचे प्रहर थकवून सोडणारे आहेत. ग्रामजीवनातला हा काळ तसा मागचा आहे. गतकालीन आठवणी, गतकालीन स्त्रीजीवन प्रामुख्याने पाटील यांच्या कवितांमध्ये आहे. लोकगीतातला ठळकपणा टाळून त्यांची कविता सूचक बनते. नाजूक-तलस्पर्शी सूक्ष्म सूचकता या विशेषांचा प्रत्यय देणारी ही कविता आहे. कामभावाने आतुरलेले स्त्रीरूप वेदनाविकारांनी शोकभावांनीही प्रदर्शित झाले आहे. राधा-कृष्ण या प्रतिमांना- अभिजात शृंगार संबद्ध करणाऱ्या कवितांप्रमाणेच आत्मचरित्रपर तपशीलांची 'आश्वासन'सारखी कविता (परिदान/पृ. ६६) पाटलांनी लिहिलेली आहे. अतिव्यक्तिगततेच्या पलीकडली भावसृष्टी उभारताना व्यक्तिगततेचे स्पर्श 'आश्वासन'मध्ये आहेत. या कवितेत स्त्रीरूपाशी संवाद आहे, एकतर्फी! हे स्त्रीरूप 'काव्यनिर्मिती शक्ती' म्हणूनही सूचित केले आहे.

गळ्यात स्नेह्यासोबत्यांनी घातलेले फुलांचे हार
विश्वासघाताचे करवतकाठ झाले-
ज्यांच्या सहवासात ठिबकत होता मध
ते काडीचिराईतचे कडूशार वेल झाले...

आणि शेवटच्या ओळी पाहा-

या अमृतानुभवाने मंजुळत उजळणारी नंतरची पहाट
तुझ्यावर मायेचा श्रावणओला प्रकाश शिंपीत राहील!

व्यक्तिगत जीवनातील मानपान, सत्कार सारे होऊनही विश्वासघात झाल्याने संत्रस्त कविमनाचा आकांत 'आश्वासन'च्या पहिल्या तीन छंदकात आहे. स्नेहीसोबती, सहवासातले सहचर, नोकरीतले वरिष्ठ हे दांभिक निघाले, छळवाद मांडणारे आहेत. 'कुटुंब-नातेसंस्था' यातील जिवलग मरणपंथाला गेले. अंतर्बाह्य संघर्षाचे हे क्षण अविश्वासाने-फसवणुकीने कविमनाला घेरत राहतात, निष्ठापूर्वक जगणे, मूल्याला बांधील राहणे अशी मनस्विता अवघड झाली. हे दु:ख-घातपात कवीबरोबरच 'तू'लाही सोसावे लागतात. जाणिवेच्या पातळीवर वास्तवसन्मुख होताना दु:ख-विश्वासघात सलत राहतात. नेणिवेत स्वप्न-सुषुप्तीत मात्र 'करुणा-दया-आस्था' यांचे आश्वासन मिळते. नेणिवेत वास्तवाचा रोष विरून जातो, दया-करुणा यांचे मातृमुखी स्त्रोत मिळतात. जागेपण-वास्तवसन्मुखता क्लेशकारी तर नेणिवेत सारेच क्षमासंपन्न करुण होऊन जाते. स्वप्नसखी- 'तुझे' अश्रूंचे थेंब हलकेच टिपून घेईल, असे हे आश्वासन आहे.


'अमृतानुभव', 'मंजुळत-पहाट', 'श्रावणओला प्रकाश' हे शब्दबंध नेणिवेतील स्त्रीरूपाच्या अनुषंगाने आले आहेत. बाह्य आघातांना नाकारणारी स्वीकारशील स्वप्नसखी कवीने कल्पिली आहे. येथील 'तू' प्रत्यक्षातले सहचर. स्त्रीरूप आहे, 'स्वप्नसखी' ही निर्माणक्षम-सौंदर्य-आकांक्षी-आश्वासक 'कविता' आहे. व्यक्तिगत दु:खाचे चिरंतन सर्जनात रूपांतरण करणारी कविता पुरुषोत्तम पाटील यांना अपेक्षित होती, 'चटके-दंभ-घात' यांना अमृतानुभवापर्यंत पोहचवण्यासाठी संयतता त्यांच्या कवी म्हणून असलेल्या व्यक्तिमत्त्वात होती.

पुरुषोत्तम पाटील यांची कविता नाजूक, तरल आणि सौंदर्यकांक्षी कविता आहे. प्रेम-विरह-हुरहूर या भावनांबरोबरच दु:खदायी भावनांची चिंतनशील शब्दचित्रे-भावचित्रे त्यांनी निर्मिली.

शब्द-उपयोजनातले औचित्य 'ध्वनी-अर्थ' अशा दोन्ही पातळ्यांवर विलक्षणपणे सांभाळले. वास्तवाला-व्यक्तिगततेला धूसर करीत ते नवे स्वप्नसदृश्य भावविश्व निर्माण करीत राहिले, त्या कल्पिताला रतिभाव, सौंदर्यओढ मराठीत स्व-तंत्र ठरते.

चढतीचे ऊन । घाशी गोरी पाठ
बाभुळफुलांचा। हळदीचा थाट
(तळ्यातल्या सावल्या)

अशा सहज निसर्गसंवेदनातून, स्पर्शसंवेदना चित्रातून काव्यात्मकता साधणारी कविता महत्त्वाची ठरली आहे.




।।२।।

पुरुषोत्तम पाटील यांनी सामाजिक-सांस्कृतिक आणि वाङ्मयीन विषयांवर भाष्य करणारे गद्यलेखनही मोठ्या प्रमाणावर केले आहे. 'दै. लोकमत', 'केसरी' या वर्तमानपत्रांमध्ये सदरे लिहिली. आवडलेल्या कवी-कवितांच्या दार्शनिक सौंदर्याचा बोध घेणाऱ्या 'अमृताच्या ओळी' लिहिल्या. त्यांच्या गद्यलेखनातही कवी-कविता यांच्या प्रभावाचेच दर्शन होते. कुसुमाग्रज-बोरकर-तुकोबा आणि नारायण सुर्वे प्रत्येक टप्प्यावर भेटतात.

'तुकारामाची काठी', 'पारख' आणि 'ग्वाही' या लेख-संग्रहातले स्फुट लेख प्रासंगिक घटितांचा आणि समाजातल्या मूल्यघसरणीचा वेध घेणारे आहेत. समाजप्रबोधन, दंभस्फोट आणि नीतिमूल्यांची ओढ ही प्रेरणाच त्यांच्या सामाजिक भाष्यांमागे आहे. म. गांधी, थोरो, रस्किन यांच्यासमवेत संत तुकोबांची मूल्यदृष्टी त्यांच्या चिंतनाचा गाभा ठरतो. नुकत्याच मिळालेल्या स्वातंत्र्याची घटना, उदारमतवादी धोरणे, प्रजासत्ताकाची प्रयोगशील घडण ते जागतिकीकरणाचा दिखाऊ घास झालेले लोकजीवन हे सारे अनुभवतानाचे टक्केटोणपे खाणे, भ्रष्टाचाराचा संताप येणे, आदर्श जीवनाची आठवण काढत राहणे आणि सभोवतालचा वर्तमान सोसणे, असे सारे या सामाजिक भाष्यांमध्ये आले आहे. पुरुषोत्तम पाटील सौंदर्यासक्त मनाचे कवी होते, पण या सौंदर्यकल्पनांची सांगड समकालीनतेच्या गतिमानेशी सांधू शकत नव्हते. 'तुकारामाची काठी'मध्ये सात्त्विक संतापाचे वातावरण आहे. मानवी जीवनाची विकृती-स्वरूप अवकळा त्यांना संताप व्यक्त करायला भाग पाडत होती.

''सर्वत्र, सर्व प्रकारचा भ्रष्टाचार जेव्हा पहायला मिळतो तेव्हा मन हादरून जाते. विलक्षण चीड येते. ती यथार्थपणे परखडपणे व्यक्त करण्यासाठी तुकारामासारख्या महाकवीच्या वचनांचा आधार घ्यावा लागतो. 'भले तरी देऊ । कासेची लंगोटी। नाठाळाचे काठी। देऊ माथा' हा तुकारामाचा गाजलेला अभंग. म्हणून सदरासाठी 'तुकारामाची काठी' हेच नाव निवडले. विविध प्रकारच्या भ्रष्टाचारांवरच्या, प्रदूषणांवरच्या प्रहारासाठी ही काठीच उपयुक्त. ती प्रतीकात्मक आहे हे सांगणे न लगे. 'बाईटा'वर आघात केल्याशिवाय 'चांगले' टिकू शकत नाही ही तुकोबांची खात्री होती. 'निवडावे तण। शेती करावे राखण' असेही त्यांनी म्हणून ठेवले आहे. असले तणच पिकांचा नाश करते. म्हणून माझे लेखन म्हणजे तणनिर्मूलनाची माझ्या परीने चालवलेली लहानशी धडपड आहे.'' (तुकारामाची काठी/सुजय प्रकाशन/२००२)

नको असलेले विकार लक्षात आणून देत देत समाजपुरुषाच्या आरोग्याची दिशा त्यांना दाखवावीशी वाटत राहिली. निरामय जीवन आणि निरामय समाज यांचे एक आदर्श प्रारूप त्यांच्या मनात होते. या आदर्शाची दिशा दाखवताना साठ-सत्तर वर्षातला त्यांचा समकाळ हा विषमकाळच होत गेला. सडेतोडपणे नागड्या सत्तेला ते भोंगळेपणाचे भान देत राहिले. धार्मिक मूलतत्त्ववाद, असहिष्णुता, पाश्चिमात्त्य सांस्कृतिक आक्रमण, कवीचे कार्य, प्रसिद्धिलोलुपता, भारतातले आर्थिक आणि सांस्कृतिक दारिद्र्य, उपेक्षित गुणवंत, राजकारणातले हिणकस, काटकसर-साधेपणाचे महत्त्व, हिरावलेले बाल्य, विश्वासमूल्य, गांधीवादी अर्थकारण आणि आपण, दूरदर्शनचे आक्रमण, ग्रंथालयांची स्थिती (अवकळा) धार्मिक उत्सवी कर्मकांड, स्त्रीजीवनातली दुःखे, हुंडाबळी श्रद्धा-अंधश्रद्धा, कृतज्ञता आणि कृतघ्नता, मायमराठीचे हाल, पैशाचा लोभ, भ्रष्टता, वेळ, आदर्श शिक्षण आणि शिक्षक... असे कितीतरी विषय त्यांच्या समाजचिंतनात आलेले आहेत. समकालीन जीवन सारखे घसरते आहे, या घसरणीचा वेध घेत बोधाचे फटकारे मारण्यासाठी जुन्या छडीदार शिक्षकाची भूमिका त्यांनी घेतली होती. दंभस्फोट करणारी तळमळ-व्याकुळता आणि सडेतोडपणा ही त्यांच्या चिंतनशील, बहुधा आत्मपर गद्यलेखनाची आशयसूत्रे आहेत.

भव्य-उदात्त आदर्शांची ओढ, प्रेममय निरागस जीवनसौंदर्याचे आकर्षण आणि विकृतींचा सडेतोड समाचार घेताना कवी कुसुमाग्रज, बा.भ. बोरकर आणि तुकोबांची भरभक्कम साथ त्यांना मिळाली होती. 'सत्य-असत्याशी' झगडा करीत बहुमताची पर्वा त्यांनी केली नाही. साध्यासुध्या माणसांतील माणुसकीचा झरा त्यांनी शोधला, तो वाहता राहावा; असे त्यांना वाटत राहिले. वैयक्तिक जीवनातले मान-अपमान, अन्याय त्यांना अस्वस्थ करीत आणि मग ते सर्जनशील कृतींमध्ये मनाची गुंतवणूक करीत होते.

।।३।।

पुरुषोत्तम पाटील 'कविता' आणि 'कविता-रती' ही ओळख

प्राणपणाने जपत आले. जवळपास ३१-३२ वर्षे त्यांनी 'कविता-रती' हे द्वैमासिक निर्मिले-वाढवले आणि काव्यनिष्ठा टिकवली.

डॉ. रमेश वरखेडे यांनी 'अनुष्टुभ'ची स्थापना केली. म.सु. पाटील, गंगाधर पाटील, गो.तु. पाटील आणि महाराष्ट्रातील वाङ्मयीन कर्तेपुरुष 'अनुष्टुभ' हा वाङ्मयविचार घडवत राहिले आहेत. सुरुवातीच्या काही अंकांनंतर पुरुषोत्तम पाटील 'अनुष्टुभ'चे संपादक झाले. सत्यकथेच्या पार्श्वभूमीवर 'अनुष्टुभ'चे वाङ्मयीन महत्त्व-अस्तित्व टिकवण्यात पुरुषोत्तम पाटील यांचा महत्त्वाचा सहभाग होता. पाच वर्षांनंतर त्यांनी संपादकपद सोडले. 'अनुष्टुभ'-मधून मुक्त होताना त्यांना त्रास वाटत राहिला, काहीसा कडवटपणाही आला, संतप्तेतून अस्वस्थता असे बरेच काही घडले. या दरम्यान कैलास सार्वेकरांनी एका पत्रात 'एक होता कार्व्हर'मधले अवतरण पाठवले (तुकारामाची काठी/पृ. १४७)- ''माझ्यावर अनेक अन्याय झाले. पण प्रत्येक वेळी अन्यायाचं निराकरण करून घेण्यासाठी, त्याविरुद्ध लढण्यासाठी मी माझी शक्ती, बुद्धी पणाला लावली असती तर माझे जीवितकार्य तडीस नेण्यासाठी माझ्याकडे शक्तीच उरली नसती.''

''माझे डोळे खाड्कन उघडले. माझ्या टेबलावरच ते पत्र सतत मी ठेवत असे. शांत होत असे. यातूनच पुढे 'कविता-रती' या नियतकालिकाचा जन्म झाला व एक वेगळे मनाला समाधान देणारे काव्यसेवेचे नवे पर्व सुरू झाले.''

३० नोव्हेंबर १९८५. बा.भ. बोरकरांचे स्मरण करीत 'कविता-रती'चा पहिला अंक त्यांनी काढला. 'कविवर्य बा.भ. बोरकर यांच्या स्मरणार्थ काव्य, काव्यविचार, काव्यसमीक्षा व कविविमर्श यांनाच केवळ वाहिलेले द्वैमासिक' अशी शीर्षस्थ ओळख 'कविता-रती'ची आहे.

कवितेवरील निस्सीम भक्ती ही संपादकीय ओळख पाटील यांनी दीर्घकाळ जपली. कवींवर प्रेम केले आणि कविता या साहित्यप्रकाराला सर्वार्थाने वाहून घेतले. मराठीतील सर्वच कवींनी 'कविता-रती'तून कविता लिहिल्या आहेत. या काळात उदयाला आलेले आणि अगोदरच्या काळात स्थिरावलेले कवी एकत्र अनुभवता येतील असे हे काव्यतीर्थ आहे. विविध वृत्ती-प्रवृत्ती, जीवनदृष्टी, जीवनानुभव 'कविता-रती'ने अंगीकारले. 'काव्यात्म' गुणविशेष असलेले, 'कवितापण' आविष्कृत करणारे लेखन 'कविता-रती'मध्ये असते. प्रदेश, लिंग, रचनापद्धती, आपले-परके सारे भेदभाव मिटवून फक्त 'काव्यात्मकता' एवढा निकष येथील कवितांच्या निवडीत ठेवला. जुने-नवे असे सारे मराठीचे भावविश्व एकत्रित अनुभवण्याची संधी 'कविता-रती'मधून मिळते. केवळ कवितेला, काव्यविचाराला येथे स्थान असल्याने 'कवी-रसिक' यांची अभिरुची घडवण्याची जबाबदारी त्यांनी निभावली. दिवाळी अंकांमध्ये समकालीन कवितांचे आणि काव्यविचारांचे संवेदनशील संमेलन भरताना दिसले. 'कविता-रती'मध्ये 'कविता' प्रसिद्धीसाठी स्वीकारल्याचा आनंदही कवींना मिळत असे. 'आलेले' आणि 'मागवून घेतलेले' साहित्य पाटील यांनी पारखून घेतलेले असायचे. संहितांसंबंधी कवींशी संवादही साधला जायचा. 'शब्द, शब्दबंध, वाक्य' याबद्दलची दुरुस्ती-पुस्ती पुरुषोत्तम पाटील सुचवायचे. काही शब्दउपयोजनाबद्दल अडून बसायचे. हे अडलेपण मात्र संयमित-विनयाचे असायचे. काव्यात्मकतेचा अनुनय करणारा संपादक म्हणून कवितांची निवड केली जायची. कवीचा आवाज दडपला जाणार नाही, याची काळजी घेतली जायची. गेल्या पंचवीस वर्षांतली नव्यांची चांगली कविता आवर्जून त्यांनी पुढे आणली. पाटील मराठीचे शिक्षक होते. इंग्रजी, संस्कृत, हिंदी कवितांचे वाचकही होते. रा.श्री. जोग, व.दि. कुलकर्णी, बा.भ. बोरकर, कुसुमाग्रज यांच्या काव्यविचारांचे पूर्वसंस्कार, स्वत:ची कविवृत्ती (रोमँटिक-हळवी), समकालीन भारतीय-इंग्रजी कवितांचे संस्कार पुढे अशोक केळकर, म.सु. पाटील, प्रभाकर बागले, गंगाधर पाटील आणखी पुढे वसंत पाटणकर यांचे काव्यविचार. सैद्धांतिक काव्यसमीक्षा यांचे संस्कार पाटील यांच्या काव्यनिर्णयात-मूल्यचिंतनात समाविष्ट झालेले होते. 'कविता-रती'चे धोरण अशा संमिश्र काव्यमीमांसकांनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे घडवलेले होते.

'कविता-रती'तून आलेला काव्यविचार विविध मर्मदृष्टींचा, आधुनिक सिद्धांतनांचा समन्वय साधणारा आहे. छंदोबद्धता, रूपकानिर्मिती, भावलयात्मकता या प्रमाणकांशी पाटील बांधील राहिलेले दिसतात. आशयस्पष्टिकरणांपेक्षा, कवींनी सांगितलेल्या गोष्टींचे सारांश मांडण्यापेक्षा कवितेचा आशयरूपवादी विचार त्यांनी महत्त्वाचा मानला मनाने, आत कोठेतरी भारतीय काव्यशास्त्राशी ते जोडलेले राहिलेले होते. नव्या कवितेचे-सिद्धांतनांचे स्वागतही ते करीत राहिले.

'कवितांची आणि कवितासंग्रहांची रसग्रहणे' देण्यामागे आस्वादप्रक्रिया, सिद्धांतनांचे उपयोजन' याचे महत्त्व त्यांना वाटत होते. 'अमूर्त-वाच्यावरचे' सिद्धांतन लटकते राहण्यापेक्षा कविता या साहित्यप्रकाराचे विशेष उपयोजनातून समोर यावेत, रसिकग्राही व्हावेत, कवितापणाच्या जागा लक्षात याव्यात ही धारणा त्यांची होती. 'कविता-रती'मधील रसग्रहणांनी रसिकपणाच्या-काव्यसंस्कारांच्या, कवी चारित्र्याच्या चर्चा म्हणूनच केल्या नाहीत. मराठीतील कविता, आस्वादप्रक्रिया प्रगल्भ करण्यात या अशा रसग्रहणांचा निश्चितच फायदा झाला आहे. 'कवी-काव्याशय-कविताटिका' वाचकांपासून दुरावताना दिसतात. व्यक्तिगत जीवन, सामाजिक-सांस्कृतिक जीवन समकालीनतेत 'कवी-साहित्य-साहित्यचर्चा' यांच्याशी कितपत संबंधित आहेत? 'कविता-रती'मधून कवी, कविता - साहित्यप्रकार, रसिक यांची घडण केली, अभिरुची निर्मिली आणि तिच्यात रसास्वादी-सौंदर्यशोधक चिकित्सा पेरली.

भा.ज. कविमंडन, म.सु. पाटील, अशोक केळकर, वसंत आबाजी डहाके, रा. ग. जाधव, वसंत पाटणकर, प्रकाश देशपांडे-केजकर आणि आणखीही महत्त्वाच्या काव्यविमर्शकांनी 'कविता-रती'तून काव्यसमीक्षा केली आहे. या काळातील (१९८५ ते आजवर) मराठी कविता, मराठीचा काव्यविचार 'कविता-

रती'ने प्रातिनिधिक स्वरूपात पुढे आणला. 'कविता-कविताचर्चा' यांच्या कालखंडाची निश्चिती करायची तर मराठी कवितेच्या इतिहासाचे पर्व म्हणून हे 'कविता-रती'चे पर्व मानता येईल, इतकी कविता-कविताचर्चा येथे झाली आहे. इतर समकालीन वाङ्मयीन नियतकालिकांनी हे कवितेचे काम केले नाही, असे नाही. 'केवळ कविता' ही दृष्टी केंद्रस्थानी असणारे 'कविता-रती' हे महत्त्वाचे नियतकालिक आहे.

'' 'कविता-रती'ची वाङ्मयीन कामगिरी' हा संशोधनपर ग्रंथ आशुतोष पाटील यांनी सिद्ध केला आहे (विजय प्रकाशन, नागपूर/२०१४) त्यात त्यांनी अनेक निष्कर्ष नोंदवले आहेत, त्यापैकी अखेरचा निष्कर्ष महत्त्वाचा आहे-

''काव्यनिर्मिती आणि काव्यव्यवहार याकडे सुजाणपणाने पाहणारे, 'कविता' या वाङ्मयप्रकाराच्या विवेकी व सर्वांगीण विकसनासाठी कार्य करणारे एक महत्त्वाचे नियतकालिक म्हणून 'कविता-रती'ने बजावलेली कामगिरी ऐतिहासिक स्वरूपाची आहे. अशा प्रकारच्या नियतकालिकांमध्ये 'कविता-रती'चे स्थान अनन्यसाधारण आहे.'' (पृ. २९५) आशुतोष पाटील यांच्या या निष्कर्षात काही वावगे नाही.

'कविता-रती' आणि 'पुरुषोत्तम पाटील' हा फक्त विशेष-नामांतला फरक मानावा इतके कविताश्रयी काम पुरुषोत्तम पाटील यांनी केले. द्वैमासिक म्हणून वेळेवर-वेळ चुकवून जेव्हा-केव्हा 'कविता-रती' समोर आले, चिंतनाचा विषय झाले, कवी म्हणून असणारी त्यांची सर्जनशीलता त्यांनी संपादनात समर्पित केली. कवीची भूमिका स्वीकारूनच हे संपादकीय-व्यवस्थापकीय काम ते करीत आले.

॥४॥

तेव्हा पुरुषोत्तम पाटील यांनी जमीनजुमला, संपत्ती, वैभव असे काही द्रव्य जमा केले नाही. निष्ठेने ते शिकवत राहिले. कवी-कविता यांच्यावर प्रेमही करीत राहिले. आपल्या सुखदुःखांना, व्यक्तिगत आघातांना सोसत राहिले. खांद्यावरचे दुःख कवितेकडे सोपवले.

'कविता-रती'चे संगोपन आणि आपल्या सौंदर्यवादी कवितेची निर्मिती, कवीवृत्तीत आत्ममग्न राहणे ही सुद्धा महत्त्वाची मिळकतच ठरते. मराठीतील काव्यसाहित्यप्रकाराची मिळकत म्हणजे पुरुषोत्तम पाटील यांच्या कविता आणि 'कविता-रती'!

**- एकनाथ पगार**
भ्रमणध्वनी : ९४२१५०७५०९

**ग्रंथाली**




## हृदयाच्या भूलगोष्टी


**कथा हृदयशस्त्रक्रियेची, जीवनाची**

**डॉ. मीना मार्कण्ड भट्ट**

**मूल्य १०० रुपये**
**सवलतीत ६० रुपये**

सेठ गोरधनदास सुंदरदास वैद्यकीय महाविद्यालय व के.ई.एम. रुग्णालय, परळ, मुंबई येथील डॉ. प्रफुल्लकुमार सेन व त्यांच्या टीमने जी मनापासून रुग्णसेवा केली त्यामुळे स्फूर्ती घेऊन हे पुस्तक लिहिले. डॉ. सेन व डॉ. अश्विनीकुमार ध्रुव ह्यांनी हृदयशस्त्रक्रिया व बधिरीकरणशास्त्राचा के.ई.एम. रुग्णालयात पाया घातला. देशाच्या कानाकोपऱ्यांतून येणाऱ्या रुग्णांना ह्याचा फायदा झाला. गेल्या सहा दशकांपासून ही परंपरा अजून तशीच चालू आहे. म्हणून ह्या पुस्तकाचा घाट घातला. ह्यातून वाचकांना हृदयशस्त्रक्रिया व बधिरीकरणशास्त्राबद्दल माहिती मिळेल अशी आशा. तसेच लेखिकेच्या जीवनाची जडणघडण व वेगवेगळे प्रसंग ह्याचे पण थोडेसे वर्णन केले आहे.

## प्रतिबिंब




**सुधीर कारखानीस**

**मूल्य १४० रु.**
**सवलतीत ८० रु.**

हा एक आगळा कथासंग्रह आहे. या कथासंग्रहातील कथा पूर्णपणे काल्पनिक आहेत आणि कोणत्याही वास्तविक प्रसंगाशी किंवा व्यक्तींशी साम्य आढळल्यास हा केवळ योगायोग असेल. तरीसुद्धा अनेक कथांतील पात्रं वाचकांना कुठे नं कुठे तरी भेटल्यासारखी, जवळून पाहिल्यासारखी वाटतील आणि त्यामुळेच या कथांना, त्यातील घटनांना जिवंतपणा आलेला आहे.



# उत्कर्षा : उत्साहाची सळसळ

प्रमोद लिमये

आपल्या ग्रंथप्रेमाने आणि माणसे जोडण्याच्या सहजस्वभावाने डॉ. उत्कर्षा बिर्जे ग्रंथालीशी जोडल्या गेल्या. आयुर्वेदातील तज्ज्ञ डॉक्टर असलेल्या उत्कर्षा साहित्याच्या चोखंदळ वाचक होत्या. २५ डिसेंबर २०१६ रोजी ग्रंथालीच्या वाचकदिनी कलावंतांच्या अभिवाचन कार्यक्रमात तर त्या सहभागी झाल्याच पण अभिवाचन स्पर्धेच्या परीक्षक या नात्यानेही त्यांनी जबाबदारी पार पाडली. त्यांची आठवण जागवणारा हा लेख...


उत्कर्षा बिर्जे हिच्याशी माझी ओळख तशी पंधरा-एक वर्षांचीच. नाट्यदर्पण, त्यानंतर अस्तित्व, आय.एन.टी. आयोजित एकांकिका स्पर्धांदरम्यान कधी स्पर्धक म्हणून तर कधी प्रेक्षक म्हणून उत्कर्षा सातत्याने भेटत असे परंतु ती ओळख खूपच अल्पशीच कारण माझी भूमिका आयोजकाची. फक्त विशेषत्वाने उत्कर्षा लक्षात राहिली त्याचे कारण तिच्यातला सळसळता उत्साह आणि हसतमुख चेहेरा. कधी कीर्ती महाविद्यालयाची प्रतिनिधी म्हणून असेल अथवा कधी दुसऱ्या कोणा परिचिताच्या, मित्रांच्या संघास मदत करण्यासाठी असेल तिची धावपळ सुरू असायची. नेपथ्यासाठी किंवा पार्श्वसंगीतासाठी कोणतीही मदत हवी असली की तिचाच पुढाकार जास्त. साधी टाचणी, सेफ्टीपिनपासून ते एखादी टेपची कॉड हवी असेल तर ''सर प्लीज एवढी मदत हवी आहे'' हे ती अशा पद्धतीने सांगणार की समोरचा नाही म्हणणारच नाही. मृदू स्वर व चष्म्याआडचे ते बोलके आर्जव. बरे मदत केली की सर्वांसमक्ष आभार मानण्यास सत्वर तयार. खरं तर तो प्रसंग आपण विसरूनही जातो पण उत्कर्षाचे वैशिष्ट्य हेच की ती दहा वर्षांनंतरही ते विसरलेली नसे.

त्याचप्रमाणे अधीमधी भेट झाली तर स्पर्धेत झालेल्या इतर एकांकिका, त्यातले दिग्दर्शन, अभिनय, संगीत व परीक्षकांचा निकाल यावर अभ्यासपूर्ण चर्चा. लक्षात यायचे की या सर्व विषयांवर तिने सखोल विचार केला आहे. त्यात मला विशेषत्वाने प्रभावित करायचे ते भाषा, व्याकरण, विषयाची व्याप्ती यांवरचे तिचे अभ्यासपूर्ण विवेचन. एक गोष्ट प्रकर्षाने जाणवायची की तिचे वाचन दांडगे असले पाहिजे. एकंदरीत एकांकिका असो नाटक त्याकडे साहित्यिक, सामाजिक दृष्टिकोनातून त्यातल्या नाट्यमयतेकडे बघण्याची तिची दृष्टी दृग्गोचर व्हायची. एकंदरीत तिचे वाचन भरपूर होते हेही लक्षात यायला वेळ लागला नाही. एक मात्र खरे आमची मैत्री कधी झाली याचा सुगावाच लागला नाही.

यानंतर कधी स्पर्धेदरम्यान तर कधी कुठल्या कार्यक्रमानिमित्ताने आमची भेट व्हायची. वर्षातून एखाद-दोनदा काही मिनिटांपुरतीच पण प्रत्येक वेळी तिच्यातला सळसळता उत्साह मात्र तोच असायचा.

दोन वर्षांपूर्वी 'चला वाचू या' या कार्यक्रमाचे एके दिवशी मला निमंत्रण आले. मीही काही वेगळे ऐकायला मिळेल या उद्देशाने या कार्यक्रमास हजेरी लावली. अचानक मला तिथे उत्कर्षा भेटली, स्वागतालाच जणू उभी होती. मग तिथेच तिने श्रीनिवास नार्वेकरशी माझी ओळख करून दिली. 'व्हिजन' या संस्थेचे प्रमुख आणि माझा नवरा अशी. तिचे लग्न झाल्याचे तेव्हाच मला समजले. समाधान याचेच वाटले की एका कलाकाराशी, रंगकर्मीशी तिने लग्न केले होते. श्रीनिवास मला ऐकून माहीत होता. एक लेखक, अभिनेता, दिग्दर्शक म्हणून पण प्रत्यक्ष परिचय झाला नव्हता. त्या कार्यक्रमाचे बहुधा ते दुसरे पुष्प होते. मला तो अभिवाचनाचा कार्यक्रम अतिशय आवडला. चार मान्यवरांनी वाचन केले होते. या सर्वांमध्ये निवेदनाच्या माध्यमातून दुवा साधण्याचे काम उत्कर्षा करीत होती. किती सहज सुंदर निवेदन करीत होती! विशेष म्हणजे त्यात उत्स्फूर्तपणा होता. आधी ज्यांनी वाचन केले त्यावर भाष्य तर लक्षणीय होतेच पण त्या अनुषंगाने तिला स्मरलेल्या कोण्या लेखकाच्या लेखनातील उतारा अथवा कुठल्या कवीच्या कवितेच्या सुंदर ओळी ती सहजपणे सांगत दुसऱ्या वाचकापर्यंत रसिकांना आणून सोडण्याचे काम चपखलपणे करीत होती, हाती ना कुठला कागद ना चिठ्ठी. एका नवीनच उत्कर्षाचा शोध मला त्या दिवशी लागला. कार्यक्रमानंतर मग आमच्या खूप गप्पा झाल्या अर्थात उत्कर्षा, श्रीनिवास, सादरकर्ते अभिवाचक सर्वच दिलखुलास बोलत होते.

त्यानंतर जवळपास प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या रविवारी 'चला वाचू या'च्या उपक्रमास हजेरी लावायचीच हा तिचा आग्रहच होता. एक-दोन रविवार सोडले तर सर्वच कार्यक्रमासाठी

'व्हिजन'चा दुसरा उपक्रम म्हणजे 'चला वाचू या' अर्थात अभिवाचन उपक्रम. ही कल्पना उत्कर्षा आणि श्रीनिवास दांपत्याचीच. अर्थात ती कल्पना त्यांनी पु.ल. देशपांडे कला अकादमीच्या आशुतोष घोरपडे यांच्यासमोर मांडली. त्यांनी ती सत्वर स्वीकारली एवढेच नव्हे तर 'अकादमी' आणि 'व्हिजन' या संस्थांनी संयुक्तपणे राबविली. पु.ल. देशपांडे कला अकादमीने विनामूल्य जागाही उपलब्ध करून दिली.

मी हजर राहिलो! मराठी साहित्यातले निवडक, वेचक काही कानावर पडत होते. अगदी अभिराम भडकमकर, जयंत सावरकर, कौशल इमानदार ते अभिजित झुंजारराव सारखे अभिवाचक आणि त्यांनी वाचिक अभिनयातून सादर केलेल्या साहित्यकृती. खरोखर साहित्याची फाईव्ह स्टार मेजवानीच असायची. मन, हृदय, कान कसे तृप्त होऊन जात असत. अर्थात आधी म्हटल्याप्रमाणे निवेदन उत्कर्षाच करत असायची. त्यातून तिच्या वाचनाचा आवाका, त्यातल्या उत्स्फूर्ततेचा आविष्कार पाहून मी स्तिमित होऊन जायचो. केवळ भरपूर वाचन असणे वेगळे आणि योग्य वेळी ते आठवून, त्याचा चपखल उपयोग करून ते श्रोत्यांना भावेल अशा रीतीने सादर करणे वेगळे. एक लक्षात आले तिला दैवी स्मरणशक्ती लाभली होती आणि तिचा सुयोग्य उपयोग करण्याची कला तिने मेहनतीने आत्मसात केली होती हेही निर्विवाद. बरे वाचन तरी किती, कोणते तर अगदी कवी ग्रेस, अनिल, कुसुमाग्रज, पाडगावकर, शांता शेळके, सौमित्र, जावेद अख्तर, ज्येष्ठ कथा-कादंबरीकार वि.वा. शिरवाडकर, आचार्य अत्रे, गुलजार, पु.ल., भालचंद्र नेमाडे, व.पु., विजय तेंडुलकर इथपासून ते आजचे नव्या पिढीचे साहित्यिक कथा, कादंबरीकार, कवी हिला नुसते माहीतच नव्हते तर त्यांच्या साहित्यावरचा तिचा अभ्यास, स्वतःचे विचार तिच्या निवेदनातून जाणवायचे. एकंदरीत तिच्या वाचनाचा आवाकाच मोठा होता. आमच्या मैत्री पलीकडे मला तिच्याबद्दल एक आदर वाटू लागला. अर्थात श्रीनिवासची तोलामोलाची साथ तिला होतीच.

बरं यापुरती तिची आवड मर्यादित नव्हती. नाटक, चित्रपट, एकांकिका बघणे हाही तिचा छंद होता. श्रीनिवासच्या नाटकाची आवड तिने जाणली होतीच. त्याच्या आवडीस तिने सर्वतोपरी सहकार्य केले, खतपाणी घातले आणि त्यातूनच प्रायोगिक नाटकाची निर्मिती घडली. 'व्हिजन' या संस्थेतर्फे श्रीनिवासने आवाजाची कार्यशाळा सुरू करावी ही मूलतः उत्कर्षाचीच कल्पना. श्रीनिवास मुंबईत कितपत यश मिळेल याबाबत साशंक होता परंतु उत्कर्षाला यशाची खात्री होती, तीच याबाबत आग्रही होती. तिचा हा विश्वास येत्या तीन वर्षांत सातत्यपूर्ण आयोजित होणाऱ्या कार्यशाळांच्या सत्रांनी खरा ठरला.


आजमितीस हा उपक्रम दर महिन्याच्या तिसऱ्या रविवारी संध्याकाळी सादर होत असतो. यासाठी रंगभूमी तसेच साहित्य क्षेत्रातील मान्यवरांनी बिनामूल्य अभिवाचन सादर केले हे खरे पण रसिकांचा उदंड प्रतिसाद हेही या उपक्रमाचे वैशिष्ट्य. चांगला उपक्रम रसिकांसाठी सादर केला तर रसिकही भरभरून दाद देतात हा या दांपत्याचा विश्वास सार्थ ठरला.

२६ फेब्रुवारी २०१७. 'चला वाचू या' या उपक्रमाचे १७वे सत्र. अभिवाचक नाटककार देवेन्द्र पेम, अभिनेते मिलिंद फाटक, लेखक-दिग्दर्शक कौस्तुभ दिवाण रसिकांची गर्दी नेहमीसारखीच. सूत्रसंचालक डॉ. उत्कर्षा बिर्जेच. नेहमीसारखाच कार्यक्रम रंगतदार झाला. कार्यक्रम संपवून उत्कर्षा, श्रीनिवास घरी पोहोचले. रात्री अचानक उत्कर्षास ताप भरल्यासारखे झाले. अस्वस्थपणा वाटू लागला. दोन दिवस घरी औषधोपचार चालू होता, पण हळूहळू श्वास घेण्यास जडपणा वाटू लागला, किंचित छातीत दुखू लागले. १ मार्च २०१७ रोजी रात्री इस्पितळात भरती करावे लागले. प्रकृती बिघडतच होती. डॉक्टरांचे शर्थीचे प्रयत्न चालू होते. प्रकृतीत सुधारणा दिसू लागली होती. १० दिवसांची अथक झुंज आणि अचानक रात्री ११ मार्च २०१७ रोजी तिचे देहावसान झाले.

ईश्वरावर तिची श्रद्धा होती त्यानेच तिला आपल्याकडे बोलावले. या जगातली अकाली, अवेळी घेतलेली उत्कर्षाची एक्झिट कुटुंबाला, मित्रपरिवाराला, साहित्यप्रेमींना चटका लावून गेली. या सर्वांच्या हृदयातील तिच्या स्थानाला मात्र कोणी हिरावून घेऊ शकणार नाही.

**- प्रमोद लिमये**
भ्रमणध्वनी : ९८६९०६६१७१
pramodvlimaye@gmail.com


# साधना प्रकाशनाची दोन नवी पुस्तके




पाने ६८ । किंमत ५० रुपये

## डिकन्स आणि ट्रोलॉप : गोविंद तळवलकर

इंग्लंडच्या वाङ्मयाचे कालखंड देशाच्या राजाच्या वा राणीच्या नावाने ओळखले गेले आहेत. शेक्सपिअर पहिल्या एलिझाबेथच्या युगाचा. एकोणिसाव्या शतकातले वाङ्मय राणी व्हिक्टोरियाच्या युगाचे मानले जाते. व्हिक्टोरियाचा जन्म १८१९ चा. तिच्याकडे राज्यपद आले १८३७ मध्ये आणि ते चालले १९०० पर्यंत. या कालखंडातील वाङ्मयाची काही सर्वमान्य वैशिष्ट्ये आहेत. या काळाचे प्रतिनिधी हा मान चार लेखकांना मिळतो. चार्लस् डिकन्स, जेन ऑस्टिन, विल्यम थॅकरे आणि ॲन्थनी ट्रोलॉप. यापैकी डिकन्सचे द्विजन्मशताब्दी वर्ष २०१२ मध्ये तर ट्रोलॉपचे द्विजन्मशताब्दी वर्ष २०१५ मध्ये येऊन गेले. त्या निमित्ताने लिहिलेल्या दोन दीर्घ लेखांचे हे पुस्तक आहे.




पाने २०४ । किंमत २०० रुपये

## मधुघट : गोविंद तळवलकर

अभिजात ललित आणि वैचारिक साहित्य, शास्त्र तथा कलाकृतींना देशकालाचे बंधन नसते. शेक्सपिअर, जेन ऑस्टिन, टॉलस्टॉय, पास्तरनाक, टागोर इत्यादी प्रतिभावंतांच्या साहित्य-शास्त्र-कलेचा तसेच त्यांच्यावरील लिखाणाचा आस्वाद घेणे हे उद्यानविहारासारखे अल्हाददायक असते. या साहित्य-शास्त्रकलेच्या उद्यानात मधुकर वृत्तीने रसास्वाद घेताना होणाऱ्या आनंदात वाचकांना सहभागी करून घ्यावे या उद्देशाने मी लेखन करीत आलो आहे.

**संपर्क** : साधना प्रकाशन
४३१ शनिवार पेठ, पुणे ३० , Ph. 020 24459635
sadhana.prakashan@gmail.com



# मी आणि माझी कविता

सत्यपालसिंग राजपूत

## (१) स्वप्नांचे असंख्य वेताळ

प्रेमाच्या रिसेशन काळात
हे चालू संवत्सर
घेतेय वदवून माझ्या तोंडून
बेरोजगार हृदयाचे व्याकरण

उष्यापुन्या सव्वादोन तपात
टच करून गेलेत कित्येक संन्यास
आपल्या इवल्याशा वर्तुळाला स्पर्शिकेसारखे

अज्ञानाचे लघुकोन, विशालकोन होत गेले
वाढत गेले तृष्णेच्या कणांचे वस्तुमान
आयुष्याचे हे गतिमान अवमूल्यन
आपण सेलिब्रेट करत राहिलो सालोसाल

वाईनच्या डोहात पोहून मनसोक्त
थकून भूक लागल्यावर खोदावेत
फिश-फ्रायचे पर्वत
जीभेच्या चवचाल जे.सी.बी.ने
अशा विचित्र इच्छांची वस्ती
उतरलीये आयुष्याच्या शहरात

जागेपणाच्या वटवृक्षावर
लटकून बसलेत स्वप्नांचे असंख्य वेताळ
तेच आलटून पालटून शेअर करताहेत
विक्रमाची मासूम पाठ

गेलेल्या गद्दार दशकात
छाटून टाकले गेलेय
विचारसरणीचे हात पाय डोके
आणि आजच्या मेजवानीत
'खुर-मुंडी'चा बेत असल्याची बातमी आहे

मी कविता का लिहितो? या प्रश्नावर विचार केला तर माझ्या लक्षात येते की काहीतरी सांगण्याची मूलभूत ओढ माझ्यात अस्तित्वात आहे. स्वतःचे मन हलके व्हावे अशी एक सुप्त इच्छा कविता लिखाणाच्या मागे असावी, असे माझे प्रामाणिक मत आहे. काहीतरी सांगण्याची प्रक्रिया तर इतर गद्य लिखाणातूनही होऊ शकते. मग कविताच का?

मला असे वाटते की भाषेचा जन्म होतानाच कवितेचा जन्म झाला. त्यामुळे कविता हा माणसाच्या मूळ भाषेचाच गाभा आहे. माणूस जसा जसा विचार करू लागला, तशी तशी त्याच्या भाषेची गद्यात्मकता वाढत गेली. त्यामुळे कविता आणि इतर गद्य लिखाणात खूप फरक पडतो. कवितेचा जन्मच मुळात सुप्त मनात होतो असा माझा अनुभव आहे. त्यामुळे गद्य लिखाणात जसे लिहिताना तर्क आणि विचारांचे नियंत्रण ठेवता येते तसे कवितेच्या बाबतीत करता येत नाही. जे कवीच्या सुप्तमनात ठाण मांडून बसले आहे, ते जसेच्या तसे लाव्हासारखे उफाळून येते आणि कवितेचा ज्वालामुखी कागदी भूपृष्ठावर प्रकट होतो. त्यामुळे कविता ही ठरवून, वेळ काढून विचारपूर्वक केलेली कृती नसते.

आपण जगत असताना अनेक गोष्टींशी आपला संबंध येतो. समाज, संस्कृती, मूल्यव्यवस्था, कायदा, आपल्या इच्छा-आकांक्षा, वासना, अपुरी राहिलेली स्वप्ने, आर्थिक-राजकीय-सामाजिक अन्याय आणि शोषण, कुटुंब, निसर्ग, अस्मानी-सुलतानी संकटे अशा हजारो बाबी सांगता येतील. या सगळ्यांचा आपल्या मनावर परिणाम होत असतो. यातून एक अस्वस्थता आपल्या मनात निर्माण होत असते. दुःख आणि वेदना तर मानवी जगण्याच्या पाचवीलाच पुजलेली आहेत. समस्या दूर करण्याचा आपण जिवापाड प्रयत्न करत असतो पण शेवटी माणूस म्हणून आपल्या शक्तीला मर्यादा आहेत. खरी कविता या अस्वस्थतेतूनच जन्माला येते. म्हणजे काहीच पर्याय नसतो म्हणून कवीला कविता लिहावी लागते. त्यातून कॅथार्सिस होते, असा माझा अनुभव आहे.

## (२) काळाचा प्रदीर्घ इतिहास

कसली अजागळ संध्याकाळ अवतरलीये घरात
उंदीर गिळून पडलेल्या अजगरासारखी सुस्त

कसले अंतिम विधान केले होते बुद्धीने छातीठोक
परस्पर भांग खाऊन सुप्तनिद्रेत जाण्याआधी

कसली अपूर्णता ठासून भरलीये माझ्या आत-बाहेर
अवकाशातील निर्गुण निराकार पोकळीसारखी निर्वात

नामुष्कीचा कोणता पुरस्कार झालाय घोषित नव्याने
आणि सांत्वनपर कुणाचा साधा मिस्डकॉलही नाही

काळाचा इतिहास लिहीलाय स्टीफन हॉकिंगने दिमाखात
शंका फिटेल माझी असा त्यात नाहीये छोटासाही संदर्भ

कसले चुंबकीय स्पर्श उचंबळून येताहेत देहभर
नेणीवेत कंझर्व झालेल्या अति-दुर्गम क्षणांचे

काहीतरी सांगायचं राहून गेलंय निघून गेलेल्या पोरींना
त्यांची भाषाच जमली नाही नेमकी मला आयुष्यभर

कसला एकटेपणाचा टेंभा पेटवलाय अंत:करणात
की रॉकेल छिडकणाराही जवळ कुणीच नाहीये उभा

झोप उडवणाऱ्या आदिम जुलमी प्रश्नांनी
अतोनात जिंदगीग्रस्त झालाय विद्याधर वैद्य

किती खाऊ घालाव्यात पुन्हा झोपेच्याच गोळ्या
पुराणातले विमानच पाहिजे आता प्रयाणासाठी सदेह

उपाशीच आजन्म ऐकतोय पोटातील कावळ्यांची ओरड
जेवण गोड न लागण्याचा भोगतोय आमरण शाप

डोळ्यांत टचकन उमलून येणारे अश्रू आहेत काही बाकी
आणि संध्याकाळी अंगभर बारीक ठणकणारा ताप


सध्याचा काळ हा अनेकविध जाणिवांच्या संमिश्रणाचा असल्याने मी माझ्या अनुभवाबद्दल बोलतो कारण स्वत: शेतकरी कुटुंबातला असल्याने मला एखादी कृषिजन संस्कृतीतली कविता पण अपील होते त्याच वेळी महानगरी परात्मता व्यक्त होणारी कविता पण मला आवडते किंवा सामाजिक भूमिका घेणारी क्रांतिकारी कविता पण तितकीच चांगली असू शकते आणि त्याच वेळी एखादी अस्तित्वविषयक प्रश्नांची मांडणी करणारी आध्यात्मिक कविता पण मला आवडते. सगळा संकर झालाय डोक्यात.

कवीने आपल्या जाणिवांशी प्रामाणिक असणं मला सर्वाधिक महत्त्वाचं वाटतं. आपल्या आत जे सुरू आहे ते जसेच्या तसे कवितेत येऊ देणे मला महत्त्वाचे वाटते. कवितेत केवळ आशावादाचाच आग्रह धरणे बरोबर होणार नाही. तसे असते तर ऋत्विज काळसेकरची कविता मराठी कवितेत काउंट करणार की नाही, या प्रश्नाचे उत्तर द्यावे लागेल. मानवी मन मुळातच इतके व्यामिश्र, गुंतागुंतीचे, unpredictable आणि गूढ असताना कवितेत अमुक अमुक गोष्टीच आल्या पाहिजेत हा आग्रह धरणे म्हणजे सत्य आणि वास्तवाशी फारकत घेतल्यासारखे होईल.

कुठलाही कलावंत म्हणा अथवा कवी म्हणा हा समाजाचाच घटक असतो. त्यामुळे जगताना जी जी परिस्थिती त्याच्या समोर येते, त्याला प्रतिक्रिया देणे हे त्याचे कामच आहे. समाजापासून वेगळं आणि अलिप्त असं काही तो जगू शकत नाही आणि राहूही शकत नाही. त्यामुळे कलेत त्याचा समाजाशी असलेला संबंध आणि त्याचा समाजविषयक दृष्टिकोन व्यक्त होतच असतो. जीवनाला अनेक पैलू असल्याने ते सारेच त्याला कवेत पकडून कलेत मांडता येईलच, असेही काही नाही. कलावंतावर तो ज्या वर्गात जगतो, त्या वर्गाच्या म्हणून काही मर्यादा पडतात. हे केवळ वर्गाच्या बाबतीतच नव्हे तर जाती, लिंग, प्रदेश किंवा त्याचे वसतिस्थान याबाबतही लागू होते. अशा मर्यादा कलेच्या आकलन आणि आस्वादाच्या बाबतीत रसिकावर किंवा कवितेच्या बाबतीत वाचकावरही पडतात. त्यामुळे कला आणि समाज ही भानगड वाटते तितकी सोपी नाही.

कवितेचा जन्मच मुळात मनाच्या अबोध स्तरावर होत असल्याने कवितेत हेच यावे आणि हे येऊ नये अशी काही काळजी घेता येत नाही. कवितेविषयी गद्यात १००% तर्कशुद्ध बोलता येत नाही, हाच तिचे कवितापण टिकवून ठेवणारा स्थायीभाव आहे. आपले आयुष्य हीच कवितेची पार्श्वभूमी असते. कवितेच्याही आवाक्यात येणार नाही इतके अफाट, अथांग, व्यामिश्र, बहुआयामी, नैकरेषीय, अनाकलनीय आणि परस्पर अंतर्विरोधांचे अस्तित्व आयुष्यात आहे.

**– सत्यपालसिंग आधारसिंग राजपूत**
भ्रमणध्वनी : ९२२६७१५८३८
rajputsatyapalsingh08@gmail.com




# आमचा अभ्यासगट

**प्रल्हाद काठोले**

> **प्रल्हाद काठोले पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यात जिल्हा परिषदेच्या शाळेत प्राथमिक शिक्षक म्हणून कार्यरत असून मुंबई मराठी ग्रंथसंग्रहाच्या वतीने देण्यात येणारा चरित्रकार वि. ह. कुलकर्णी स्मृतिपुरस्कार नुकताच प्रल्हाद काठोले यांच्या 'गोष्ट गुरुजी घडण्याची' या पुस्तकास देण्यात आला...**

शिक्षण हा एक व्यवसाय आहे आणि शिक्षक हा एक व्यावसायिक आहे ही बाब देशाच्या शैक्षणिक धोरणांनी वेळोवेळी पुनरुच्चारित केली आहे. शिक्षणक्षेत्राकडे व्यवसाय म्हणून कसे पाहिले जाईल आणि शिक्षक त्या दृष्टीने सक्षम कसा होईल याचा विचार करता आपल्याकडे अजूनही तेवढ्या सक्षम व्यवस्था उभ्या राहिलेल्या नाहीत. आपल्याकडे सेवापूर्व प्रशिक्षणांतून जे शिक्षणशास्त्र शिकतो ते किमान पन्नास वर्षे जुने असते. खरंतर शिक्षणशास्त्रात आता खूपच विकास झाला आहे. ते विकसित आणि अद्ययावत ज्ञान शिक्षकांपर्यंत पोहोचवण्याची व्यवस्था आपल्याकडे अजूनही तेवढी विकसित झालेली नाही. काही प्रमाणात सेवांतर्गत प्रशिक्षणांची व्यवस्था अस्तित्वात आहे, पण त्या प्रशिक्षणांच्या दर्जावरून, ज्या पद्धतीचे प्रशिक्षक तयार केले जातात त्यावरून शिक्षणक्षेत्रातील अद्ययावत ज्ञान शिक्षकांपर्यंत पोहोचवण्याचे काम नेमकेपणाने होत आहे असे म्हणण्याजोगी परिस्थिती अजूनही नाही. अशाही परिस्थितीत प्रशिक्षणात असेपर्यंत फार काहीतरी नवे मिळाले आहे असे वाटते आणि वर्गात ते वापरून पाहायला गेले की गोंधळ उडतो. त्यावेळी आलेली अडचण सोडवायला कुणीही नसतो किंवा ज्याच्याकडून योग्य उत्तर मिळेल असाही कुणी आसपास नसतो. डॉक्टरला जशी नवनव्या संशोधनांचा परिचय करून द्यायला परिषदांची सोय असते तशी व्यवस्था शिक्षकांसाठी जवळपास अस्तित्वातच नाही. यावर मात करता यावी आणि शिक्षकाला समृद्ध करता यावे यासाठी अभ्यासगटाची कल्पना पुढे आली.

परिसरातील शिक्षकांनी काही ठराविक दिवसांनी एकत्र जमून आपल्याला वर्गात शिकवताना येणाऱ्या अडचणींवर चर्चा करायची आणि त्यावर उपाय शोधायचे. हे उपाय शोधण्यासाठी वर्गातल्या गुणवत्तापूर्ण कामांच्या संदर्भात असलेल्या वेगवेगळ्या राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय संशोधन प्रकल्पांचे अहवाल वाचायचे. ते समजून घ्यायचे. त्यामागील मानसशास्त्रीय भूमिकेचा विचार करायचा. मग त्या संशोधनातला नेमका कोणता भाग आपल्या वर्गातल्या समस्येसाठी लागू पडतो हे पहायचे आणि त्याच्या अंमलबजावणीसाठी त्या बैठकीत नियोजन करायचे. नियोजन अधिक नेमकेपणाने करण्यासाठी जाणकाराने मार्गदर्शन करायचे. अशी ही अभ्यासगटाची संकल्पना.

आमच्या अभ्यासगटाची पहिली सभा झाली २७ जानेवारी २००८ रोजी. या अभ्यासगटाला येणाऱ्यांना वर्षाच्या पहिल्याच सभेत काही वाचनसाहित्य (reading material) वितरित केले जात असे. ज्याने त्याने आपल्याला झेपेल असे वाचन निवडून त्याच्या मांडणीची तयारी करायची अणि पुढच्या प्रत्येक अभ्यासगटाच्या सभेत दोघाजणांनी आपले सादरीकरण करायचे असे ठरलेले असे. त्यामुळे आपापल्या सादरीकरणासाठी आवश्यक असलेले इतर साहित्य आपोआपच वाचनात यायला लागले. सोबतच सादरीकरणामध्ये ज्या काही गडबडी होत म्हणजे वाचनातील महत्त्वाचा मुद्दा दुर्लक्षिला जाणे तसेच अतिशय महत्त्वाच्या मुद्याला कमी महत्त्व देणे, वेळ न पाळणे, योग्य शब्दांचा, वाक्यांचा वापर न करणे, आवाजाची पातळी, आवाजाची पट्टी यांचा विचार न करणे किंवा समोर बसलेल्यांकडून प्रतिसाद मिळवत-मिळवत प्रभावी सादरीकरण न करणे या सर्वांबद्दलची सजगता आणि हे नेमकेपणाने कसे करावे याचे धडे अभ्यासगटाच्या सभांमधून अगदी प्रत्यक्षच मिळत असत.

सादरीकरण झाले की वर्गातल्या कामाबाबत चर्चा होत असत. वर्गात मुलांसोबत शैक्षणिक काम करत असताना कोणकोणत्या अडचणी येतात, त्या कशामुळे येत असतील, त्यासंबंधी कोणते राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय संशोधन असेल तर ते वाचून समजून घ्यायचे आणि त्यानुसार वर्गात काम करण्याचे नियोजन तयार करायचे. पुढच्या अभ्यासगटाच्या सभेत केलेले नियोजन चालले किंवा नाही चालले, किती प्रमाणात चालले, कशामुळे चालले किंवा नाही चालले याचीही चर्चा होत असे. यामुळे आमच्या वर्गातल्या कामांत अधिक नेमकेपणा यायला लागला होता.

गणितातली एकेक संकल्पना समजून घेऊन ती कशी शिकवायची हे समजून घेण्यात अभ्यासगटाची संपूर्ण एक सभा जायची. 'एक संकल्पना एक दिवस' असं समीकरण साधारण अडीच तीन वर्षे तरी चाललं होतं. यामुळे नियमितपणे अभ्यासगटाला हजेरी लावणाऱ्या सर्वांचा गणिताचा आशय बऱ्यापैकी पक्का झाला. तसेच तो आशय वर्गात कसा शिकवायचा याचे शास्त्र आणि ठोकताळे पक्के व्हायला मदत झाली.

तिसरी-चौथीच्या भूगोलातील एकेक संकल्पना समजून घेतांना आमचा पूर्ण दिवस जायचा. पृथ्वी सूर्याभोवती कशी फिरते, त्याचे परिणाम काय होतात? चंद्र पृथ्वीभोवती कसा फिरतो? त्याचे परिणाम काय होतात? पृथ्वी स्वत:भोवती कशी फिरते? त्याचे परिणाम काय होतात? लीप वर्ष का असते? इंग्रजी महिने आणि मराठी महिने यांच्यात फरक का पडतो? भारतीय राष्ट्रीय कॅलेंडर म्हणजे काय? या आणि आणि अशा बऱ्याच संकल्पनांसंबंधी आमच्या अभ्यासगटाची मुहूर्तमेढ रोवणारे निलेश सर प्रात्यक्षिकं करून दाखवायचे. मध्येच एखादा असा प्रश्न विचारायचे ज्याने आमची पार भांबेरी उडायची. मग हळूच काहीतरी छोटीशी कृती करून दाखवायचे आणि आमची गाडी रुळावर यायची. हे सगळं इतक्या सहजपणे होत जायचं की या संकल्पना शिकवणं किती गुंतागुंतीचं आहे हे आमच्या लक्षातच यायचं नाही.

अभ्यासगटामध्ये नियमित येणारे आम्ही आता चांगलेच रुळलो होतो. मधून मधून निलेश सरांशी वादही घालू लागलो होतो. मतभेद व्यक्त करू लागलो होतो. अशाच एका अभ्यासगटाच्या सभेमध्ये सरांनी जाहीर केलं, ''गणित, भूगोल आणि भाषा शिक्षणाच्या पद्धतींविषयी तुम्हाला शिकवण्यासारखं आता माझ्याकडं काही राहिलेलं नाही. आता इथून पुढचा अभ्यास आपल्याला एकत्र करायचा आहे. मला जेवढं येत होतं तेवढं तुम्हाला सांगून मी माझं डोकं रिकामं केलंय आणि नव्याने शिकायला तयार झालोय. त्यामुळे मी सांगायचं आणि तुम्ही ऐकायचं असं आता होणार नाही. प्रत्येकाने इतरांना शिकवायचं काम करायचं आहे.''

लेख वाचणे आणि सादरीकरण करण्याच्या निमित्तानं बऱ्याचशा नवनवीन शैक्षणिक प्रयोगांची माहिती तर झालीच पण प्रगत शिक्षणशास्त्राचीही ओळख व्हायला लागली होती. आम्हाला झालेली प्रगत शिक्षणशास्त्राची ओळख अधिकाधिक शिक्षकांपर्यंत, विद्यार्थ्यांपर्यंत, पालकांपर्यंत आणि सामान्यांपर्यंत पोहोचावी म्हणून आम्ही काही कार्यक्रमही आयोजित केले.

वाड्याच्या स्वामी शाळेत, दाढऱ्याला, तिळशाला आणि बालीवलीला केलेली विज्ञान खेळण्यांची कार्यशाळा हा त्याचाच एक भाग होता. आमच्यातील दोनजण अरविंद गुप्तांच्या कार्यशाळेला 'आयुका'त जाऊन आले होते. त्यांच्या मदतीने आम्ही विज्ञान खेळणी समजून घेतली आणि प्रत्येकाने वेगवेगळ्या वर्गात जाऊन सुमारे अडीचशे मुलांबरोबर हा कार्यक्रम केला. जिल्हापरिषदेच्या शाळांमधील सुमारे चारशे विद्यार्थ्यांसोबत हा कार्यक्रम आतापर्यंत केला आहे.

वाड्यामध्ये शिक्षक आणि पालकांसाठी सहा आठवड्यांचा 'शिक्षण समृद्धी' कार्यक्रम राबवला गेला. पंधरा दिवसांतून एकदा शनिवारी एकत्र बसून दोन तास भाषा, दोन तास गणित आणि दोन तासांत मराठी टायपिंग आणि शिक्षणात संगणकाचा वापर अशी तीन सत्रे होत असत. या सत्रांनाही आम्हाला तालुक्यातल्या शिक्षकांकडून आणि पालकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. शिक्षणातल्या ज्या ज्या नवीन पद्धती आम्हाला माहिती झाल्या होत्या त्या आम्ही जमलेल्या शिक्षकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला. सहा सत्रांनंतर मात्र हा कार्यक्रम आम्हाला चालू ठेवता



आला नाही, त्यामागे शिक्षकांच्या उपस्थितीतील अनियमितपणा हे जरी कारण असले तरी मुख्य म्हणजे आम्हालाही त्याचा नीट पाठपुरावा करता आला नाही, आणि अखेर तो कार्यक्रम बंद करावा लागला. याचाच आणखी एक भाग म्हणजे वसई येथे आयोजित केलेला 'शिक्षण : एक नवी दिशा' नावाचा कार्यक्रम. या कार्यक्रमात वेगवेगळ्या विषयांच्या शिक्षणातील प्रभावी पद्धतींचा थेट वर्गात कसा वापर करता येतो यावर भर होता. या उपक्रमाला वसईतील जाणकार पालक, शिक्षक, डी. एड. करणारे शिक्षक प्रशिक्षणार्थी, त्यांचे प्राध्यापक अशा सुमारे दीड हजार लोकांनी भेट दिली होती. अजूनही त्यातले काही लोक संपर्कात असतात.

तालुक्यातील आणि तालुक्याबाहेरील विद्यार्थ्यांसाठी आम्ही उन्हाळी सुट्टीत गेली तीन वर्षे सलगपणे शिबिरं आयोजित करत आहोत. या शिबिरात येताना विद्यार्थ्यांना जाणीवपूर्वक सरकारी वाहतूक व्यवस्थेनेच शिबिराच्या ठिकाणी घेऊन जातो. तिथे एक जंगलातली सफर, तिथल्या पर्यावरणाचा अभ्यास, त्याला जोडून चित्रकला, त्याच्याशी संबंधित खेळ, पोहायला जाणे, आपली कामे आपणच करणे या बाबींवर भर देतो. जी मुलं पहिल्यांदाच शिबिरांत सहभागी होतात त्यांना मात्र फारच सांभाळावे लागते. काही काही तर झोपेतच उठून कुठेतरी चालायला सुरुवात करतात, काहींना घरी जेवायची सवयच नसते त्यामुळे शिबिराच्यावेळी आमच्यातले प्रत्येकजण डोळ्यांत तेल घालून मुलांसोबत असतात.

अभ्यासगटाच्या वतीने आम्ही पर्यावरणाशी संबंधित उपक्रमही हाती घेतले. आमच्या गावाशेजारून वैतरणा नदी वाहते. याच नदीच्या काठी तिळसे या गावी नदीच्या मधोमध खडकांच्या उंचवट्यावर सुंदर असं शंकराचं देऊळ आहे. या देवळाच्या बाजूला नदीच्या प्रवाहात खडकांमध्ये मोठाली कुंडं तयार झालेली आहेत. या कुंडांमध्ये, आसपासच्या परिसरात दुसरीकडे न आढळणारी अशी एक माशांची प्रजाती आहे. साधारण तीन-चार फूट लांबीचे आणि जवळपास तीस ते चाळीस किलो वजनाचे हे मासे असतील. या माशांना आमच्याकडले लोक 'देवाचे मासे' म्हणतात. महाशिवरात्रीला येथे मोठी जत्रा भरते. दिवसभरात चाळीसेक हजार लोकं जत्रेत जमतात. नदीतले हे 'देवाचे मासे' फक्त शिवरात्रीच्या दिवशीच दिसतात असा बऱ्याच जणांचा गैरसमज आहे. त्यामुळे या दिवशी खूप लोकं या कुंडांभोवती मासे पहायला जमा होतात. आपल्याजवळ जो असेल तो खाऊ या माशांना टाकतात आणि त्यामुळे वर आलेले हे मासे पहायला मिळतात. काही श्रद्धेपोटी खाऊ टाकतात तर काही फक्त मासे पाहण्यासाठी टाकतात. एकाच दिवशी भरपूर खाऊ पाण्यात पडत असल्याने सुरुवातीचा थोडा वेळ हा खाऊ मासे खातात पण नंतर काही ते खात नाहीत. त्यामुळे पुढचे खूप दिवस कुंडातले पाणी घाणेरडे झालेले असते.

२००७ साली जून महिन्याच्या सुरुवातीला जेव्हा पहिला पाऊस पडला त्या वेळी या माशांमधले सुमारे चारशे मासे मेले. आम्ही अभ्यासगटाच्या सभेत याची चर्चा केली आणि पुढच्या महाशिवरात्रीला 'मासे वाचवा अभियान' सुरू करायचं ठरलं. या माशांबद्दल जेव्हा शास्त्रीय माहिती गोळा करायला लागलो तेव्हा ही प्रजाती 'महाशीर' नावाच्या माशांच्या प्रजातीशी मिळती जुळती असल्याचं कळलं आणि या प्रजातीचे मासे हे फक्त सह्याद्रीच्या पट्ट्यातच आढळतात हे कळलं. त्याचबरोबर ही प्रजाती आता नष्टप्राय होत आलेल्या प्रजातींमधली एक प्रजाती आहे हेही कळलं. पाणी कमी झालेलं असतांना माशांचं हे कुंड स्वच्छ असणं आवश्यक होतं हे लक्षात आलं.

२००८ च्या महाशिवरात्रीला कुंडाचा हा भाग स्वच्छ रहावा यासाठी आम्ही या परिसराभोवती मानवी साखळी तयार करण्याचं ठरवलं. लोकांनी कुंडात खाऊ टाकू नये यासाठी आवाहन करायचं ठरवलं. तरीही जर कुंडात कुणी खाऊ टाकला तर तो लगेच काढून घेण्याची व्यवस्थाही करण्याचं ठरवलं. या सगळ्यामुळे लोकांच्या धार्मिक भावना दुखावल्या जातील अशी भीती आम्हाला होतीच. यासाठी सर्वच्या सर्व खाऊ माशांना न टाकता तो खाऊ आमच्याकडे जमा करा असे आवाहन केले. आमच्यातलाच एक स्वयंसेवक नियमितपणे थोडा-थोडा खाऊ या माशांना येऊन टाकील असंही सांगितलं. सुरुवातीला लोक ऐकेनात, पण सततच्या लाऊड स्पीकरवरील आवाहनाने आणि कुंडात टाकलेला खाऊ आम्ही लगेच काढून घेत आहोत हे पाहून लोकांनी पाण्यात खाऊ टाकणं कमी केलं. पहिल्याच वर्षी संध्याकाळपर्यंत आम्ही दहा-बारा पोती पाण्यातला कचरा काढला होता. या उपक्रमाला अभ्यासगटाच्या सर्व सदस्यांनी तसेच 'क्वेस्ट'च्या सर्व सदस्यांनी प्रचंड मेहनत घेतली होती. गेली सहा-सात वर्षे हा उपक्रम सातत्याने सुरू आहे. आता मात्र पाण्यात माशांसाठी खाऊ टाकण्याचं प्रमाण खूपच कमी झालं आहे. या बाबतची जागृतीही आता वाढत चालली आहे. वाड्याच्या तनिष्का महिला गटानेही या उपक्रमात यावर्षी आपली उपस्थिती दाखवली. शेजारच्या गावांमधली युवा मंडळेही आता या उपक्रमात सहभागी होतात. आपल्या बाजूचा जर कुणी पाण्यात खाऊ टाकत असेल तर त्याला थांबवण्याचा प्रयत्न मासे पहायला आलेले लोकच आता करायला लागले आहेत. यामुळे आता हे कुंड शिवरात्रीच्या दिवशीही स्वच्छ राहू लागलं आहे.

कितीही कठीण काम असले तरी सततच्या प्रयत्नांनी लोकांच्या वागण्यात फरक पडू शकतो याचा प्रत्यय या उपक्रमामुळे आला. आपल्याकडच्या धार्मिक जत्रांमध्ये होणारी लोकांची गर्दी व लोकांनी केलेला कचरा हे जर टाळायचे असेल तर लोकशिक्षणाला पर्याय नाही. शिक्षण नेहमी वर्गाच्या चार भिंतींमध्येच व्हायला हवे असे नाही, या निलेश सरांच्या शब्दांची प्रचितीच यातून आली.

पालक आणि शिक्षकांसाठी 'आम्ही मिळुनी सारे' नावाचा आणखी एक कार्यक्रम याच वर्षी आम्ही सुरू केला. यामध्ये शिकण्या शिकवण्यासंदर्भातील कोणत्याही एका मुद्यावर त्या विषयातील तज्ज्ञ पाऊण तास माहितीपूर्ण सादरीकरण करतात अणि पाऊण तास खास त्या विषयासंबंधी चर्चेसाठी असतो. आतापर्यंत आम्ही बालशिक्षणाची गरज, मुलांचे भाषाशिक्षण, सहभागी वाचन, भाषाशिक्षणात ग्रंथालयाचे स्थान, ग्रंथालयाचे उपक्रम, भाषिक सत्ता, गणित गप्पा अशा विविध विषयांना स्पर्श केला.

विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकातील माहिती देणे म्हणजे शिकवणे



असा आजही एका मोठ्या समाजाचा गैरसमज आहे. त्या गैरसमजापोटी शिक्षक किंवा पालक काहीतरी माहितीची रेकॉर्ड अथवा संगणकात ठेवलेली पाठ्यपुस्तके मुलांसाठी मोठ्या पडद्यावर किंवा संगणकावर लावतात. शिक्षण म्हणजे माहिती देण्याचे काम असाच जर समज असेल तर ते काम शिक्षकांपेक्षा यंत्र जास्त प्रभावीपणे करू शकते. मग शिक्षकांची गरजच उरणार नाही. सध्या वरच्या वर्गातील मुलांच्या बाबतीत हे सत्यही ठरायला लागले आहे. जी माहिती हवी ती इंटरनेटवर शोधून वाचता येते, खान अकॅडमीसारख्या वेबसाईटवर घरबसल्या ती उपलब्ध होते. मग वर्गात जायचे तरी कशाला? असा प्रश्न मुलं विचारतीलही. कदाचित त्यांना ते विचारण्याचे स्वातंत्र्य दिले तर...! पण शिक्षण म्हणजे इतके निर्जीवपणे घडणारी प्रक्रिया नाही. शिक्षणाचे काम हे जिवंत मेंदूसोबतचे आहे त्यामुळे त्या जिवंत मेंदूतील विचारांना समजून घ्यायला समोर जिवंत मेंदूच असला पाहिजे. निर्जीव यंत्र ते समजू शकणार नाहीत. डोळ्यांची सर्जरी करणारी अगदी उच्च तंत्रज्ञान असलेली अद्ययावत यंत्र कुणाच्याही हातात दिले तर ते स्वत:हून डोळ्यांचे ऑपरेशन करू शकत नाही. त्यामगे विचार करणारा, निर्णय घेणारा मेंदू आवश्यक आहे. जितकी अद्ययावत यंत्र तितकेच अद्ययावत हात आणि ती मशिन वापरण्याचे ज्ञान डॉक्टरला असायला पाहिजे.

आमची अभ्यासगटाची सभा ही साधारण महिन्यातून एकदा व्हायची. विराज घरत नावाचा आमचा सहकारी साधारण एकशे ऐंशी किलोमीटरवरून मोटारसायकलने नियमित यायचा. बरेचजण खूपच लांबचा प्रवास करून अभ्यासगटासाठी यायचे. काही जणांना महिन्यातून एकदाही यायला जमायचे नाही किंवा कुणाला अडचण असली तर त्याला मागच्या अभ्यासगटात काय झाले याची माहिती मिळायची नाही. एकमेकांमधील अंतरांचा विचार करता महिन्यातून एक वेळा भेटणे देखील अवघड होतं. महिनाभराच्या काळात फोनवरून संपर्क व्हायचा पण त्यालाही काही मर्यादा होत्या. म्हणून मग एकमेकांच्या संपर्कात राहण्यासाठी क्वेस्टच्या वेबसाईटवर फोरमची तयारी केली गेली.

फोरम तयार झाला पण आता प्रश्न होता तो संगणक हाताळण्याचा. संगणक ही काळाची गरज आहे व बऱ्याचशा गोष्टी त्यामुळे सोप्या होतात हा आग्रह आमचे संगणक मार्गदर्शन नितीन निमकर यांनी प्रारंभापासून धरला आणि मी त्याचा पुरेपूर फायदा घेतला. मराठीतून संगणकावर लिहायचं कसं? हा प्रश्न समोर आला. तेव्हा अभ्यासगटाच्या सभेत राममोहन सरांनी येऊन मराठी टायपिंगसाठी उपलब्ध असलेल्या कीबोर्ड विषयी सांगितले आणि आम्हा सर्वांसाठी संगणक आपल्या भाषेतून उपलब्ध झाला. ज्यांनी ज्यांनी ठरवून दिलेल्या मराठीच्या इनस्क्रीप्ट की बोर्डचा सराव नियमितपणे केला ते सर्व पंधरा दिवसानंतर फोरमवर लिहायला लागले. या फोरमवर कुणी वर्गात शिकवतांना येणाऱ्या अडचणी विचारतात तर कुणी त्याला उत्तरे देतात, कुणी आपला अनुभव मांडतो तर कुणी मत प्रदर्शन करतो, सारं काही शिक्षणाविषयीच. आमच्या गरजेतून तयार झालेल्या या फोरमवर आज राज्याच्या कानाकोपऱ्यातले सुमारे तीनशे शिक्षक चर्चा करतात. कुणी धडगावसारख्या अतिदुर्गम तालुक्यातून लिहितो तर कुणी मुंबईसारख्या महानगरातून. कुणी शिक्षणशास्त्र महाविद्यालयात काम करते, तर कुणी पालक आहे, केवळ स्वत:च्या मुलाच्या शिक्षणासाठी या फोरमवर आलेला. २०१२ मध्ये मराठीतील 'लोकप्रभा' या प्रथितयश साप्ताहिकाने या फोरमबद्दल शिक्षणाचे 'ऑनलाईन गाव' ही कव्हर स्टोरीही बनवली. आता व्हॉट्सअॅपच्या युगात मात्र आमचा हा फोरम मागे पडला. त्यावर पर्याय म्हणून आम्ही व्हॉट्सअपचा ग्रूप बनवला. हल्ली या गटात आमच्या शैक्षणिक चर्चा चालतात.

अभ्यासगटामुळे आपले वर्गातले काम सुधारते आहे, आपल्या स्वत:च्या ज्ञानात भर पडते आहे याची जाणीव जरी होती तरी अभ्यासगटाची उपस्थिती हा एक भरती ओहोटीचा खेळ होता. पन्नास शिक्षकांपासून चार शिक्षकांपर्यंत काहीही उपस्थिती असायची. अभ्यासगटांच्या हजेरीला ओहोटी लागण्याचं पहिलं कारण म्हणजे आमच्या मध्ये असलेल्या शिक्षणाच्या जुन्या समजुतींना बसणारे धक्के. आमची शिक्षणाबद्दलची असलेली जुनी समज मोडत होती आणि नवी समज आकाराला येत होती. पूर्वापार समजुतीने बसलेले हे मोठाले धक्के काही सर्वांना पेलवले नसावेत. त्यामुळे बऱ्याच जणांना आपले अज्ञान उघडे पडल्याची जाणीव होऊन त्यांनी अभ्यासगटाला रामराम ठोकला. बऱ्याच जणांना इच्छा असूनही आठवड्यातून मिळणारा सुट्टीचा एक दिवस गमावणं शक्य व्हायचं नाही त्यामुळं त्यांची उपस्थिती अनियमित असायची. जे शिक्षक विभक्त कुटुंबात राहतात त्यांच्यासाठी महिन्यातला एक रविवार गमावणं जरा कठीणंच होतं. काही जणं लग्न होईपर्यंत नियमितपणे अभ्यासगटाला यायचे पण ही मंडळी लग्नानंतर जवळ जवळ गायबच झाली. अभ्यासगटाच्या आठ दहा सभांनंतर नियमित येणाऱ्या लोकांचा शिक्षणातला विचार बराच पुढे गेलेला होता, त्यामुळे त्यानंतर आलेल्या कोणत्याही व्यक्तीला अभ्यासगटातील चर्चांशी जमवून घ्यायला जड जायचे. त्यामुळेही काही मंडळी गळायची. तरीही अभ्यासगटाच्या आजतागायत ऐंशी सभा झाल्या.

अभ्यासगटाला उपस्थित असलेला प्रत्येकजण (निलेश सरांसह) त्या एका सभेसाठी पन्नास रुपये वर्गणी द्यायचा. आमच्या

'क्वेस्ट' ही संस्था गेली दहा वर्षे पालघर जिल्ह्याच्या अतिदुर्गम समजल्या जाणऱ्या भागात शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी कार्यरत आहे. संस्थेचे काम ठाणे, पालघर, नंदूरबार, धुळे, जालना, पुणे, नांदेड, रत्नागिरी असे वेगवेगळ्या ठिकाणी चालू आहे. अंगणवाडीतील मुलांच्या शैक्षणिक विकासासाठी 'अंकुर', शिक्षकांच्या निरंतर व्यवसायिक विकासासाठी 'शिक्षक' अंतर्गत भाषा व गणित शिक्षणासंदर्भात मराठीतून पहिले ऑनलाईन कोर्सेस, इयत्ता पाचवी ते सातवीच्या वर्गात अधिक लक्ष देण्याची गरज असलेल्या मुलांसाठी 'सक्षम' इयत्ता पहिली ते पाचवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या भाषा शिक्षणासाठी 'लिपी' तर गणित शिक्षणासाठी 'अंक', आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठी 'अॅक्टिव्ह लायब्ररी', लहान मुलांच्या गोष्टींचे नाटकात रुपांतर करून त्या सादर करण्यासाठी 'तारपा' असे वेगवेगळे उपक्रम वेगवेगळ्या ठिकाणी चालू आहेत. तसेच शिक्षक, पालक आणि शिक्षणात रस असलेल्यांसाठी क्वेस्टमध्ये वेगवेगळ्या विषयांवर कार्यशाळाही घेतल्या जातात.

दोन वेळच्या चहा कॉफीचे पैसे जाऊन उरलेल्या सात आठ हजारांची आम्ही वाचण्यासाठी पुस्तकं आणली. सदस्य चार असोत किंवा पन्नास निलेश सर मात्र त्याच उत्साहाने दिवसभर उभे रहायचे. म्हणायचे, ''ज्या दिवशी शेवटचा माणूस अभ्यासगटाला येणार नाही असं सांगेल त्या दिवशी आपण अभ्यासगट बंद करू.


अभ्यासगटाने कामातली मर्मदृष्टी दिली. वेगवेगळ्या घटकांकडे आणि घटनांकडे पाहण्याची एकप्रकारची तटस्थताही या अभ्यासगटाचीच देणगी आहे. तटस्थपणे एखाद्या गोष्टीचे निरीक्षण करण्याची डोळस जाणीव दिली.

फारशी अनुकूल परिस्थिती नसतांना आम्ही काहीजण अजूनही अभ्यास का करत आहोत? याचं एकमेव कारण म्हणजे अभ्यासातनं मिळणारा आनंद. परीक्षेतलं यश, अर्थिक लाभ, प्रमोशन अशा कोणत्याही प्रलोभनाशिवाय अभ्यास केला तरच हा आनंद जाणवू शकेल आणि एकदा तो जाणवला म्हणजे तो पुन्हा-पुन्हा मिळवण्यापासून आपल्याला कोणी रोखू शकत नाही.

एकाचवेळी खूप जास्त इनपुट्स दिल्याने शिक्षणात काही साध्य होणे शक्य नाही हे आता निरनिराळ्या शसकीय पातळीवरून चालणाऱ्या प्रशिक्षणांतून सिद्ध झाले आहे. शिक्षकांच्या व्यवसायिक विकासासाठी लहान लहान इनपुट्स खूप दिवसांपर्यंत देण्याची गरज आहे. अशीच व्यवस्था क्वेस्टच्या माध्यमातून आम्हाला उपलब्ध झाली. माझ्या मते अनपौचारिकपणे सुरू झालेला आणि शिक्षकांचा निरंतर विकास साधणारा हा सर्वात यशस्वी उपक्रम आहे.

– प्रसाद काठोले
भ्रमणध्वनी : ८८०५३७८८०९
pralhadkathole@gmail.com

ग्रंथाली




**धर्मधुरीण**

**डॉ. प्रकाश लोथे**

**मूल्य ६०० रुपये**
**सवलतीत ३६० रुपये**

भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या पार्श्वभूमीवर लिहिलेली ही हृदयद्रावक कहाणी बंगाली लेखक शरदचंद्रांच्या कादंबऱ्यांची आठवण करून देते.
स्त्री शिक्षण, विधवा विवाह, स्वातंत्र्यपूर्व राजकारण व देशाची फाळणी असल्या अनेक तत्कालीन समस्यांमुळे निर्माण झालेला प्रखर वैचारिक लढा चितारत, अनेक कौटुंबिक सम स्यांचे पदर सहज उलगडत जाणारी संयत भाषाशैलीतली ही कादंबरी मनाला चटका लावून जाते.

– दिनकर गांगल

**मन:पूर्वक**

**ऊर्मिला सुधीर सावंत**




**मूल्य ३०० रुपये**
**सवलतीत १८० रुपये**

मनाच्या वेगवेगळ्या पैलूंचं दर्शन या पुस्तकातून घडेल. सहजपणे हे पुस्तक आयुष्यावर भाष्य करून जातं. लेखिकेच्या मानसोपचाराच्या पोतडीतून एकेक औषध हळूच बाहेर पडतं पण त्या उपचाराच्या कडू गोळ्या नाहीत तर जगणं आनंददायी करण्यासाठी दिलेली चॉकलेटं आहे! लेखिकेच्या शब्दांत सांगायचं तर – 'आपल्या सर्वांमध्ये शिवम् सुंदरम् असं जे आहे ते हळुवारपणे जपण्याचं काम 'मन:पूर्वक' पार पाडत आहे.'

– **डॉ. मनोज भाटवडेकर**, मानसोपचारतज्ज्ञ

## नवीन मॅजेस्टिक पुस्तके




ख्यातनाम उद्योगपती धीरूभाई अंबानी यांच्या सहवासात, पातळगंगा येथील प्रकल्प. ओघानेच आलेली रिलायन्सची जबाबदारी. ती जबाबदारी पेलताना आलेली संकटे आणि त्यांच्याशी केलेला मुकाबला. महाराष्ट्र आर्थिक विकास परिषदेच्या अध्यक्षपदाची धुरा, वेगवेगळ्या पक्षांतील राजकारण्यांशी जुळून आलेले संबंध, शेतीच्या विकासासाठी अमलात आणलेल्या विविध कल्पना आणि नवनवे संकल्प पूर्ण करत असतानाच सर्वांनाच चटका लावून घेतलेला जगाचा निरोप हे सारे टप्पे या उमद्या माणसाच्या चरित्राचे अंतरंग मोकळेपणाने उलगडून दाखविणारे आहेत. नवउद्योजकांना एक नवी दिशा देणारे हे चयनी या उद्योजकाचे आत्मचरित्र अभ्यासक, संशोधक, वाचक, उद्योजक यांना नवे आयाम शोधायला मार्गदर्शक ठरेल यात शंका नाही.

– डॉ. नरेंद्र जाधव

### प्रवास एका जिद्दीचा

**मुरलीधर एन. चयनी**
**शब्दांकन : सुधीर कुलकर्णी**
**मूल्य : रु. ३००/–**




'सहकारी गृहनिर्माण चळवळ' या विषयातील प्रशिक्षणाचे महत्त्व जाणून हा विषय २८ माहितीप्रद प्रकरणे आणि संबंधित २९ शासकीय आदेश याच्या साहाय्याने या क्षेत्रात गेली ५० वर्षे कार्यरत असलेल्या नंदकुमार रेगे यांनी विविध पैलूतून विशद केला आहे.

### सहकारी गृहनिर्माण संस्थांचे व्यवस्थापन व कार्यपद्धती

**नंदकुमार रेगे**

**मूल्य : रु. ३००/–**

मॅजेस्टिक

प्रमुख विक्रेते : मॅजेस्टिक बुक स्टॉल। गिरगाव। पुणे । मो. ९९२२३४४०८१ मॅजेस्टिक बुक डेपो। ठाणे (प.), दूरध्वनी : २५३७६८६५ मॅजेस्टिक ग्रंथदालन। शिवाजी मंदिर, भ्रमणध्वनी : ९८९२२२०२३९ मॅजेस्टिक बुक गॅलरी । म्हात्रे पुलाजवळ, १०० फूट डीपी रोड, पुणे । दूरध्वनी : (०२०) ६८८८८९०८

Website : www.majesticprakashan.com | E-mail : majesticph@gmail.com

आपली आवडती पुस्तके मागविण्यासाठी Click करा www.majesticonthenet.com या साईटवर

Customer Care : 022-65666755



# वनव्रतस्थ मारुती चितमपल्ली

प्रवीण बर्दापूरकर

**भ**गवेपणाचा निकष आड न आणला जाता ज्येष्ठ साहित्यिक, 'व्रतस्थ वनसंत' मारुती चितमपल्ली यांना यंदा राज्य सरकारचा विंदा करंदीकर सन्मान जाहीर झाला आणि त्यांची झालेली पहिली भेट आठवली. विशेषत: 'महाराष्ट्र टाइम्स' या दैनिकात आलेलं चितमपल्ली यांचं लेखन वाचनात आलेलं असल्याचे ते दिवस होते. ते लेखन वेगळं होतं. त्याला अनवट असा रानगंध होता, तो आजही आहे. तसं तर, व्यंकटेश माडगूळकर. ना. धों. महानोर, र. वा. दिघे यांच्या लेखनातून रान, तेथले पशु, पक्षी, किडे, झाडं-फुलं, फळं, माती...असं बरंच काही कळलेलं होतं. ग्रामीण मातीतच जडणघडण झालेली असल्यानं माडगूळकर, आनंद यादव यांचं लेखन, महानोरांच्या कविता बेहद्द आवडायच्या- त्या लेखनाची नाळ आपल्या चिरपरिचित मातीशी आहे असं वाटायचं म्हणून ते आपलं लेखन असल्याचं फिलिंग यायचं. मारुती चितमपल्ली यांच्या लेखनाचा पोत मात्र वेगळा होता. ते माडगूळकर आणि तत्सम यांच्या पुढच्या लेखन होतं. लेखनात ललित बहर फारसा नव्हता, अलंकारिक भाषा नव्हती, काही तरी नवीन सांगत असल्याचा अभिनिवेशी थाट नव्हता आणि ज्ञानी असण्याचा आव नव्हता ; तर कृतज्ञता होती. जंगलाच्या गाभ्याला थेट भिडणारा त्यातला आशय महत्त्वाचा होता. जंगलप्रदेशाचं अपरिचित जगणं व्यक्त करणारं ते लेखन, वाचणाऱ्यानं अचंबित व्हावं अशा विलक्षण साध्या शैलीत होतं. कधी त्या लेखनानं जणू निर्सगाला कवेत घेतलंय असं वाटायचं, तर कधी रानवाटांच्या कुशीत हे लेखन छानपैकी पहुडलेलं आहे असं वाटायचं, तर कधी श्रावणसरीत त्या रानवाटा तुडवत आपणही चितमपल्ली यांच्यासोबत चालतोय असं वाटायचं, तर कधी जंगलाच्या श्वास-नि:श्वासाबद्दल अतीव आत्मीयतेनं कोणी तरी बोलतंय आणि त्याचा अनाहत नाद आपल्या मनात गुंजारव करतोय असं वाटायचं. इतकी आत्मीयता, त्या जगण्याविषयी ओतप्रोत अपार ममत्व त्या लेखनात तेव्हा होतं आणि ते नंतर अधिकाधिक घनगर्द व्यापक होत गेलं.

तेव्हा माझा पत्रकारितेचा पाडाव नुकताच नागपूरला पडलेला होता. पत्रकारितेत असल्यानं कोणालाही थेट भिडण्याइतका कोडगेपणा (या गुणाला हल्ली कॉन्फिडन्स असं म्हणतात!) तोपर्यंत अंगी बाणला होता. आधी फोन करून मारुती चितमपल्ली यांच्याशी भेटीची वेळ ठरवून घेतली. त्यांच्याशी फोनवर बोलताना मला भेटणं हा तुमचाही सन्मान आहे असा राजकीय वृत्तसंकलन करणाऱ्या पत्रकाराला शोभणारा साहजिक आविर्भाव माझ्यात असणार. मध्यम बळकटपणा प्रभावित करणारा बांधा, विस्तीर्ण भालप्रदेश, डोईवर अर्धकुरळे व काळे दाट केस, डोळ्यांवर काळ्या मोठ्या फ्रेमचा चष्मा, पूर्ण बाह्यांचा पांढरा लायनिंगचा धुवट शर्ट इन केलेले आणि पायात साध्याशा वहाणा असलेले मारुती चितमपल्ली भेटले. आधी त्यांच्या या साध्या दर्शनाने आणि नंतर त्यांचा ऋजू शब्दही जरा वरच्या पट्टीतीलच वाटावा अशा बोलण्या आणि लाघवी वागण्याने तेव्हा जे गारुड झालंय ते आजवर कायम आहे. नंतर आजवर आम्ही अनेकवेळा भेटलो. कधी नागपूरच्या लक्ष्मी नगरातील त्यांच्या अनेक किमान नवश्रीमंत मध्यमवर्गीयांच्या तुलनेतही साध्याशा फ्लॅटमध्ये (या फ्लॅटमध्ये वर्षानुवर्ष एकच बदल होत गेला आणि म्हणजे, घरातील माणसांपेक्षा पुस्तकांची संख्या अशा मोठ्या गतीनं वाढत गेली की आता त्या गर्दीत माणसंही परकी वाटतात) तर कधी कार्यक्रमात तर कधी 'साहित्यप्रसार केंद्र' या राजाभाऊ कुळकर्णी यांच्या बर्डीवरील पुस्तकाच्या दुकानात तर कधी आम्ही व्यासपीठावर सोबत असू. मारुती चितमपल्ली तसेच साधे राहिले आणि त्याच मृदूपणे बोलत राहिले.

पहिल्या भेटीनंतर अलीकडे म्हणजे, सुमारे साडेतीन दशकानंतर दोस्तयार डॉ. अनिल पिंपळापुरे यांच्या 'खगायन' या पुस्तकाच्या प्रकाशन प्रसंगी त्यांच्यासोबत नागपुरात व्यासपीठावर होतो. चितमपल्ली यांच्यातला तो साधेपणा तस्साच नाही तर बराचसा वाढलेला आणि त्या साधेपणाला खुलवणारं साधनेचं वलय आलेलं असं जाणवलं. ते निवृत्त होऊन वीस वर्षं उलटलेली होती. अंगकाठी किंचित वाकलेली, खांदे काहीसे ओघळलेले, दाढी छातीपर्यंत वाढलेली आणि व्यासंगाचं शीतल तेज चेहेऱ्यावर मंदपणे विलसत असलेले चितमपल्ली एखाद्या संत किंवा आत्ममग्न ऋषीप्रमाणे वाटले. ते त्यांचं रुपडं इतकं भावलं की आयुष्यभर वनसाधना करणारे मारुती चितमपल्ली आणि एखादा संत-ऋषी यात साधर्म्य आहे हे बोलून दाखवण्याला मी आवरच घालू

शकलो नाही.

एक खंत नोंदवायला हवी, चितमपल्ली यांनी वनातील झाडं- त्यांची पानं, बहर, फळं, फुलं, पशू, पक्षी एवढंच नाही तर किडे, अळ्या, मुंग्या याविषयी मूलभूत असं लेखन केलं. त्यावर संशोधन केलं, त्याच व्यासंगात आयुष्य झोकून दिलं; 'पक्षी' आणि उतार वयात महा तन्मयतेनं मग्न होऊन 'मत्स्य' या विषयांवर महाअचाट कोश तयार केले. हे असं काम यापूर्वी मराठीत झालेलंच नव्हतं. ना ती कविता होती ना ललित, ना कथा की कादंबरी. बरं जे काही चितमपल्ली यांनी सिद्ध केलेलं होतं ते संशोधकीय थाटाचं बोजड नव्हतं.



मराठी साहित्याला विलोभनीय चकवा देणारी ती एक अभिव्यक्ती आहे, असंही म्हणता येईल. एक म्हणजे, हे अतुलनीय असं काम आहे आणि त्यातही दोन्ही कोश तर विलक्षण संन्यस्त वृत्तीनं निर्माण झालेले आहेत पण या लेखनाची मराठीत गंभीर समीक्षा झाली नाही. कदाचित तो क्रूस पेलणं अशक्य आहे म्हणून कोणी समीक्षक त्या लेखनाची समीक्षा करून त्याचं अनमोलत्व पटवून देण्याच्या फंदात पडला नसावा.

'चकवाचांदण' हे निसर्ग साधनेच्या वेगळ्या वाटेवरचे मारुती चितमपल्ली यांचं आत्मपर लेखनही त्यांच्यातल्या साधेपणा आणि आजवर अज्ञात राहिलेल्या व्यासंगाचा ऐवज आहे, पण त्याचीही म्हणावी तशी गंभीर दखल मराठी समीक्षक आणि अभिजनांनी घेतली नाही. चितमपल्ली मार्केटिंगच्या मॉलमध्ये कधी वावरले नाहीत. स्वत:चा मठ म्हणा की पंथ निर्माण करून भक्तांचा गोतावळा करण्याच्या वाटेवर ते कधी चालले नाहीत; तसं चालणं मुळी त्यांच्या रक्तातच नाही. कोणत्या कंपूत, गटात सहभागी होताना आणि स्वत:चे ढोल स्वत:च बडवताना किंवा इतरांच्या किरट्या कर्तृत्वाचे ढोल आपण बडवून त्यांच्याकडून स्वत:च्या कर्तृत्वाचे ढोल बडवून घेतांना चितमपल्ली यांची घुसमट होईल हेच खरं. अशात भगवा घेऊन चालणाऱ्या किंवा भगव्या वाटेवर चालणाऱ्या किंवा भगव्याची कवनं गाणाऱ्या सुमारांनाही सरकारकडून 'रमणा' प्राप्त होतोय. त्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारनं केवळ वनरंगी तल्लीन राहणाऱ्या मारुती चितमपल्ली यांना करंदीकरांच्या स्मृतिदाखल सुरू केलेला सन्मान देण्याचा घेतलेला निर्णय अभिनंदनीय आहे आणि त्यांची निवड करण्याचा सूज्ञपणा दाखवणाऱ्या निवडकर्त्यांचं करावं तेवढं कौतुक कमीच आहे!

मारुती चितमपल्ली हे एक हाडामासांचे माणूस आहेत आणि त्यांनाही भावना, राग आणि लोभ आहेतच. मानवी जगण्यात उन्मळून पडावे असे प्रसंग अपरिहार्यपणे येतात तसे त्यांच्या आयुष्यात काही कमी आले असेही नाही. मात्र, त्याही प्रसंगात चितमपल्ली यांनी दाखवलेली शांत चित्तवृत्ती थक्क करणारी आहे; उन्मळून पडावं अशा प्रसंगातही वन आणि प्राणी व्यासंगाचं अग्निहोत्र कायम तेवत ठेवण्याची त्यांची वृत्ती आपल्याला नतमस्तक करायला लावणारी आहे; हा माणूस खरंच संत किंवा ऋषी आहे याची जितीजागती प्रचिती आहे. कोणतंही संकट आलं तरी शीतल छाया देण्याचं, फळण्याचं-फुलण्याचं असिधाराव्रत वृक्ष पाळतोच; तो व्रतस्थ बाणा रानावनात राहून त्या वृक्षांकडूनच बहुश्रा चितमपल्ली शिकले असावेत.

सोलापूर हे मारुती चितमपल्ली याचं जन्मगाव. त्याच सोलापूरला अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी मारुती चितमपल्ली यांची निवड झाली. तेव्हा 'कोण हे चितमपल्ली?' असा प्रश्न पडण्यासारखी स्थिती अर्थातच नव्हती. तरी त्यांच्या निवडीवरून काही अभिजन दुखावले गेले. 'सोलापूरकर' आणि 'सोलापूरच्या बाहेरचे' असा वाद रंगवला गेला. विदर्भ साहित्य संघातला वावर; त्यातही विशेषत: अनेक वर्ष मनोहर म्हैसाळकर यांच्याशी असणारी सलगी आणि एक पत्रकार म्हणून साहित्य संमेलनाच्या निवडणुका कशा लढवल्या जातात हे अनुभवल्यामुळे; सोलापूर साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी मारुती चितमपल्ली विजयी होणं ही एक औपचारिकता उरलेली होती. तरी एक कडवटपणा वातावरणात पसरवला गेला आणि मारुती चितमपल्ली यांची प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न झाला. चितमपल्ली यांचं मोठेपण असं की, प्रतिस्पर्ध्यांविषयी त्यांनी प्रचारात आणि निवडणुकीत विजय मिळाल्यावरसुद्धा किंचितही कटुता व्यक्त केली नाही. विनाकारण टीकेचे जहरी आसूड ओढले जातात तेव्हा राजकारणात वावरणारांचे सभ्यपणाचे मुखवटे कसे गळून पडतात आणि त्याचा अकारण तोल कसा सुटतो हे एक पत्रकार म्हणून जवळून बघितल्यानं तर, चितमपल्ली यांची त्या काळातील अनुभवलेली ऋजुता आणि सुसंस्कृतपणा मनाच्या कुपीत महादुर्मिळ कस्तुरी गंधासारखा जपून ठेवावा असाच आहे. अशी जी माणसं जगताना भेटली, त्यामुळेच जगण्याचा अर्थ कळला आणि त्यामुळेच जगण्याचं सार्थक झालं अशी माझी ज्यांच्याविषयी भावना आहे, त्यात एक मारुती चितमपल्ली आहेत.

(पूरक संदर्भ सहकार्य : राखी चव्हाण, नागपूर)

केवळ संदर्भासाठी = मारुती चितमपल्ली यांची (मला ज्ञात!) ग्रंथसंपदा अशी : पक्षी जाय दिगंतरा, रातवा, रानवाटा, निळावंती, प्राणीकोश, पक्षीकोश, सुवर्ण गरुड, निसर्गवाचन, शब्दांचे धन, जंगलाचं देणं, मृगपक्षीशास्त्र, केशराचा पाऊस, घरट्यापलिकडे, आनंददायी बगळे, चित्रग्रीव : एका कबुतराची कथा, नवेगाव बांधचे दिवस, चैत्रपालवी आणि चकवा चांदण : एक वनोपनिषद'. An Introduction to Mrugpakshishastra of Hansadev ( English)

– प्रवीण बर्दापूरकर
भ्रमणध्वनी : ९८२२०५५७९९
praveen.bardapurkargmail.com
www.praveenbardapurkar.com



# इतिहासाच्या पाऊलखुणांचे संवर्धन...

अरुण मळेकर

> १८ एप्रिल हा जागतिक वारसादिन! प्राचीन वारसावास्तू ही जशी राष्ट्राची अस्मिता आहे तसेच या वास्तू म्हणजे गत, वैभवशाली इतिहासाचे साक्षीदार असल्याने त्यांचे संवर्धन करणे कसे आवश्यक आहे. त्यासाठी सामाजिक, शासकीय पातळीवर काम करता येणे कसे शक्य आहे हे या लेखाद्वारे सुचवण्याचा प्रयत्न आहे...

**मा**नवाच्या प्राथमिक अवस्थेपासून ते आताच्या थक्क करून टाकणाऱ्या प्रगत तंत्रज्ञानाच्या काळापर्यंत जी अनेक भौगोलिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक, शैक्षणिक स्थित्यंतरे झाली त्यात आपल्या अंगभूत- निसर्गदत्त कौशल्यांनी जी मानवी प्रगती होत गेली त्यांचे साक्षीदार बनलेले अनेक घटक आहेत. त्यातील बऱ्याच लहान-मोठ्या वास्तूंनी जागतिक वारसा स्थळात नाव मिळवलं आहे. या जरी मानवनिर्मित कलाकृती असल्या तरी पृथ्वीमातेच्या अफाट पसाऱ्यातील काही स्थळं म्हणजे निसर्गाचा महान चमत्कार होय. त्यांच्यावरही जागतिक वारशाची मोहोर उटमलीय.

मानवनिर्मित वारसावास्तू निर्माण करणारे तसे अज्ञातच राहिले, तरी ही स्थळं म्हणजे आपल्या गत इतिहासाचे मापदंड आहेत. काही सत्ताधीशांनी दूरदृष्टीसह आपल्या धर्माबरोबर संस्कृतीचा ठसा उमटवण्याचा प्रयासही त्यांच्या उभारणीतून केला.काही वारसा स्थळांच्या पार्श्वभूमीवर आक्रमकांचा हिंसक उन्माद आहे, तर काही स्थळांच्या निर्मितीतून पराभूतांच्या वेदनेचा आक्रोश जाणवतो. इतिहासकालीन संघर्षात दोन भिन्न संस्कृतीच्या मिलाफातून ज्या नेत्रदीपक वास्तू निर्माण झाल्या त्यांनाही वारसावास्तूंची शान आहे. लहरी निसर्गाच्या प्रभावाने आणि मानवी बेफिकीर, असंस्कृत हस्तक्षेपांनी या वारसा दौलतीचे जे प्राचीन वैभव कमी-कमी होतंय ती राष्ट्राची हानी आहे. या जाणिवेतूनच ब्रिटिश काळात पुरातत्त्व खात्याची निर्मिती होऊन त्याद्वारे सखोल अभ्यास होत या वारसा स्थळांचे संवर्धन आणि जतन करण्याची संकल्पना उदयाला आली.

वारसावास्तू जतन करण्यापाठीमागे आपला प्राचीन इतिहास, संस्कृती, कलापूर्ण वास्तू यांचे संवर्धन करण्यापाठीमागे कृतज्ञ समाजधारणा कशी असू शकते याचे बोलके उदाहरण इजिप्त देशाचे देता येईल.

इ.स. १९५४ मध्ये नाईल नदीवर 'आखान' धरण बांधण्यासाठी जो आराखडा तयार केला गेला तेव्हा जे क्षेत्र पाण्याखाली जाणार होते त्यात हजारो वर्षांचा बोलका इतिहास असलेली 'सिंबेल' आणि 'फिलाई' ही प्राचीन मंदिरे होती. राष्ट्राची अस्मिता जपणाऱ्या इजिप्तवासीयांसह 'युनेस्को' या जागतिक संघटनेने या मंदिर वास्तू संवर्धन मोहिमेसाठी जनजागृती करताच ५० देशांतून सुमारे ४० अब्ज यु.एस. डॉलर जमा झाले. या पाण्याखाली जाणाऱ्या वास्तूंचे एक-एक अवशेष अलग करून उंच पहाडावर स्थलांतर करत ते पूर्ववत ठेवण्यात यश मिळाले. या घटनेतून इतिहास, परंपरा, संस्कृतीप्रेमींमध्ये विचारमंथन होऊन युनेस्कोच्या वारसा व्यवहार परिषदेसमोर जागतिक पातळीवरील वारसा संवर्धनासाठी कराराचा मसुदा तयार केला गेला.

वारसावास्तू संवर्धनाच्या विचाराला चालना प्राप्त होऊन इ.स. १९६५ मध्ये मानवनिर्मित वारसावास्तूसंवर्धनाला नैसर्गिक स्थळांचीही जोड दिली गेली. समाजमनात वारसावास्तू संवर्धनाची जाणीव जरी निर्माण झाली तरी त्यासाठी तयार झालेल्या करार मसुद्याला इ.स. १९७२ मध्ये युनेस्कोची मान्यता प्राप्त झाली. हाच 'विश्व सांस्कृतिक आणि नैसर्गिक वारसा संवर्धन करार' म्हणून ओळखला जातो. युनेस्कोच्या अखत्यारीत प्रस्थापित झालेल्या उपरोक्त उपक्रमात जागतिक वारसा यादीत समावेश होण्यासाठी काही निकष, पद्धती, घटना निश्चित झाली. त्यानुसार कोणत्याही देशातील स्थळांचा वारसावास्तू यादीत समावेश होण्यासाठी त्याला प्रथमतः अद्वितीय, सर्वव्यापी मूल्य असावे हे निश्चित केले गेले. त्यादृष्टीने निवडक निकष खालीलप्रमाणे आहेत.

**सांस्कृतिक स्थळांसाठी निकष**

१. कोणत्याही देशाचा प्रस्ताव पडताळून पाहताना मानवी कौशल्याची असामान्य कल्पकता लक्षात घ्यावी. त्या वास्तू रचनेतील तंत्रज्ञान, नियोजनासह दूरदृष्टीचाही वेध घ्यावा.

त्यातून प्राचीन काळाच्या लोप पावलेल्या मानवी संस्कृतीचा

अवशेषस्वरूप पुरावा देणे आवश्यक असावे.

२. समाजमनावर प्रभाव टाकणारी अशी वास्तूनिर्मिती हवी.

३. पृथ्वीवरील भूभाग आणि जलसंपदेच्या पार्श्वभूमीवरील पुरातन मानवी संस्कृती जेथे अस्तित्वात होती अशा स्थळांचा विचार व्हावा.

४. प्राचीन काळातील विश्वमान्यता पावलेली सांस्कृतिक कलाकृती जेथे निर्माण झाली व ज्याला पारंपरिक आणि श्रद्धेचे अधिष्ठान आहे अशा स्थळांचा विचार व्हावा.

**नैसर्गिक स्थळांसाठी निकष**

१. मानवी जीवनाला आधारभूत उपकारक असणाऱ्या अशा निसर्गसंपन्न भूभागाची निवड व्हावी.

२. पृथ्वीच्या निर्मितीपासून जी नैसर्गिक स्थित्यंतरे घडत आली त्यावरचे भूशास्त्रीय बदल विचारात घेतले जावेत.

३. निसर्ग चमत्कारांनी संपन्न भूभाग, त्यावरील नष्ट होणारे भूचर-जलचर प्राणी-पक्षी यांचे संवर्धन करण्यासाठी प्रयत्न करणे शक्य आहे अशी स्थळं निवडावीत.

यासाठी तयार केलेली यादी विस्तृत स्वरूपाची आहे. त्यासाठी सांस्कृतिक स्थळंमध्ये पुरातन वास्तू, शिलालेख, स्मारके, शिल्प वैभव, प्राचीन गुहा, प्राचीन शैक्षणिक, सांस्कृतिक पार्श्वभूमीच्या निवासस्थानांचा समावेश आहे.

जागतिक वारसा यादीत स्थळनिश्चिती करण्यासाठी उपरोक्तपणे करार, निकष, ध्येयधोरणे यांची आवश्यकता भासण्याचे एक कारण म्हणजे नैसर्गिक आपत्तीसह ऋतुमानानुसार सभोवतालच्या वातावरणात होणारी स्थित्यंतरे! हे जरी त्यांच्या नाशाचे एक कारण असले तरी मानवनिर्मित आणि निसर्गनिर्मित वारसा स्थळांना मानवी हस्तक्षेपासह विकासाच्या नावाखाली धोका निर्माण होऊन त्यांच्या अस्तित्वालाच बाधा येतेय, याची जाणीव सर्वच राष्ट्रांना आता झाली आहे. पण त्यांचे संवर्धन करण्यासाठी आर्थिक पाठबळ, पुरातत्त्वशास्त्राचे तंत्रज्ञान सगळ्याच राष्ट्रांकडे असेलच असे नाही. जोडीला देशाचे प्रशासन किती सजग असून ते किती आर्थिक मदत उपलब्ध करून देते यावरच वारसा संवर्धन अवलंबून आहे. यासाठी मनुष्याचे प्रयत्न मर्यादित आहेत.

युनेस्कोने निश्चित केलेल्या वारसा स्थळांच्या संवर्धनाला फक्त अर्थसहाय्य दिले जाते असे नाही तर या वारसा स्थळांचा ढाचा आहे त्या स्थितीत ठेवून त्याचे जतन करण्यासाठी 'युनेस्को' शास्त्रीय ज्ञान असलेल्या तज्ज्ञांचे मार्गदर्शनही मिळवून देते. 'युनेस्को' संघटनेचा मदतीचा हात पुढे असला तरी त्यावरील मालकी हक्क त्या-त्या राष्ट्राचाच असतो. वारसा यादीत समावेश केल्यावर त्या स्थळांच्या संबंधित राष्ट्राच्या प्रशासनाच्या मार्गदर्शक प्रणालीनुसार संवर्धन व्हावे हे अभिप्रेत आहे.

महाराष्ट्रातील मराठवाडा प्रदेशात भरपूर प्राचीन कलाकृती आणि वास्तू आहेत. त्यात मंदिरांची, धार्मिक वास्तूंची संख्या खूप आहे, पण त्यांचे प्राचीन स्थापत्यवैभव कसे समृद्ध होते हे जगाला सांगायला जागतिक वारसा स्थळ यादीत त्यांचा समावेश होण्यासाठी प्रयत्न झालेले नाहीत आणि त्यांच्या संवर्धनातही उदासीनता दिसते. वारसा यादीत नावलौकिक होण्यासाठी देशातून एकूण सुमारे ३५ प्रस्ताव युनेस्कोकडे सादर केले गेले, त्यात महाराष्ट्रातून नेरळ-माथेरान 'मिनी ट्रेन' आणि चर्चगेटमधील जुन्या इमारतींचा समावेश आहे. महाराष्ट्रात सुमारे ३५० किल्ले आहेत, त्यात भुईकोट, जलदुर्ग, गौरीदुर्ग, वनदुर्गांचा समावेश आहे, पण त्यांच्या संवर्धनाबाबत सामाजिक व शासकीय पातळीवरही उदासीनता आहे. त्यातील महाराष्ट्राच्या अस्मितेचा मानबिंदू असलेल्या परिपूर्ण रायगडावरही वारसावास्तूची मोहोर उमटलेली नाही.

वारसावास्तू यादीच्या प्रतीक्षेत असलेल्या अनेक वास्तू पुरातत्त्व खात्याच्या अखत्यारीत आहेत. त्यांचे संवर्धन हा फक्त प्रसारमाध्यमांतील एक चर्चेचा विषय होत असतो.

आता पर्यटनातील स्थळ दर्शनात वारसावास्तूदर्शन सहल (HERITAGE WALK) आयोजित केली जाते. यातून वारसावास्तूंच्या गुणवत्तेसह त्यांचे सांस्कृतिक, ऐतिहासिक महत्त्व समाज मनात खचितच रूजेल. एक प्रोत्साहनात्मक उपक्रम म्हणून शासनाने अनुदानासह योग्य ती प्रसिद्धी त्याला द्यावी ही अपेक्षा आहे. धार्मिक स्थळी सहलीला जाणारे श्रद्धावान त्या-त्या ठिकाणी दक्षिणेच्या रूपात आर्थिक मदत करतात, तशी एखाद्या स्थळाच्या वारसावास्तू संवर्धनासाठी तेथील स्थानिक स्वराज्य संस्थेला मदत केल्यास आवश्यक निधीची प्राथमिक गरज भागण्यासाठी मदत होईल.

बऱ्याच वारसावास्तू दर्शनात मार्गदर्शक (GUIDE) नसतो तेव्हा स्थानिक जाणकार इतिहासप्रेमींना योग्य प्रशिक्षण देऊन ही उणीव भरून निघेल व त्यांना अर्थप्राप्तीही होईल. आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेले अनेक बडे उद्योजकांचे समूह एखादे गाव दत्तक घेऊन त्याचा विकास साधताहेत. त्यांना काही सवलती उपलब्ध करून देऊन वारसावास्तूंची देखभाल करण्याची जबाबदारी दिल्यास खूप काही साधता येईल.

हे साधण्यासाठी शासनाकडे सकारात्मक विचारसरणीचे इतिहासप्रेमी प्रशासक हवेत आणि हे काम करणाऱ्यांच्या आड शासनाच्या नियमांचा कोलदांडा तथा लाल फीत येणार नसेल तरच हे शक्य आहे. सुमारे ३० वर्षांपूर्वी महाराष्ट्रात अनेक ठिकाणी स्वातंत्र्य संग्रामाची स्मृती जतन करण्यासाठी जे स्मृतिस्तंभ उभारले गेले त्यांची आजची अवस्था काय आहे! त्यांची देखभाल करण्यासाठी स्थानिक लोक तयार असूनही शासकीय नियमांमुळे ते काहीच करू शकत नाहीत. अशा स्थळांची निर्मिती म्हणजे- ''गाजावाजा करून वृक्षारोपण पण वृक्ष संवर्धनाकडे दुर्लक्ष.'' वारसावास्तू निर्मिती बरोबर त्या जतन करण्यासाठी निसर्गप्रेमी दूरदृष्टीच्या ब्रिटिश प्रशासकांनी जे प्रयत्न केले त्यातून आम्ही काय शिकलो?

– अरूण मळेकर

भ्रमणध्वनी : ९८६९११८५०१




# 'समाजस्वास्थ्य' समजावून घेताना



**डॉ. अनंत देशमुख**

> रघुनाथराव कर्वे यांच्यासंबंधी दिवाकर बापट, य.दि. फडके, मधुसुदन गोखले, म.वा. धोंड, मंगला आठलेकर, श्री.ज. जोशी, शैलेश त्रिभुवन आणि अनंत देशमुख यांनी लेखन केले आहे. श्री.ज. जोशी यांची 'रघुनाथाची बखर' ही कादंबरी बाजूला केली तर अन्य लेखन चरित्रात्मक स्वरूपाचे आहे. त्यातही अनंत देशमुख यांचा 'रधों' हा आठ खंडांचा संच रघुनाथरावांच्या व्यक्तित्वाचा, विचारांचा आणि कार्याचा सर्वांगीण विचार करणारा महत्वपूर्ण संशोधन प्रकल्प आहे. त्यात रघुनाथरावांसंबंधी अधिकाधिक परिपूर्ण माहितीचे कण गवसण्याची शक्यता असलेला! आणि आता 'समाजस्वास्थ्य' हे नाटक रंगभूमीवर आले आहे.

२८ फेब्रुवारी २०१७ रोजी पुण्याच्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात 'नाटकघर; पुणे' निर्मित अजित दळवी लिखित आणि अतुल पेठे दिग्दर्शित 'समाजस्वास्थ्य' या नाटकाचा शुभारंभाचा प्रयोग पाहाण्याचा योग आला. प्रयोगाला पुण्यातील मान्यवर कलावंत उपस्थित होते आणि संपूर्ण थिएटर प्रेक्षकांनी भरलेले. प्रत्यक्ष थिएटरमध्ये शिरण्यापूर्वी प्रत्येक प्रेक्षकाला 'समाजस्वास्थ्य' आणि आणखी एक अशा दोन पुस्तिका भेट म्हणून देण्यात आल्या होत्या.

त्यापैकी 'समाजस्वास्थ्य' ही पुस्तिका संततिनियमनाचे आद्य पुरस्कर्ते प्रो. र.धों. कर्वे यांच्या 'समाजस्वास्थ्य' मासिकाचे प्रतिरूप होते असे म्हणावेसे वाटते. नाटकाचा विषय र.धों. कर्वे यांचे व्यक्तित्व, विचार आणि कार्यकर्तृत्व अधोरेखित करणे होते. त्यामुळे संयोजकांनी 'समाजस्वास्थ्य' ही पुस्तिका प्रेक्षकांना देऊन नाटकाला आवश्यक अशी प्रेक्षकांची मानसिकता आधीच तयार केली होती. प्रो. कर्वे यांनी १९२७ ते १९५३ या काळात 'समाजस्वास्थ्य' मासिक चालवले. ते होते तरी कसे, त्यात कोणकोणते लेख, सदरे, जाहिराती येत असत याची स्पष्ट कल्पना आजच्या प्रेक्षकाला यावी हा विचार अभिप्रेत होता. मात्र कोणा एका विशिष्ट अंकाचे प्रतिरूप काढण्यापेक्षा नाटकाच्या आशयाला पूरक-पोषक होईल अशा मजकुराची मांडणी करण्याचे स्वातंत्र्य संपादकांनी घेतले होते व ते योग्य होते.

'समाजस्वास्थ्य' हे चरित्रनाट्य आहे, ते एका विशिष्ट काळातील महाराष्ट्रीय संस्कृतीचे आदर्श, मूल्यव्यवस्था, सामाजिक, राजकीय स्थिती यांचे चित्रण करते आणि काहीशा सनातन, परंपरावादी आणि स्थितिशील संस्कृतीला आपल्या बुद्धिप्रामाण्यवादी, विज्ञानाधिष्ठित विचारांनी आणि तशा प्रकारच्या कृतीने धक्के देणाऱ्या रघुनाथराव कर्वे यांच्या वैचारिक लढ्याचे, त्यांच्या बेडर वृत्तीचे, त्यांच्या आपल्या कार्यावरील अव्यभिचारी निष्ठेचे आणि त्यांना सर्वतोपरी साथ देणाऱ्या त्यांच्या पत्नीचे-मालतीबाईंचे-कलात्म पातळीवरील चित्रण करणारे ते विचारनाट्य आहे.

प्रसिद्ध नाटककार अजित दळवी यांना रघुनाथरावांच्या व्यक्तित्वाने झपाटले होते आणि त्यांच्यावर नाटक लिहिण्याचा त्यांचा मानस होता. अशा काळात त्यांच्या हाती 'रधों' हा प्रकल्प आला आणि त्यांना रघुनाथराव खऱ्या अर्थाने सापडले. मग त्यांनी 'समाजस्वास्थ्य'ची संहिता लिहिली. ती प्रसिद्ध दिग्दर्शक अतुल पेठे यांच्याकडे सुपूर्द केली.

रघुनाथराव कर्वे यांच्यासंबंधी दूरदर्शनने कार्यक्रम सादर केलेला; पुढे अमोल पालेकर यांनी 'ध्यासपर्व' हा चित्रपट काढलेला म्हणजे मराठीत त्यांच्यासंबंधी पुरेसे लेखन आणि दृश्य माध्यमात चित्रपट तयार झालेला. मराठी समाजातही रघुनाथरावांच्या कार्याची महती पसरलेली. त्यामुळे प्रो. र.धों. कर्वे हे नाव सर्वमुखी होते. 'ध्यासपर्व' संबंधीच्या त्याकाळात दिलेल्या मुलाखतींमध्ये ती एक 'डॉक्युफिल्म' असल्याचा निर्वाळा पालेकरांनी दिलेला. याचा अर्थ असा की केवळ कल्पनेवर विसंबून त्यांनी 'फिचर फिल्म' केलेली नव्हती तरी ती काहीशी डॉक्युमेंटरीच्या जवळपास जाणारी अशी. म्हणजे रघुनाथरावांसंबंधी उपलब्ध माहितीला शक्य तो धक्का न लावता जिथे कोऱ्या जागा दिसल्या तिथे कल्पकता वापरलेली, असा पालेकरांचा अभिप्राय होता. एक मात्र खरे की पालेकरांच्या 'ध्यासपर्व'ने रघुनाथरावांना जनमानसात नेऊन पोहोचवले. 'ध्यासपर्व' या अर्थाने चरित्रचित्रपट होता.

'समाजस्वास्थ्य' नाटक म्हणजे केवळ रघुनाथरावांचा चरित्रपट नसावा; त्यात वेगळे काही दाखवता यावे अशी दिग्दर्शक

म्हणून अतुल पेठे यांची भूमिका होती. नाटककार आणि दिग्दर्शक यांच्यामध्ये यासंबंधात मग चर्चा झाल्या असे प्रत्यक्ष प्रयोगाच्या शेवटी संबंधितांच्या चर्चेचा जो छोटासा परंतु मोलाचा कार्यक्रम झाला त्यावेळी पेठे यांनी सांगितले. आपल्याकडे 'तो मी नव्हेच', 'शांतता, कोर्ट चालू आहे' आणि 'उद्ध्वस्त धर्मशाळा' यांमधून कोर्टदृश्ये सादर करण्यात आली होती. रघुनाथरावांच्या आयुष्यात तर अश्लीलतेच्या आरोपावरून त्यांच्यावर तीन खटले झाले होते आणि त्यांच्या मृत्यूनंतरही चौथा खटला होण्याची शक्यता होती. याशिवाय ते 'विल्सन कॉलेज'मध्ये असताना त्यांना त्या कॉलेजचा राजीनामा द्यावा लागला तेव्हा त्यांच्यात व प्रिन्सिपल मॅकेन्झी यांच्यात झालेल्या वादाचे त्यांनी स्वतःच लेखन केलेले आणि पुढे मुंबईतील पीइएन संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांना बोलावून त्यांच्यावर प्रश्नांची जी सरबत्ती केली ती त्यांनी तेव्हा 'समाजस्वास्थ्य' मासिकात आणि 'रीझन' या इंग्रजी नियतकालिकात लिहिलेली. तेव्हा 'चौकशी' (trial) हा रघुनाथरावांच्या आयुष्यातला महत्त्वाचा भाग होता आणि तिथेही त्यांचा निर्भिडपणा, स्वच्छ वैचारिक तर्कधारा आणि स्वकार्यावरील ठाम विश्वास व्यक्त झाला होता म्हणून रघुनाथरावांवरचे नाटक सिद्ध करताना त्यांच्या आयुष्यातील १९३० ते १९४० या दरम्यान झालेले तीन कोर्टखटले व त्यातून प्रकटलेले त्यांचे ठसठशीत व्यक्तित्व प्रेक्षकांसमोर साकार करणे याला महत्त्व प्राप्त झाले. यातून 'समाजस्वास्थ्य' नाटकाची मांडणी प्रायः 'चौकशी नाट्या'ची म्हणजे 'कोर्टरूमड्रामा'ची झाली. प्रायः अशासाठी म्हटले की याला पूरक होतील अशा घटना रघुनाथरावांच्या '१३ न्यू भटवाडी, गिरगाव' इथे घडतात, शिवाय रघुनाथराव-मालतीबाई-मामा वरेरकर, रघुनाथराव व गांधीवादी तरुण असे काही प्रसंग या घरात घडतात. खेरीज रघुनाथराव आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रथम भेट, रघुनाथराव-प्रिन्सिपल मॅकेन्झी, रघुनाथराव-पीईएन सभासद- रघुनाथरावांवर 'समाजस्वास्थ्य'च्या गुजराथी आवृत्तीतील प्रश्नोत्तरांसंबंधी खटला झाला तेव्हा ते प्रश्नकर्ते व रघुनाथराव यांची उत्तरे यांचे नाट्यात्मचित्रण असे काही अन्य प्रसंग!

नाटककार आणि दिग्दर्शक यांचे 'समाजस्वास्थ्य'च्या संहितेच्या संदर्भात असे विचारैक्य मिश्रित झाल्यावर दळवींची संहिता अधिक नेटकी, मोकळी नि खुली झाली. दिग्दर्शकालाही त्याच्या सर्जनशील प्रतिभेने मूळ दस्तऐवज सौंदर्यपूर्ण आणि सार्थ करायला मोकळीक मिळाली. दोन खटल्यांमध्ये न्यायाधीश म्हणून असलेले इंद्रवदन मेहता, इन्स्पेक्टर आचरेकर, शेट्ये वकील, पहिल्या खटल्यात रघुनाथरावांच्या विरोधात साक्ष देणारे अहिताग्नी राजवाडे, डॉ. आंबेडकर यांचे अर्थातच ठसठशीत चित्रण करण्यात आले आहे. मालतीबाई-रघुनाथराव-मामा वरेरकर यांची घरगुती दृश्येही परिणामकारक, प्रभावी वठली आहेत.

'समाजस्वास्थ्य' या नाट्यकृतीचे वैशिष्ट्य असे की, त्यात १९३० ते १९४० या काळाचे चित्रण असणे स्वाभाविक आहे. त्यादृष्टीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्म आणि जातिव्यवस्थे-संबंधीचे गाजलेले भाषण, दुसऱ्या महायुद्धात हिटलरने जी क्रूर मनुष्यहत्या केली त्याचे व त्यावेळच्या युद्धकालीन घटनांची आकाशवाणीवरील वार्तांकने, १९३५ मध्ये डॉ. खेर यांची मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री म्हणून झालेली निवड व तेव्हा त्यांनी मंत्रिपदाची घेतलेली शपथ, संततिनियमनाला महात्मा गांधी यांचा विरोध होता व रघुनाथराव व गांधीजी यांचा या संबंधांचा पत्रव्यवहार होता हे लक्षात घेऊन नाटककाराने रघुनाथराव एका सभेत गांधीजींविरुद्ध टीका करतात, ती सहन न झाल्याने काही संतप्त गांधीवादी तरुण रघुनाथरावांच्या घरी येऊन धमकावतात असा प्रसंग. या साऱ्यातून तत्कालीन राजकीय वातावरणाची पार्श्वभूमी परिणामकारकरित्या व्यक्त करण्यात आली आहे.

रघुनाथरावांवर एकूण तीन खटले झाले. पहिल्या दोन खटल्यांचे साक्षात दृश्यरूप आणि त्यातील पात्रांचे शेट्ये वकील, अहिताग्नी राजवाडे, रघुनाथराव, सरकारी वकील यांच्यातील वैचारिक मतभिन्नतेचे घणाघाती संवाद प्रेक्षकांवर कोसळत असताना त्यांच्या उत्स्फूर्त प्रतिक्रिया टाळ्या, हशा इत्यादींनी प्रेक्षागृह सतत चैतन्यशील असल्याचे जाणवत होते. मालतीबाईंचे आजारपण आणि रघुनाथरावांशी असलेले त्यांचे हृद्य संबंध व त्यांची निर्वाणीची भाषा-मृत्यू यामुळे प्रेक्षागारातील अस्वस्थता आणि सन्नाटाही मनाला स्पर्श करून गेला आणि त्यातही कळस म्हणजे रघुनाथरावांचे स्वतःच लढवलेल्या तिसऱ्या खटल्यातील स्वमतसमर्थनार्थ केलेले निवेदन... सेल्फ डिफेन्स. रघुनाथरावांच्या आजवरच्या बुद्धिप्रामाण्यवादी, विज्ञाननिष्ठ भूमिकेचा निःस्संदिग्ध स्वरूपात केलेला स्पष्ट उच्चार आणि त्याबरोबरच समकालीन स्वसंस्कृतीतील अंधश्रद्धा, कर्मकांड आणि प्रगतीला खीळ घालणारी किरटी वृत्ती याबरील आसूड... रघुनाथराव वाढत वाढत गेलेले पाहिल्याचा विलक्षण अनुभव...

हे नाटक १९३० ते १९४० मधील घटना प्रवृत्तींचे चित्रण करणारे असले तरी समाजमन त्या काळात होते तसेच ते आजही आहे. याचीही प्रचिती आली आणि त्यामुळे रघुनाथरावांच्या कार्याची महती आणि त्यांच्या विचारांच्या उजळणीची, पुनर्उजळणीची आवश्यकता अधिकच उत्कटत्वाने झाली. 'समाजस्वास्थ्य' हे काही विशिष्टकालीन नाटक नाही, ते आजच्या काळाचेही नाटक आहे.

प्रसिद्ध अभिनेते गिरीश कुलकर्णी, अभिनेत्री राजश्री सावंत-वाड आणि त्यांचा 'नाटकघर, पुणे' हा सगळा संच, त्याचे दिग्दर्शक अतुल पेठे म्हणूनच अभिनंदनास पात्र आहेत!

**- डॉ. अनंत देशमुख**
भ्रमणध्वनी : ९८२०८८७४०७
dranantdeshmukh@gmail.com




# निश्चलनीकरण : रिझर्व बँकेचा भोंगळ कारभार

डॉ. अनंत पां. लाभसेटवार

सर्वच मोठ्या देशात केंद्रीय बँक सापडते. आपण तिला रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया म्हणतो तर अमेरिकेची मध्यवर्ती बँक फेडरल रिझर्व्ह किंवा फेड (Fed) म्हणून ओळखली जाते. लंडनमध्ये तिला बँक ऑफ इंग्लंड म्हणतात तर युरोपियन राष्ट्रसंघात तिला युरोपियन सेंट्रल बँक म्हणून संबोधतात. नावं निराळी असली तरी त्या सर्वांचं कर्तव्य जवळजवळ सारखीच. नोटा छापणं, चलनाचं निरीक्षण करणं, व्याजदर ठरवून भाववाढ आटोक्यात ठेवणं व पतपुरवठा कमीजास्त करून रोजगारनिर्मितीसाठी पोषक वातावरण निर्माण करणं. याशिवाय मध्यवर्ती बँक देशातल्या व्यापारी बँकांचं नियंत्रण करून त्यांच्यावर अंकुश ठेवते. रिझर्व्ह बँकेच्या धोरणाची प्रत्येक चुलीला झळ बसत असली तरी ती परमेश्वराप्रमाणे अदृश्य असल्यामुळे तिची सावली कुणाला दिसत नाही.

रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरचं नावही सर्वसामान्यांना ठाऊक नसतं. त्यामुळे त्यांनी केलेले सुतोवाच एक तर दुर्लक्षित केले जातात नाही तर वृत्तपत्राच्या आतल्या पानात लपवले जातात, पण अमेरिका प्रशिक्षित व शिकागोस्थित रघुनाथ राजनची जेव्हा गव्हर्नर म्हणून नियुक्ती झाली तेव्हा त्यांचं व्यक्तिमत्त्व, ज्ञान व करिश्मा या त्रिकुटीमुळे झोपलेली रिझर्व्ह बँक एकदम जागृत होऊन तिला अर्थमंत्र्याएवढी प्रसिद्धी मिळू लागली. त्यांचा प्रत्येक शब्द झेलून वार्ताहर मुखपृष्ठावर छापत. त्यामुळे नेहमी झोपाळू असलेली ही वित्तसंस्था बलयांकित होऊन भारतीय अस्मितेचा भाग झाली. खुद्द रघुनाथ राजनला हॉलिवूडमधल्या एखाद्या सिताऱ्याप्रमाणे वागणूक मिळाली. याची जगानंदेखील दखल घेतली. त्यामुळे मोदींचीच नव्हे तर देशाची प्रतिमा उजळली. राजनचे सूतोवाच मी वेळोवेळी वॉल स्ट्रीट जर्नल, न्यूयॉर्क टाइम्स, फोरब्ज, इकॉनॉमिस्टसारख्या जागतिक नियतकालिकात वाचले. त्यामुळे नेहमीचा वाणीबहाद्दर देश शेवटी कृतिप्रवण होणार असं जगाला वाटू लागलं, पण ही प्रसिद्धीची लाट अल्पजीवी ठरली. राजन निघून जाताच ती ओसरली आणि मूळचे दगडधोंडे दृष्टोपत्तीस आले. निश्चलनीकरणाची योजना रिझर्व्ह बँक यशस्वीपणे अमलात आणू शकली नाही. त्यामुळे सर्वसामान्यांचे हाल तर झालेच, पण आपला देश कुठलीही मोठी योजना यशस्वीपणे पूर्णत्वास नेऊ शकत नाही असा जगाचा मानस झाला आणि आपली रिझर्व्ह बँक पूर्ववत झोपाळू स्थितीत गेली. मोदींच्या नेतृत्वाखाली भारत वर येणार असा जो आशावाद जगात पसरला होता तो आता कमी झाला.

आरबीआयची (RBI) स्थापना ऐंशी वर्षांपूर्वी ब्रिटिशांच्या कारकीर्दीत झाली. नवलाची गोष्ट म्हणजे त्याच गुलामगिरीतल्या कायद्यानुसार ती कार्यरत आहे. स्वातंत्र्योत्तर काळात या नियमांना जनसन्मुख करण्याचं कुणाला सुचलं नाही म्हणून आरबीआयची वागणूक जनविन्मुख, उन्मत्त व जनसेवाविरहित असली तर नवल कसलं? रघुनाथ राजननं यात फार फरक केला नाही. भारतीय माणूस म्हणजे गुलाम असं गृहीत धरूनच आरबीआय जनतेशी वागते हे मी जानेवारी ५, २०१७ रोजी आम्हा एनआरआयना (NRI) जी वागणूक मिळाली त्यावरून सांगू शकतो. या वित्तसंस्थेनं २०१६ मध्ये संपणाऱ्या वर्षात ६५८ कोटी रुपयांचा नफा कमावला. पण तो आरबीआय कार्यक्षम आहे किंवा तिनं उत्कृष्ट सेवा पुरवली म्हणून झाला नसून देशातील बँकांवर अमाप शुल्क आकारल्यामुळे. परिणामी भारतीय बँका वेगवेगळे शुल्क आकारून ग्राहकांना हैराण करतात.

एकंदरीत बँकसेवा आपल्या देशात अमेरिकेपेक्षा महाग आहे. मी एकदा भारतीय बँकेत खातं उघडलं. खात्यात काही देवाणघेवाण न झाल्यामुळे त्या वित्तसंस्थेनं 'अकार्यरत शुल्क' (Inactivity Fee)

आकारण्यास सुरुवात केली. या सर्जनशीलतेला काय म्हणावं?

आरबीआय एवढी गलेलठ्ठ असूनही तिला जनसेवा कशी पुरवावी हे माहीत नाही. निश्चलनीकरणाची फसलेली व अयशस्वी योजना बघून या संस्थेला नियोजन कसं करावं हे देखील ठाऊक नाही असं खेदानं म्हणावं लागेल. त्यांच्या संचालक मंडळाच्या कारभारात देखील पारदर्शकता नाही. प्रत्येक बैठकीत होणाऱ्या निर्णयांचा, चर्चेचा मजकूर लिहिण्यात येतो. त्याला मिनिट्स (Minutes) म्हणतात. अमेरिकन फेड ते एक महिना उशिरा प्रसिद्ध करते, पण स्वत:ला देवासमान व म्हणून कायद्याच्या वर समजणारी आपली आरबीआय तसं करीत नाही. ती आपले मिनिट्स कायमच गुलदस्त्यात ठेवते. मतितार्थ असा की निश्चलनीकरणाचा निर्णय कसा घेतला, त्याविषयी नियोजन काय केलं हे जगाला कधीच कळणार नाही.

कुठल्याही दिवशी अर्थकारणात किती चलन आहे याची अचूक माहिती असणं व्यवस्थापनाच्या दृष्टीनं महत्त्वाचं असतं. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे ही आपल्याजवळ नाही असं गव्हर्नर उर्जित पटेल यांनी संसदेच्या अर्थसेवा समितीसमोर कबूल केलं. हे गणितशास्त्राच्या प्राध्यापकाला बेरीज कशी करायची हे ठाऊक नसल्यासारखं म्हणावं लागेल. मॅकडोनाल्डला जगातल्या जवळजवळ ३६,००० आस्थापनात कुठल्याही क्षणी किती हम्बर्गर आहेत याची कल्पना असते. वालमार्ट किंवा ॲमेझॉन कंपनीला जगभर विखुरलेल्या गोदामात प्रत्येक वस्तूंची संख्या व ठिकाण अचूकपणे ठाऊक असतं, पण आपल्या रिझर्व्ह बँकेला अर्थकारणात नोटा किती आहेत याविषयी ज्ञान नसावं ही नोबेलपात्र बाब समजावी लागेल. नवलाची गोष्ट म्हणजे चार महिने लोटले तरी मार्च २०१७ पर्यंत ही आकडेवारी उपलब्ध नव्हती. आरबीआयला या अज्ञानाची मुळीच लाज वाटली नाही. आपल्या दूरदर्शनवरील टाइम्सच्या 'आजतक' या कार्यक्रमात निवेदक थापर यांनी जो विदारक प्रकाश टाकला त्यावरून आपल्या वित्तसंस्थेचं लांच्छनास्पद रूप उघडकीस आलं. ते यावर म्हणाले की, आरबीआयजवळ नोटा किती परत केल्या याविषयी विश्वासार्ह आकडेवारी नसल्यामुळे वित्त मंत्रालयानं न्यूयॉर्कस्थित ब्लूमबर्ग (Bloomberg) या खाजगी जागतिक वित्त कंपनीनं पुरवलेली माहिती वापरण्यास सुरुवात केली. हा आरबीआयचा अंतिम अपमान होता, पण ती स्वायत्त संस्था एवढी निर्लज्ज की त्याचं तिला काहीच वाटलं नाही. नोटांची बेरीज करणं तिला ठाऊक नसेल तर तिची पुनर्रचना करण्याची जरूरी नाही.

शेवटी काय झालं? काँग्रेस नेते व माजी मंत्री कपिल सिब्बल यांनी गणित केलं की १५.९७ ट्रिलियन (म्हणजे लाख कोटी) रुपयांच्या मोठ्या नोटा अर्थकारणात होत्या. त्यातल्या १४.९६ ट्रिलियन रुपयांचं चलन रूपांतरित झालं. म्हणजे ९४ टक्के नोटा उजेडात आल्या. मग काळा पैसे कुठे गेला? आरबीआयनं व सरकारनं याविषयी सूचक मौन पाळलं. केवळ १ लाख कोटी रुपयांसाठी देशाला एवढा भुर्दंड भरावा लागला, परंतु एकही राजकारणी यात कसा अडकला गेला नाही? याचं कारण शोधण्यास डोकं खाजवण्याची जरूरी नाही. देशातील सर्व राजकीय पक्षांजवळ एकूण ११,३६७ कोटी रुपयांची गंगाजळी आहे असं टाइम्स ऑफ इंडिया व फ्री प्रेस जर्नलनं जानेवारी २०१७ मध्ये जाहीर केले. महत्त्वाचं म्हणजे त्यातला खारीचा वाटा भाजप व काँग्रेस पक्षाकडे असून ७० टक्के पैसा बेहिशेबी आहे असं आढळून आलं. म्हणजे तो कुठून आला हे या पक्षांना ठाऊक नाही. तरीही सरकारनं त्यांना अभय देऊन नवीन नोटात रूपांतर करणाची परवानगी दिली. या नदीत राजकारण्यांनी आपलं घोडं कशावरून न्हाऊ घातलं नसेल? तुमच्या आमच्याजवळ एवढा बेहिशेबी पैसा असेल तर आपली कारावासात रवानगी होते. पण राजकीय पक्षांना त्यापासून सुट्टी मिळते.

आरबीआयनं निश्चलनीकरणाची योजना योग्यपणे तडीस न नेल्यामुळे देशाचं अपरिमित नुकसान झालं. गोरगरिबांचे अजूनच हाल होऊन १०० ग्राहक गतप्राण झालेले बघून कुणाचंही मन द्रवेल. नवीन नोटा पुरेशा न छापल्यामुळे अनेकांचे व्यवहार रोखले. याचा अर्थकारणावर परिणाम झाला. उद्योग मंदावले. माझा टॅक्सी ड्रायव्हर फिरोज खान म्हणाला की त्याचा धंदा ४० टक्क्यांनी आपटला. देशाची अर्थवाढ निदान १ टक्क्याने घटेल असं तज्ज्ञ म्हणतात म्हणजे अर्थकारणाला १ लाख कोटी रुपयांची फोडणी बसणार. पुरेशा नोटा न छापताच ही योजना हाती घेणं आत्मघातकी होतं. हे आरबीआयला कसं कळलं नाही याचं नवल वाटू लागतं. तसंच नवीन नोटांचे आकार लहान असल्यामुळे त्यांचा पैसे हस्तांतरण यंत्रात (ATM) वापर करण्यापूर्वी त्या यंत्रांना कानपिचक्या द्याव्या लागल्या. जर त्यांचा आकार मावळत्या नोटांएवढाच ठेवला असता तर ही गैरसोय टाळता आली असती. हे कळण्याएवढं व्यवस्थापनचातुर्य आरबीआयमध्ये नसावं याच्या वर्णनार्थ लागणारी मुक्ताफळं शोधूनही सापडणार नाही.

अज्ञानाच्या अंधारात आरबीआय का वावरते? याचं मुख्य कारण म्हणजे स्वयंचलनाचा व व्यापक संगणकीकरणाचा अभाव. मी तिथे ५ जानेवारी २०१७ रोजी गेलो असता मला एकाही संगणकाचं किंवा लॅपटॉपचं दर्शन झालं नाही. भारतीय संगणक अभियंते वित्तक्षेत्राचं स्वयंचलन करून कार्यक्षमता व उत्पादनशक्ती वाढवण्यासाठी जगभर मान्यता पावलेले आहेत. न्यूयॉर्कच्या सगळ्या बहुद्देशीय बँका त्यासाठी त्यांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग करतात. एवढंच कशाला भारतातल्या खाजगी बँकांनी देखील स्वयंचलन केलेलं आहे. मग त्याचं आरबीआयला वावडं का? कारण त्याची मजूर संघटना त्याला तीव्र विरोध करते, पण हे आपल्या पोटावर पाय पडतो म्हणून टांगेवाल्यांनी कारवर किंवा कंदिल बनवणाऱ्यांनी विद्युत कंपनीवर बहिष्कार टाकण्यासारखं हास्यास्पद व बालिश आहे. प्रगतीची लाट रोखता येत नाही. ती थोपवल्यानं आपण जगाच्या पिछाडीला राहतो आणि आरबीआय हे त्याचं एक नंबरचं उदाहरण आहे. अशा परिस्थितीत त्यांना ग्राहकांनी नक्की किती जुन्या नोटा परत केल्या हे माहीत नसावं




यात फारसं अप्रूप नाही. त्यामुळे त्यांनी काढलेले सर्व निष्कर्ष चुकीचे निघाले हे ओघानं आलंच. वार्ताहार परिषद घेतली असती किंवा रघुनाथ राजनसारखा जनतेशी संवाद साधला असता तर गैरसोयीचे प्रश्न विचारले जातील म्हणून नवीन गव्हर्नरने स्वत:ला आपल्या घरट्यात कोंबून घेतलं. संसदीय समितीत ते उत्तर देऊ शकले नाहीत. मग वार्ताहारांसमोर जाण्याचं दूरच राहिलं.

कुठल्याही मध्यवर्ती बँकेचा आत्मा म्हणजे चलन. तोच जर ठिकाणावर नसेल तर ती आपलं कर्तव्य कसं बजावणार? निश्चलनीकरणाच्या नाटकावरून आरबीआय किती कर्तव्यच्यूत होती, हे जगाला कळलं. रोजच्या जीवनात आरबीआयचा जनसामान्यांशी संबंध येत नाही. ती संस्था बँकांना मुठीत ठेवून आपल्या सोंडा ग्राहकांच्या खिशात पसरवते, पण यात जनसेवेला स्थान नाही हे आम्हा अनिवासी भारतीयांना जानेवारी २०१७ मध्ये कळलं. प्रत्येक एनआरआयला २५,००० रुपयांच्या जुन्या नोटा नवीन चलनात रूपांतर करण्याचा अधिकार आहे असं मध्यवर्ती बँकेनं आपल्या संकेतस्थळावर जाहीर केलं. त्यासाठी लागणारा एक आकृतिबंधही देण्यात आला. तो मी छापला व रितसर भरला. एवढंच नव्हे तर ते पैसे मी परदेशातून आणले हे सिद्ध करण्यासाठी त्या फॉर्मवर सीमांतर अधिकाऱ्याचा अधिकृत शिक्का मारून घेतला. आता राहिलं होतं ते आरबीआयच्या ऑफिसमध्ये जाऊन जुन्या नोटा बदलून घेण्याचं काम. ते जगाला सोपं वाटत असलं तरी आरबीआयला कठीण होतं हे लवकरच कळलं. बांद्र्याला आरबीआयचं ऑफिस आहे हे मला महाजालावरून कळलं म्हणून तिथे गेलो. तोंड वेंगाडल्यावर कळलं की तिथे नोटा परिवर्तन होत नाहीत. म्हणून टॅक्सी करून फोर्टमध्ये असलेल्या आरबीआयच्या मुख्यालयात तडफडलो. बांद्र्यावरून फोर्टला जाण्यापेक्षा चंद्रावर जाणं सोपं हे तिथल्या वाहतुकीवरून लवकरच कळलं. तिथे जातो तर एखाद्या महत्त्वाच्या वित्तसंस्थेला भेट देण्याऐवजी कारावासात जात आहे असं वाटलं. ब्रिटिशांनी बांधलेल्या या सुंदर वास्तूचं व्यक्तिमत्त्व बघून तिथली वित्तसंस्था भरभक्कम व कधीही न बुडणारी असा भास होई पण आपण तिच्यासमोर उंच गजांचं कुंपण बांधून तिला कारावासाचं रूप दिलं हे केवढं दुर्दैव. म्हणजे आपण गुलाम असताना शिस्तखोर होतो. ब्रिटिशांना गज उभारण्याची आवश्यकता भासली नाही पण स्वातंत्र्य मिळाल्यावर हेच गुलाम एवढे हिंसक व बेशिस्त झाले की त्यांना थोपवण्यासाठी कुंपण बांधावं लागलं.

भारतात जिथेतिथे तोबा गर्दी आढळते. मग आरबीआय त्याला अपवाद का असावी? तिथे अमिताभ बच्चन आला असता तर लोकांना वाटलं नसेल असा मला भास झाला. कुंपणाच्या आत पोलीस आणि बाहेर एनआरआयची गर्दी. मग धक्काबुक्की, मारहाण व शिविगाळ सुरू झाली. कुठलाच एनआरआय अशा हीन जगात वावरत नाही कारण परदेशात व विशेषत: अमेरिकेत असं दृश्य कधी बघायला मिळत नाही. एनआरआय म्हणजे भारताच्या दुधावरची साय कारण ते ज्या ज्या देशात स्थलांतरित झाले त्या त्या ठिकाणी अतियशस्वी होऊन त्यांनी आपली मुद्रा उमटवली. अमेरिकेत त्यांचं सरासरी उत्पन्न एक लाख डॉलरपेक्षा जास्त तर गोऱ्या माणसाचं फक्त ५४,००० डॉलर. चिनी माणूसही या बाबतीत मागे पडतो. याचा देशाला फायदाच होतो. हे जगभर विखुरलेले अतियशस्वी एनआयआर दरवर्षी मायदेशी ७५ अब्ज डॉलर्स पाठवून परदेशी चलनाच्या गंगाजळीत भर

घालतात. संपत्तीचं एवढं हस्तांतरण क्वचितच झालं आहे. भारताच्या दृष्टीनं एनआरआय म्हणजे एक दुभती गायच. कच्ची बुद्धी निर्यात करून ती परदेशात परिपक्व झाली ती तिला डॉलरची फळं लागतात व त्यातली काही देशाच्या झोळीत पडतात हे ओळखून भारतानं एनआरआयचा कारखाना उघडला. विद्यार्थ्यांच्या परदेशगमनावरचे सर्व निर्बंध उठवले. हा सर्व व्यवहार आरबीआय मार्फतच होतो असं असून त्या संस्थेनं कृतज्ञता व्यक्त करण्याऐवजी कृतघ्नता दाखवावी याचं माझी बुद्धी गणित करू शकली नाही.

बाहेरच्या हिंसेशी सामना केल्यावर एअरपोर्टसारखी अंगझडती झाल्यावर आत गेलो तर जे विदारक दृश्य दिसलं ते पाहून तिथून एकदम काढता पाय घ्यावा असं वाटलं. बैलबाजारापेक्षा तिथे जास्त गोंधळ दिसला. ३००-४०० लोकांची ओळ. त्यांची सेवा करण्यास फक्त एक खिडकी उघडी. नियम असे कुणालाच ठाऊक नव्हते. आरबीआयचे अधिकारी मदतोत्सुक. पण त्यांच्यावर पडलेला कामाचा बोजा एवढा की ते त्रस्त झाले तर नवल कसलं? ज्येष्ठ अधिकारी वरच्या मजल्यावर चहा पित बसले असावेत. एनआरआयचा रोष ओढवणं देशाच्या स्वास्थ्याला चांगलं नाही याविषयी ते अनभिज्ञ असावेत कारण त्यांनी मदत करण्यास जास्तीचे नोकर कधीच पाठवले नाहीत. दोन तास ओळीत उभं राहिल्यावर मी दोन पावलं पुढे सरकलो. या मार्गक्रमणाचं कारण पुढच्या एनआरआयला सेवा मिळाली म्हणून नव्हे तर माझ्या समोरील ग्राहक कंटाळून बाहेर गेला हे होय. मला मुळातच कुठल्याही ओळीत तिष्ठत उभं राहायला आवडत नाही. मुंबईत प्रेतांना सुद्धा स्मशानभूमीजवळ ओळीत उभं (म्हणजे आडवं) रहावं लागतं म्हणे. तसं मला झालं तर पाय फुटून मी चालता होईन. त्या दिवशी आरबीआयच्या मुख्यालयात सेवेच्या अभावी मला तसंच वाटलं. एवढा राग आला की मी २५,००० रुपयांवर पाणी सोडून तिरीमिरीत बाहेर पडलो.

दुसऱ्या दिवशी सौ.नं आग्रह केला म्हणून पुन्हा टॅक्सी करून त्या रणभूमीवर गेलो. त्यावेळी गर्दी थोडी कमी होती पण सेवा पुरवणाऱ्यांची संख्या अपुरी असल्यामुळे अर्धा दिवस काढावा लागला. बिळात बसलेली व भलंमोठं मंगळसूत्र घातलेली ती साडीधारी बाई आमच्या नावाची यादी कार्बन लावून दुहेरी प्रतीत करू लागली. अमेरिकेत असा कार्बन वापरलेला मी गेल्या तीन दशकात बघितला नाही. तिथे सर्व गोष्टी संगणकानं होतात. पण आरबीआयची मनोवृत्ती अजूनही ताम्रपत्र व बोरू वापरण्याकडे असल्यामुळे ती संस्था अजून आधुनिक युगात का शिरली नाही हे उघड आहे. या आरबीआयच्या बाबूगिरी वृत्तीमुळे आता माझा एक पानी आकृतिबंध चार पानी झाला होता. तो संगणकापासून अस्पर्शित राहिला होता. माझं नाव त्या हस्तयादीत लिहिल्यावर व २५,०००च्या जुन्या नोटा तिथे दुसऱ्या खिडकीत भरल्यावर एक अधिकृत कागद मिळाला. पैसे आमच्या म्हणजे नातेवाईकाच्या खात्यात १०-१५ दिवसात जमा होतील असं सांगण्यात आलं. सरकारी शब्दावर विश्वास ठेवण्याएवढं कुक्कुलं बाळ मी निश्चितच नव्हतो. हे लिहिताना चार आठवडे झाले पण पैसे मात्र मिळाले नाहीत. नंतर त्यांचं विद्युत टपाल आलं की परदेशी पारपत्रधारक या सुविधेसाठी पात्र नाहीत. त्यांनी महाजालावर ते स्पष्ट शब्दात जाहीर केलं असतं तर किती वेदना वाचल्या असत्या. या अनुत्पादक व्यवहारासाठी मला मुंबईत दोन जादा दिवस मुक्काम करावा लागला. राहण्याचा, जेवणाचा व टॅक्सीचा खर्च बघता मला २५,००० रुपयांपेक्षा जास्त भुर्दंड बसला. याशिवाय मनस्ताप वेगळा, पण या अनुभवातून आरबीआयची व्यवस्थापनशून्यता सिद्ध झाली.

एवढे अधिकारी व पोलीस यांचा खर्च सोसण्याऐवजी व आम्हाला आरबीआयचं कुरूप अंतरंग दाखवण्याच्या भानगडीत पडण्याऐवजी त्या वित्तसंस्थेने आपले दोन अधिकारी विमानतळावर ठेवले असते तर काय बिघडलं असतं? एकानं २५,००० रुपये घेऊन परपत्रावर शिक्कामोर्तब केलं व दुसऱ्यानं तेवढ्याच नवीन नोटा ताबडतोब दिल्या असत्या तर काम सुलभ तर झालं तर असंतच पण आरबीआयचा बराच खर्च वाचून एनआरआयच्या मनात सदिच्छा निर्माण झाली असती. जर आरबीआयजवळ पुरेसं नवीन चलन नसलं तर आम्ही डेबिट कार्ड स्वीकारलं असतं. हे साधं काम गुंतागुंतीचं करण्यात आपलं सरकार तरबेज आहे. या बाबूशाहीच्या मनोवृत्तीमुळे चलन परिवर्तनाचं काम तर फसलंच पण देशाची जागतिक प्रतिमा काळवंडली.

याशिवाय स्वत:ला वर्चस्ववादी समजणाऱ्या आरबीआयची जनसेवा पुरवण्याच्या बाबतीत ही स्थिती तर सरकारच्या इतर शाखांत केवढा अंधार असेल याची कल्पना देखील करवत नाही. या निसंघतेमुळे, हलगर्जीपणामुळे व बेफिकिरीमुळे सर्वसामान्यांचे जे हाल होतात ते त्यांनाच ठाऊक. हे वातावरण भ्रष्टाचाराला पोषक ठरतं. दारिद्र्य दहशतवाद्यांसाठी सुपीक तसं असंवेदनाशील बाबूशाही गैरव्यवहारासाठी स्वागतशील असंच म्हणावं लागेल. आम्हा एनआरआयचे प्रत्येकी २५,००० रुपये गेले तर फारसं नुकसान होणार नाही, पण गोरगरिबांना ज्या यातना भोगाव्या लागल्या, शंभरेक लोकांना जो जीव द्यावा लागला व अर्थकारणाला जो फटका बसला त्याचं काय? त्याचं खापर आरबीआयच्या खांद्यावर फोडावं लागेल.

**– अनंत पां. लाभसेटवार**
latalabh@aol.com
(लेखक फर्स्ट नॅशनल बँक आणि ट्रस्ट कंपनीचे
चेअरमन ऑफ दी बोर्ड होते.)

# छाया दातार लिखित 'तरीही शेषप्रश्न'

छाया दातार या सुरुवातीपासूनच स्त्री प्रश्नांवर लेखन करीत आल्या आहेत. 'मनोहर' साप्ताहिकातील त्यांचे सदर आणि त्यानंतर आलेले 'स्त्री-पुरुष' तेव्हापासून त्या सातत्याने स्त्री प्रश्न भारतातील तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर समजावून घेत आहेत. प्रत्यक्ष भाग घेत आहेत. लिहीत आहेत. ८ मार्च २०१७ या दिवशी 'तरीही शेषप्रश्न' हे त्यांचे पुस्तक वाचनाच्या चळवळीची रूजुवात करुन आजही त्याचे चळवळ हे स्वरूप कायम ठेवणाऱ्या 'ग्रंथाली'ने प्रसिद्ध केले आहे.

'ग्रंथाली'च्या धनश्री धारप यांनी सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत केले व त्यावेळी 'ग्रंथाली'च्या नव्या प्रकाशनांची माहिती दिली. याबेळी 'शब्द रुची' या 'ग्रंथाली'च्या स्त्रीविषयक विशेषांकाचे व 'तरीही शेषप्रश्न' ह्या छाया दातार यांच्या पुस्तकाचे प्रकाशन 'मिळून साऱ्याजणी' या स्त्री प्रश्नांना प्राधान्य देणाऱ्या मासिकाच्या गेली २५ वर्षे संपादन करीत असलेल्या, स्त्री चळवळीच्या एक प्रमुख व ज्येष्ठ नेत्या श्रीमती विद्या बाळ यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी लेखिका छाया दातार, प्रसिद्ध कलाकार व लेखक संजीव खांडेकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन औरंगाबाद येथील डॉ. जयश्री गोडसे यांनी केले. त्यांनी पुस्तकातील काही भागाचे अभिवाचन अत्यंत प्रभावीपणे केले.

डॉक्युनॉव्हेल अशा स्वरूपाचे हे पुस्तक स्त्री प्रश्न समजावून घेताना आकळत गेलेले प्रश्नांचे स्वरूप, गरिबी, विषमता, विविध समाजगटांमधील स्त्रियांच्या प्रश्नांमधील साम्य, त्यातून ठळक होत गेलेली 'पुरुषसत्ताकते'ची जाणीव, रोज समोर दिसणाऱ्या, अनुभवास येणाऱ्या प्रश्नांची राजकीय, सामाजिक, ऐतिहासिक संदर्भात केलेली छाननी, मुळापर्यंत जाण्याचे प्रयत्न, गेल्या जवळ-जवळ ५० वर्षांतील स्त्री चळवळ, स्त्रियांचे प्रश्न याचे होत गेलेले आकलन कधी आत्मकथनाच्या पद्धतीने, तर कधी विविध गटांतील अत्यंत मनापासून आर्त पद्धतीने केलेल्या चर्चा, कार्यकर्त्यांचे आत्मानुभव याचे अनेक संदर्भ या पुस्तकात येतात. भारतासारख्या विशाल देशातील विविध संस्कृती, प्रदेश एवढेच नव्हे तर प्रगत मानल्या जाणाऱ्या युरोपीय तर अन्य खंडांतील देशांची उदाहरणे, वस्तुस्थिती या पुस्तकात सामोरी येते. त्यातून स्त्रीला स्त्री असण्यामुळे तिला येणाऱ्या अनुभवांची विश्लेषणात्मक मांडणी येथे केली गेली आहे.

पुस्तकाच्या लेखिका श्रीमती छाया दातार यांनी आपले मनोगत व्यक्त केले. मुळात कामगार वर्गातील स्त्रियांना स्वतःवर होणारे अन्याय व शोषण याविरुद्ध सुरू केलेली लढाई व आज त्याचे अस्तित्वात आलेले समारंभीय स्वरूप फक्त यशस्वी स्त्रियांना पुढे आणण्याचे होणारे व्यापारी प्रयत्न याचा उल्लेख केला. या डॉक्युनॉव्हेलची पार्श्वभूमी त्यांनी विषद केली. 'डॉक्युनॉव्हेल' ही संकल्पना त्यांनी आपल्या भाषणात स्पष्ट केली.

या प्रकाशन समारंभाचे प्रमुख वक्ते होते संजीव खांडेकर - एक साहित्यिक, कलावंत, चित्रकार, राजकारण अशा अनेक क्षेत्रांत त्यांचा स्वैर, गुणवंत संचार हे त्यांचे वैशिष्ट्य. जागतिकीकरण, नवउदारवाद, या साऱ्यांमधील हिंस्त्रता व पोकळपणा प्रभावीपणे लेखनातून व्यक्त करणारे हे चतुरस्त्र व्यक्तिमत्त्व.

पुस्तकाविषयी बोलताना खांडेकर म्हणाले की दस्तावेज व आत्मनिवेदन स्वरूपाची कादंबरी अशी रचना असलेले कदाचित मराठीतील हे पहिलेच पुस्तक असावे जे तुम्ही वाचतच जाता. अतिशय सोप्या-ओघवत्या भाषेतील हे पुस्तक स्त्री मुक्तीच्या संदर्भातील अनेकविध प्रश्नांना-विषयांना स्पर्श करते असे नव्हे तर नानाविध प्रश्नांची सखोल चर्चा करते. खांडेकर यांनी वेळेअभावी सर्व मुद्द्यांचा विस्तृत परामर्श घेतला नाही पण त्यांनी ७०च्या दशकातील 'लेस्बियन' या चळवळीचा विशेष उल्लेख केला. ही चळवळ केवळ भांडवलशाही, त्यामुळे होणारे शोषण या विरोधात नाही तर ती 'स्त्री' असण्यामुळे अनुभवाला येणारे अत्याचार, शोषण, मानहानी, पुरुषांना (पुरुषसत्ताकतेला) दोषी ठरवणे अशा असंख्य प्रश्नांना सामोरी जाते. आपल्या प्रतिपादनात त्यांनी अनेक देशी-परदेशी कलाकारांची उदाहरणे दिली.

खांडेकर यांनी पुस्तकाचे महत्त्व मांडताना अत्यंत नितळपणे केलेले लेखन, एक आजवरचा समग्र इतिहास, प्रत्येक प्रकरणाचा प्रत्यक्षातील प्रचंड आवाका याबद्दल लेखिकेचे अभिनंदन केले. हे पुस्तक, यातील प्रत्येक प्रकरण सर्वत्र वाचले जावे असा आग्रह त्यांनी आपल्या भाषणात धरला. या पुस्तकाचे विविध भाषांमध्ये भाषांतर कसे आवश्यक व महत्त्वाचे आहे हे त्यांनी शेवटी मांडले व छाया दातार यांना त्यांनी मनापासून धन्यवाद दिले.

समारंभाचा समारोप श्रीमती विद्या बाळ यांच्या अध्यक्षीय भाषणाने झाला. जयश्री गोडसे यांनी त्यांचा समर्पक परिचय करून दिला. सुरुवातीला त्यांनी लेखिकेचे मनःपूर्वक अभिनंदन केले व 'ग्रंथाली'चेही कौतुक केले.

विद्याताईंनी छायाला प्रोत्साहित करण्याच्या प्रक्रियेतील, पुस्तकात आलेल्या काही भागाचे सुंदर वाचन केले. त्यांनी स्त्रीमुक्ती या विचाराची उडवलेली खिल्ली, त्या चळवळीला झालेला विरोध, विशेषतः सध्याचा राजकीय, धार्मिक, स्त्रीविषयक कायद्यांना होणारा विरोध इत्यादी मुद्द्यांचा त्यांच्या समंजस भाषेत समाचार घेतला. स्त्री मुक्ती चळवळ ही स्त्री-विरुद्ध पुरुष अशी नसून दोघांमधील सामंजस्य ठळकपणे समोर आणू इच्छिणारी,


त्यासाठी प्रयत्न करणारी चळवळ आहे. या बदलाच्या वाटचालीचे विद्याताईंनी स्वागत केले.

विद्याताईंनी भाषणाच्या शेवटी सर्व आमदार, नगरसेवक यांच्यासाठी या पुस्तकाचे सामूहिक वाचन व्हावे अशी इच्छा व्यक्त केली. तसेच गुरमेहर या पंजीबी मुलीचे वाक्य उद्धृत केले– ''माझ्या पिताजींना पाकिस्तानने नव्हे तर युद्धाने मारले'' यावरच्या गदारोळाचा त्यांनी निषेध केला. समारंभाच्या शेवटी 'ग्रंथाली' व दातार कुटुंबीयांच्या वतीने सर्वांना धन्यवाद दिले गेले व शेवटी श्रीमती ज्योती म्हापसेकर यांच्या 'तू खुदको बदल तबही तो जमाना बदलेगा' या समयोचित गीताने झाला.

एक सुंदर कार्यक्रम. परतताना सर्वांच्या चेहऱ्यावर त्याचे समाधान दिसत होते.

**– विजया चौहान**
भ्रमणध्वनी : ९८२०२३६३६७


ग्रंथाली




## तरीही शेषप्रश्न

**छाया दातार**

छाया दातार यांचा एक अभ्यासक आणि एक कार्यकर्त्या अशा दोन्ही भूमिकांमधून स्त्रियांच्या चळवळीत सातत्याने आणि महत्त्वपूर्ण सहभाग राहिला आहे. त्यांच्याच शब्दात ही एक डॉक्यूनॉव्हेल आहे. त्यातला काही भाग आत्मचरित्रासारखा वाटला तरीही लेखिकेचे हे आत्मचरित्र नाही. त्याला स्त्री–चळवळीच्या प्रवाहाचे चरित्र म्हणता येईल. त्यात चळवळीचा केवळ दस्तावेज नाही तर त्याच्या बरोबरीने चळवळीतल्या अनेक चर्चा, मतभेद आणि जिवंत अनुभवाची चित्रे आहेत. केरळात अनेकदा प्रवास करताना पाण्याच्या प्रवाहाची सोबत घेत आपण काठाकाठाने प्रवास करतो. तसा हे लेखन वाचताना अनुभव येतो. पाण्याचे प्रवाहीपण, त्यावरचे तरंग, भोवरे आणि भवतालाचे प्रतिबिंब हे सारे या प्रवाहचरित्रातून भेटत राहते.

**– विद्या बाळ**

**मूल्य ३०० रुपये**
**सवलतीत १८० रुपये**

## संजीवनी खेर यांची दोन नवीन पुस्तके

## जलसुक्त आणि नोबेल साहित्यिक




लेखिका संजीवनी खेर यांनी गावातल्या खेडूत स्त्रीच्या डोळ्यांतले पाणी शोधायचा प्रयत्न केला आहे. एखादा खेडवळ ग्रामीण माणूस जसा हातात काठी घेऊन पाण्याचा शोध अचूकपणे घेतो तसा. ती कला, पण लेखिकेने लेखणीच्या काठीने पाणी धुंडायचा प्रयत्न केला आहे आणि आनंदाचे भरते यावे तसा पाण्याचा साठा तुमच्या– आमच्या संवेदनांमध्ये असल्याचा आनंद तिला होत असलेला आनंद तुमच्यापर्यंत पोचवायची ही धडपड म्हणजे हे पुस्तक...

**मूल्य २५० रु.**
**सवलतीत १५० रु.**

---

शतकातील माणसाच्या वेदनांचे, अत्यानंदाच्या सार्थ क्षणांचे हे साक्षीदार, ज्यांनी हा अंतर्मनातील बहुरंगी मोरपिसारा जगापुढं फुलवला. जग सदाहरित करणाऱ्या करुणाकर मेघांच्या आगमनाची आशा फुलवली. सत्तेच्या, संपत्तीच्या, सुखाच्या उन्मादात माणुसकीचं प्रेय नि ईप्सित काय असावं याचं भान दिलं. दुःखाचे, नानाविध छटा असलेले विव्हळ क्षण वाचकाला वाचनानंद देऊन जातात. आपल्याच अंतरीचं गूढ उकललेलं आहे.




**मूल्य २५० रु.**
**सवलतीत १५० रु.**

## डॉ. मीना भट्ट यांचे 'हृदयाच्या भूलगोष्टी'

डॉ. मीना भट्ट लिखित 'हृदयाच्या भूलगोष्टी - कथा हृदयशस्त्रक्रियेची, जीवनाची' या पुस्तकाचे प्रकाशन 'ग्रंथाली'तर्फे ३ मार्च २०१७ रोजी के.ई.एम. रुग्णालयाच्या डॉ. सेन-किनारे सभागृहात संपन्न झाले.

वैद्यकीय क्षेत्रातील विविध मान्यवर व्यक्ती, आप्तस्कीय तसेच भट्ट दांपत्याच्या मित्रमैत्रिणी ह्यांची खूप मोठ्या प्रमाणात उत्साही उपस्थिती या समारंभास लाभली होती.

के.ई.एम. रुग्णालयातील भूलशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. इंद्राणी यांनी उपस्थितांचे स्वागत केले व शिस्तबद्ध सूत्रसंचालन केले.

प्रथम 'ग्रंथाली'च्या धनश्री धारप यांनी पुस्तक प्रकाशनाचा हेतू व 'ग्रंथाली'च्या विविध योजना ह्याबद्दल थोडक्यात माहिती दिली.

पुस्तकाच्या लेखिका डॉ. मीना भट्ट (माजी भूलशास्त्र विभागप्रमुख, के.ई.एम. रुग्णालय) ह्यांनी आपल्या भाषणात या पुस्तकामागील प्रेरणा विषद केली. आदरणीय डॉ. ध्रुव व डॉ. सेन ह्यांच्या मार्गदर्शनाने व अथक परिश्रमाने भूलशास्त्र विभागाची तसेच हृदयशस्त्रक्रियेची झालेली प्रगती भक्तिभावाने नमूद केली. आयुष्यातील मजेदार किस्से, रुग्णांच्या व शस्त्रक्रियेच्या आठवणी व सहकाऱ्यांबरोबरचा सहप्रवास सामान्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या शब्दांत त्यांनी पुस्तकाचे वर्णन केले.

लोकमान्य टिळक रुग्णालयाच्या भूलशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. भारती तेंडोलकर यांनी पुस्तकाच्या काही मजकुराचे ओघवत्या शैलीत वाचन केले.

डॉ. जी.बी. परुळकर (माजी अधिष्ठाता व हृदयशस्त्रक्रिया प्रमुख, के.ई.एम. रुग्णालय) यांनी भारतातील पहिल्या हृदयरोपणाची शस्त्रक्रिया पुन्हा एकदा उपस्थितांपुढे जिवंत केली.

डॉ. बाळ भालेराव (सर्वसाधारण शस्त्रक्रिया प्रमुख) हे डॉ. मीना भट्ट यांचे बालस्नेही व सहकारी. आपल्या भाषणात त्यांनी आपल्या बालमैत्रिणीचे मजेदार किस्से सांगितले.

डॉ. स्नेहलता देशमुख (मुंबई विद्यापीठाच्या माजी कुलगुरू) यांनी आपल्या जीवश्चकंठश्च मैत्रिणीचे स्वभाववर्णन अनेक चपखल कविता पंक्तींनी केले. भट्ट दांपत्याची एकरूपता व त्यातील गोडवा ह्याकडे पुस्तकाचे श्रेय जाते ह्याची काव्यात्मक जाणीव सभागृहास करून दिली.

सर्व महानगरपालिका रुग्णालयांचे संचालक डॉ. अविनाश सुपे यांनी अतिशय महत्त्वाचा मुद्दा मांडला. ते म्हणाले की हे पुस्तक हा वैद्यकीय विश्वाचा ऐतिहासिक ठेवा आहे व त्यामुळे ह्या पुस्तकाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. अशी अनेक पुस्तके साहित्य विश्वात यावीत.

आभारप्रदर्शनाने या समारंभाची सांगता झाली.

**डॉ. भारती तेंडोलकर**

आर्णी, यवतमाळ येथे पुरुषोत्तम विठ्ठलराव गावंडे यांच्या 'डोळियांचा डोळा' ह्या पुस्तकाचे प्रकाशन त्यांच्या 'पंढरी' ह्या वास्तूत प्रसिद्ध कवी प्रा. ज्ञानेश्वर वाकुडकर यांच्या हस्ते झाले. माजी कुलगुरू नागपूर विद्यापीठ डॉ. भालचंद्र चोपणे, वामनराव गावंडे व ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर उपस्थित होते. प्रा. वाकुडकरांनी 'बाबा जहर खाऊ नका' ही शेतकरी आत्महत्यावरील कविता ऐकवून नव्या पिढीने आता चिकित्सक बनावे असे आवाहन केले तर चोपणेंनी हे पुस्तक 'जीवनावरील उत्तम भाष्य' असे प्रतिपादन केले. हिंगलासपूरकरांनी 'ग्रंथाली'च्या विविध वाचन प्रोत्साहक योजनांची माहिती दिली. संचलन प्रा. राऊत यांनी केले. आभार प्राचार्य यादवराव ठाकरे यांनी मानले.



**पुरुषोत्तम गावंडे यांनी त्यांच्या 'डोळियांचा डोळा' ह्या पुस्तकाचा लेखक मानधनाचा धनादेश शेतकरी कुटुंबाला दिला. अनुसयाबाई मुधोळकर, रोली गाव, ता. आर्णी, जि. यवतमाळ**

# सुधीर कारखानीस लिखित 'प्रतिबिंब'

मुंबई : 'ग्रंथाली' प्रकाशनाने आयोजित केलेला, सुधीर कारखानीस लिखित 'प्रतिबिंब' या लघुकथा संग्रहाचा प्रकाशन सोहळा मुंबईच्या विलिंग्डन कॅथॉलिक जिमखान्याच्या ऑर्किड हॉलमधे १५ फेब्रुवारी २०१७ रोजी पार पडला. कार्यक्रमाचे मुख्य पाहुणे माननीय जब्बार पटेल होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नंदिनी कारखानीस यांनी केले.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. प्रिया कर्णिक यांच्या सुस्वर सरस्वती स्तवनाने झाली.

अमलेश कणेकर यांनी लघुकथा संग्रहाचे समालोचन केले. कणेकर आपल्या भाषणात म्हणाले की एका इंजिनियरने लिहिलेल्या कथांमध्ये भावनेचा ओलावा कमी असण्याची शक्यता असते परंतु सुधीर कारखानीस यांनी लिहिलेल्या लघुकथांमधे प्रसंगोचित भावनांचा अविष्कार उत्तम तऱ्हेने हाताळलेला आढळतो. मुख्य पाहुण्यांबद्दल चार शब्द सांगताना कणेकर म्हणाले की, जब्बार पटेल यांच्या 'सिंहासन' या चित्रपटाने त्या काळच्या तरुणांना विचारांची नवी दिशा दाखवली. कला चित्रपटांना एक वेगळाच दर्जा जब्बार पटेल यांनी आणून दिला. कणेकर पुढे म्हणाले की या एका आगळ्या लघुकथासंग्रहाचे प्रकाशन जब्बार पटेल यांच्यासारख्या युगप्रवर्तक कलाकाराच्या हस्ते होत आहे ही मानाची गोष्ट आहे.

यानंतर, लेखकाचे मनोगत व्यक्त करताना लघुकथा संग्रहाचे लेखक सुधीर कारखानीस म्हणाले की या कथांमधील व्यक्तिरेखा व कथानक पूर्णपणे काल्पनिक आहेत. यात व्यक्त झालेल्या समस्या आजच्या युगात, मध्यमवर्गीय माणसाच्या आयुष्यात येऊ शकतात, आणि म्हणूनच काही अंशी त्या खऱ्याही वाटू शकतील. सुधीर कारखानीस यांनी आपल्या सर्व स्नेही गणाचे आणि विशेषत: जब्बार पटेल यांचे कार्यक्रमास उपस्थित राहून शोभा आणल्याबद्दल आभार मानले.

मुख्य पाहुणे माननीय जब्बार पटेल यांनी, यानंतर सुधीर कारखानीस लिखित 'प्रतिबिंब' या लघुकथा संग्रहाचे प्रकाशन झाल्याचे जाहीर केले. आपल्या भाषणात ते म्हणाले, आज अमलेश कणेकर यांनी माझ्या सिंहासन या चित्रपटाची आठवण जागृत केली. माझ्या इतर जुन्या कलाकृतींबद्दलही ते बोलले आणि आपल्या सर्वांनाच त्यांनी भूतकाळात नेले आणि त्यापलीकडे, माझ्या दृष्टीने अतिशय आनंदाची गोष्ट म्हणजे, आज येथे माझ्या जुन्या वर्गमित्राने लिहिलेल्या लघुकथा संग्रहाचं प्रकाशन करण्यासाठी मला बोलावलं. इथे माझे आणखीही काही जुने वर्ग मित्र, शाळा मित्र भेटले, यामुळे आता तर माझं मन जवळ जवळ साठ वर्षा पूर्वीच्या भूतकाळात जाऊन पोहोचलं आहे.

सुधीर, मी आणि इथे जमलेले माझे वर्गमित्र हे सगळे सोलापूरच्या हरिभाई देवकरण हायस्कूलचे विद्यार्थी. माझ्या लहानपणापासूनच माझ्या वडिलांचा, आमच्या सर्व कुटुंबियांवर चांगले संस्कार व्हावेत असा कटाक्ष असे. सोलापुरातही आमचं घर सुसंस्कृत लोकवस्तीत होतं. सोलापूरचं हरिभाई देवकरण हायस्कूल जिल्ह्यातल्या उत्तम शिक्षण संस्थांमधे एक, गणले जाते असे. शिक्षकवर्गही उत्कृष्ट होता. आम्ही आठवीत असताना श्रीराम पुजारी सर आम्हाला मराठी शिकवायला आले. भाषेचा, साहित्याचा, संगीताचा अफाट व्यासंग असलेल्या त्या गुरुवर्यांने आमची सर्वांचीच मनं जिंकून घेतली. जगातल्या कोणत्याही स्टेजवर येण्याच्या तब्बल एक वर्ष आधी, पुजारी सरांनी पुलंच्या 'तुझं आहे तुजपाशी'चं समग्र वाचन आमच्या वर्गात केलं होतं. मराठी भाषेतील उत्तमोत्तम कवितांचा संग्रह 'सुवर्णनिधी' या नावाच्या वहीत करण्यासाठी सरांनीच आम्हा विद्यार्थ्यांना प्रवृत्त केलं होतं.

माझ्या वडिलांची जेव्हा सोलापूरहून दौंड येथे बदली झाली तेव्हा त्यांना माझ्या अभ्यासाची बसलेली चांगली घडी मोडणं रुचलं नाही. यावर तोडगा काढण्यासाठी माझ्या वडिलांनी पुजारी सरांची गाठ घेतली आणि माझं शिक्षण सोलापूरला हरिभाई देवकरण हायस्कूल मधेच चालू ठेवायचं आणि मी पुजारी सरांच्या घरीच रहायचं असा तोडगा निघाला. मग पुढची तीन शालेय वर्षे मी पुजारी सरांच्या घरीच राहिलो आणि हरिभाई हायस्कूल मधेच एस.एस.सी.पर्यंतचे शिक्षण पुरे केले.

सरांना स्वत:चे मूलबाळ नव्हते. सरांनी व बाईंनीही माझ्यावर पुत्रवत प्रेम केले. पुजारी सर अत्यंत रसिक होते. साहित्याचा, काव्याचा, संगीताचा त्यांचा व्यासंग दांडगा होता. या क्षेत्रातील मोठ्या मोठ्या कलाकारांची त्यांच्याकडे बरीच ये-जा असे. 'पहाटेचं कडी कोणी खडखडावतंय', म्हणून उठून दरवाजा उघडावा तर समोर भीमसेन जोशी उभे, नाही तर मंगेश पाडगावकर उभे, असे प्रसंग मी पुजारी सरांच्या घरी रहात असताना कितीदा तरी अनुभवले आहेत. तिथे पुढच्या खोलीत एकत्र बसून अनौपचारिक वातावरणात चाललेल्या साहित्यिक चर्चा, गाण्यांचे रियाज हे सर्व जवळून पाहिल्यामुळे, अनुभवल्यामुळे नाट्य कलाक्षेत्राकडे माझा आपोआपच कल वळला. पुढे एस्.एस्.सी.नंतर, प्राथमिक कॉलेज आणि नंतर आम्ही सगळेच वेगवेगळ्या दिशांना पांगलो. मी पुण्याला मेडिकलला गेलो, पेडिट्रिशिअन झालो. सुधीर इंजिनियरिंगला गेला आणि आज पन्नास वर्षांनी तो मला इथे भेटतो आहे.

इंजिनियरींग क्षेत्रात सुधीरने नावलौकिक मिळवला असणार

याबद्दल मला शंका नव्हतीच, पण उत्तम साहित्य निर्माण करण्याच्या त्याच्या क्षमतेबद्दल माझ्या मनात शंका होती. 'प्रतिबिंब'मध्ये या लघुकथा संग्रहाची प्रत जेव्हा माझ्या हाती आली आणि मी सर्व कथांचे जेव्हा समग्र वाचन केले तेव्हा माझ्या सर्व शंका दूर झाल्या. मला वाटतं की या संग्रहातील लघुकथांना जो जिवंतपणा आलेला आहे आणि खरेपणाची झालर लागलेली आहे, त्याचं कारण असंही असू शकतं की ही पात्रे लेखकाला त्याच्या जीवनात कुठे न कुठे भेटलेली आहेत, आणि जरी लेखकाने सर्व प्रसंग काल्पनिक असल्याची ग्वाही दिलेली असली तरीही मला असं वाटतं की यातील काही घडामोडी लेखकाने जवळून पाहिल्या आहेत.

कोणतीही उत्तम कलाकृती, तसेच उत्तम लघुकथा, कधीच पूर्णपणे काल्पनिक असू शकत नाहीत. लेखकाने त्याच्या जीवनामध्ये अनुभवलेल्या लहानशा का होईना, एखाद्या सत्य घटनेवर लेखक आपल्या कल्पनेचा मिनार उभारतो आणि त्यातूनच उत्कृष्ट लघुकथा निर्माण होते.

'प्रतिबिंब' या लघुकथासंग्रहातील काही लघुकथा हलक्या फुलक्या आहेत तर काही लघुकथांमधून लेखकाने बहुतांशी डोळ्याआड केल्या जाणाऱ्या सरळमार्गी मध्यवर्गीयांच्या समस्यांना तोंड फोडले आहे. 'चक्रव्यूह' या लघुकथेत दिसते नव-निवृत्त ज्येष्ठ नागरिकाची असहायता. परदेशात वास्तव्य करणाऱ्या मुलांच्या जीवनाची वेगळी वळणे आणि त्या समस्या हाताळण्यासाठी आईवडिलांना आपल्या विचारसरणीत करावे लागणारे आमूलाग्र बदल प्रतीत होतात, 'ज्ञानाचा उपयोग' आणि 'निखळलेले सांधे' या कथांमधून कॉर्पोरेट जीवनातील कुतरओढ साध्या सरळमार्गी मनुष्याच्या जीवनात कशी घालमेल घडवून आणू शकते ते दिसून येते 'सुटलेले कोडे' आणि 'ठोस पुरावा' या लघुकथांतून.

लेखकाच्या म्हणजे सुधीर कारखानीस याच्या लेखनशैलीचं वैशिष्ट्य असं की समस्यांतून बाहेर निघण्याच्या वाटा किंवा अशा समस्या न येण्यासाठी खबरदारी, या विषयांवर प्रवचनबाजी करण्याच्या फंदात तो अजिबात पडत नाही, पण त्यामुळेच की काय या लघुकथा जास्त अर्थपूर्ण वाटतात.

शेवटी, लेखकाच्या, या व पुढच्या साहित्यकृतींना साहित्य प्रेमी जनतेकडून चांगला प्रतिसाद मिळो अशी आशा जब्बार पटेल यांनी व्यक्त केली.

सुधीर कारखानीस यांनी आभार प्रदर्शन करून व मान्यवरांना सन्मानचिन्ह प्रदान करून कार्यक्रमाची सांगता केली.

---

**पुणे :** सुधीर कारखानीस लिखित आणि 'ग्रंथाली' प्रकाशित 'प्रतिबिंब' या लघुकथा संग्रहाचा पुण्यातील प्रकाशन सोहळा कर्वे रोड कोथरुड, येथील अंबर हॉलमध्ये, १५ मार्च २०१७ रोजी पार पडला. कार्यक्रमाचे मुख्य पाहुणे माननीय डॉ. वासुदेव भागवत होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भट यांनी केले. सोलापूरच्या हरिभाई देवकरण हायस्कूलच्या १९५९च्या एसएससी बॅचचे माजी विद्यार्थी, कॉलेज ऑफ इंजिनियरींग पुणे यातील १९६६ च्या बॅचचे माजी विद्यार्थी तसेच मुंबईच्या टाटा पॉवर कंपनीचे निवृत्त उच्चाधिकारी याप्रसंगी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात कु. रिद्धी देशमुख यांच्या सुस्वर सरस्वती स्तवनाने झाली. ग्रंथाली प्रकाशनाचे मनोगत सांगताना श्रीधर देशपांडे म्हणाले की प्रतिबिंब हा एक आगळा लघुकथा संग्रह आहे. यातील कथा जरी पूर्णपणे काल्पनिक असल्या तरीसुद्धा अनेक कथांतील पात्रं वाचकांना कुठे न कुठे तरी भेटल्यासारखी वाटतात आणि त्याचमुळे त्यातील घटनांना जिवंतपणा आलेला आहे.

बडोद्याचे साहित्यरसिक सुभाषचंद्र लेले यांनी बडोदेकरांच्या मराठी साहित्यप्रेमाचे, ऐतिहासिक आणि वर्तमान काळातील अनेक घटनांद्वारे साद्यंत अवलोकन केले. सन १८७५ ते १९३९ च्या सयाजीराव गायकवाडांच्या कारकीर्दीत रुजलेल्या, जोपासलेल्या मराठी साहित्यसेवेची आणि नाट्यकलेला दिलेल्या राजकीय प्रोत्साहनाची माहिती लेले यांनी सोदाहरण दिली. लेले पुढे म्हणाले की नंतरच्या काळातही बडोदेकर अनेक साहित्य महोत्सव, नाट्य महोत्सव साजरे करून, मराठी नाटकांसाठी नाट्यगृहे उपलब्ध करून देऊन मराठी भाषेची सेवा करत आलेले आहेत.

आपल्या व्याख्यानाच्या ओघात, धार्मिक, सामाजिक, ऐतिहासिक, ललित अशा चतुरस्त्र क्षेत्रांत साहित्यरचना करणाऱ्या बडोद्यातील अनेक साहित्यिकांचा व त्यांच्या साहित्यिक अविष्कारांचा लेले यांनी उल्लेख केला.

आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. वासुदेव भागवत यांनी आपल्या स्वतःच्या व्यावसायिक आयुष्यातील सुरुवातीच्या संघर्षाबद्दल आणि नंतरच्या यशस्वी जीवनाच्या वाटचालीबद्दल, व्यावसायिक साहित्यसेवेबद्दल मनोरंजक माहिती दिली. 'प्रतिबिंब' या कथासंग्रहातील लघुकथांच्या विषय निवडीबद्दल आणि लेखनाच्या उच्च दर्जाबद्दल डॉ भागवत यांनी आनंद व्यक्त केला. आपल्या आयुष्यात मिळालेल्या अनुभवाच्या प्रत्येक क्षणाला खरेपणाचा कस लावल्यानंतर चांगल्या साहित्याची निर्मिती होते असे सांगून डॉ. भागवतांनी लेखकास पुढच्या सर्व साहित्यकृतींसाठी शुभकामना दिल्या.

प्रकाश आठले व नीला भागवत यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# 'यश म्हणजे काय?' या पुस्तकाचे प्रकाशन

''उदात्त ध्येयावर आधारलेले जीवन समर्थपणे जगण्यासाठी स्वत:स सक्षम बनवणे व ध्येयपूर्तीच्या दिशेने ठोस प्रगती करणे म्हणजे यशस्वी जगणे असे मी मानतो. 'यश म्हणजे काय?' हे पुस्तक तरुण मंडळींना यश म्हणजे काय, हे समजण्यास व शाश्वत यशाकडे समर्थपणे वाटचाल करण्यास उत्तम मार्गदर्शन करू शकेल,'' असं मत सुप्रसिद्ध वैज्ञानिक डॉ. अनिल काकोडकर यांनी व्यक्त केले.

ठाण्यातील जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या पेशवे सभागृहात शनिवार, २५ मार्च २०१७ रोजी 'ग्रंथाली' आणि 'बुकगंगा' यांच्या संयुक्त विद्यमाने सुप्रसिद्ध लेखिका शिल्पा खेर यांच्या 'यश म्हणजे काय?' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी शिल्पा खेर यांच्या 'यश म्हणजे काय?' या पुस्तकाचे तसेच इ-बुकचे प्रकाशन करण्यात आले. या पुस्तकाचे हिंदी भाषांतर ठाण्यातील लेखिका डॉ. शुभा चिटणीस यांनी केले आहे. त्याचेही प्रकाशन करण्यात आले. शिल्पा खेर यांच्या 'ए मेरे वतन के लोगो' व 'सोल्जर इन मी (भाग २)' या पुस्तकांच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशनही यावेळी करण्यात आले.

'यश म्हणजे काय?' या पुस्तकात विविध क्षेत्रांतील प्रथितयश व्यक्तिमत्त्वांनी यशाबद्दलच्या त्यांच्या संकल्पना व्यक्त केलेल्या आहेत. 'भाग्यश्री फाउंडेशन'च्या माध्यमातून काम करत असताना किशोरवयीन विद्यार्थ्यांच्या यशाच्या संकल्पना म्हणजे केवळ धनसंपत्ती, प्रतिष्ठा आणि लोकप्रियता मिळवणे म्हणजे यश, हे लक्षात आल्याने, तरुण वर्गाला खरे यश म्हणजे काय हे समजावून सांगण्याची नितांत गरज आहे, त्यासाठीच या पुस्तकाचा लेखनप्रपंच केला गेला, असे प्रतिपादन पुस्तकाच्या लेखिका शिल्पा खेर यांनी त्यांच्या मनोगतात व्यक्त केले. 'पितांबरी'चे व्यवस्थापकीय संचालक रवींद्र प्रभुदेसाई यांनी यश हे हिमनगासारखं असतं ते पाण्याच्यावर फक्त एकतृतीयांश असतं. दोनतृतीयांश अपयश पाण्याखाली असतं. मात्र त्यावर मात करूनच यश प्राप्त होत असतं, असे मत व्यक्त केले. जाहिरात क्षेत्रातील व्यक्तिमत्त्व भरत दाभोळकर यांनी 'काहीतरी वेगळा विचार करणं, आनंद मिळवणं' म्हणजे यश! असे सांगून आपले अनुभव दिलखुलासपणे मांडले.

वैद्यकीय क्षेत्रातील सर्जनशील सर्जन डॉ. प्रेमानंद रामाणी यांच्या मते, आपली तत्त्वे न सोडता काम करत राहावे. यश आपोआपच मिळत जाते. खरे यश ओळखण्यासाठी मानसिक बळ लागते, असे विचार स्पष्ट झाले. या कार्यक्रमास व्यासपीठावर डॉ. अनिल काकोडकर, भरत दाभोळकर, रवींद्र प्रभुदेसाई, डॉ. प्रेमानंद प्रभुदेसाई, डॉ. प्रेमानंद रामाणी, 'ग्रंथाली'चे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर, 'बुकगंगा'च्या संचालिका सुप्रिया लिमये, डॉ. जितेंद्र खेर आणि लेखिका शिल्पा खेर तसेच डॉ. शुभा चिटणीस हे उपस्थित होते. कार्यक्रमस्थळी पुस्तकाच्या २००० प्रती संपल्या. (कौस्तुभ शेळके - जोशी एन्टरप्रायजेस यांनी ३५० प्रती, अध्यक्ष - सुधागड एज्युकेशन सोसायटी २५० प्रती, ठाणे महानगरपालिका २५० प्रती, हरिश मणियार - शिवस्वराज्य संवर्धन प्रतिष्ठान १०० प्रती, अनिल ताटीया - ओसवाल उत्कर्ष मंडळ १०० प्रती, अर्चना आचार्य १०० प्रती, संदीप ढवळे ५० प्रती. उरलेल्या प्रती व्यक्तिगत ग्राहकांनी घेतल्या.)

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. लतिका भानुशाली यांनी केले. तर संयोजन 'ग्रंथाली'च्या धनश्री धारप यांनी केले.


ग्रंथाली

## यश म्हणजे काय? : शिल्पा खेर

यश म्हणजे काय? या प्रश्नाचा वेध घेण्याचा एका वेगळ्या प्रकारचा प्रयत्न या पुस्तकात केलेला आहे. समाजातील वेगवेगळ्या क्षेत्रातील प्रतिथयश मंडळींच्या मुलांनी घेतलेल्या मुलाखती व त्या अनुषंगाने त्यांची आपसातील चर्चा, अशा स्वरूपात या प्रश्नाच्या उत्तराची उकल तरुण मंडळींपुढे मांडण्याचे काम मोठ्या समर्थपणे त्यांनी केले आहे. केवळ पैसा आणि प्रसिद्धी पुरत्या यशाच्या कल्पना मर्यादित न ठेवता त्या पलीकडेही खूप मोठे दालन उघडे असल्याचे मान्यवरांच्या अनुभव व कर्तृत्वाच्या माध्यमातून त्यांनी मोठ्या वस्तुनिष्ठपणे मांडले आहे. प्रगल्भ विचार करण्याची क्षमता असलेल्या पण आजच्या भौतिकयुगाचा पगडा असलेल्या आजच्या तरुण वर्गाला हे विवेचन नव्याने विचार करण्यास प्रवृत्त करेल अशी आशा वाटते.

– डॉ. अनिल काकोडकर




मूल्य २५० रुपये
सवलतीत १५० रुपये

## पुस्तक प्रकाशन वृत्तांत

# 'क्रिकेटच्या ऐश्वर्या' – नीता चापले मुख्यमंत्र्यांच्या दालनात प्रकाशन

मुंबई : नीता चापले लिखित 'क्रिकेटच्या ऐश्वर्या' ह्या पुस्तकांचे प्रकाशन महाराष्ट्र राज्य मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विधानभवनातील मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयात झाले. चापले ह्या विदर्भातील उत्कृष्ट महिला क्रिकेटपटू लग्नानंतर त्यांनी मुंबईला ऐरोली येथे क्रिकेट ॲकॅडमी सुरू केली. त्या ॲकॅडमीमुळे क्रिकेटशी असलेले नीताचं नातं जुळून राहिलं. तिची मुलगी ऐश्वर्या ही देखील आईप्रमाणे क्रिकेटपटू होण्याचे स्वप्न बघत होती. परंतु बयाच्या १७व्या वर्षी अनपेक्षित अपघाताने तिचे निधन झाले. या धक्क्यातून नीताने स्वत:ला सावरत महिला क्रिकेटवर पुस्तक लिहिण्याचं ठरवलं. महिला क्रिकेटपटूच्या अनुभवांवर आधारित हे पुस्तक 'क्रिकेटच्या ऐश्वर्या' तिने मुलीला समर्पित केलं आहे. ह्या पुस्तकाद्वारे ऐश्वर्या आठवण रूपाने जिवंत झाली आहे. हे पुस्तक महिला क्रिकेटला योगदान ठरणार आहे.

या पुस्तकाचे प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्यावेळी नेहा पेडणेकर, नितीन चापले, सुदेश हिंगलासपूरकर, लेखिका नीता चापले, तेजस चापले, धनश्री धारप इत्यादी उपस्थित होते. त्यानंतर लेखिकेने हे पुस्तक भाजप मुंबई शहर अध्यक्ष आशिष शेलार व शिक्षणमंत्री विनोद तावडे यांना भेट दिले.


ग्रंथाली





## क्रिकेटच्या ऐश्वर्या

**नीता चापले**

'क्रिकेटच्या ऐश्वर्या' पुस्तकाच्या घडामोडीत लेखिका नीता चापले यांचा सहभाग आहे. केवळ क्रिकेट खेळून त्यात समाधान न मानता त्यातील स्त्रियांच्या सहभागाची नोंद घेऊन त्यांचे कर्तृत्व जगासमोर आणण्याचा त्यांचा प्रयत्न स्तुत्य आहे. आपल्या वैयक्तिक दु:खावर मात करत अखंड परिश्रमाने केलेले हे सगळे संकलन क्रिकेटप्रती असलेली त्यांची समर्पण भावना दर्शवते. या पुस्तकातून स्त्रियांच्या क्रिकेट विश्वातील स्थानाचा परिचय होईलच, पण त्यापासून प्रेरणा घेऊन अनेक तरुणी या क्षेत्राकडे नक्कीच वळतील असा विश्वास वाटतो.

**मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.**

## राष्ट्रपती पुरस्काराबद्दल अभिनंदन





**'ग्रंथाली'ने प्रकाशित केलेली यशवंत व्हटकर यांची पुस्तके**

- सदरक्षणाय खलनिग्रहणाय
- गुन्हेगारीच्या मागावर
- सत्यमेव जयते

## द मॅड तिबेटियन

### एका वेगळ्या अनुभवाची प्रचिती...

प्रत्येक लेखक आपल्या अनुभवविश्वातील तुकडे कोलाज करून लेखनातून मांडत असतो. लेखक जर नेहमीपेक्षा वेगळ्या अनुभवांना सामोरे गेला असेल तर त्यांच्या कलाकृतीही तशाच बनतात. सिनेमा क्षेत्रासारख्या बहुरंगी, बहुपेडी जगतात वावरताना आपल्या संवेदनशील मनाने अनुभव टिपणारी अभिनेत्री दीप्ती नवल यांचा कथासंग्रह 'द मॅड तिबेटियन' मराठी वाचकांच्या भेटीला येतो आहे. मेहता पब्लिशिंग हाऊसने हा अत्यंत तरल कथांचा अनुवाद आणला आहे. सुनंदा अमरापूरकर यांनी या कथांचा अनुवाद केला आहे. संवेदनशील लिखाण जेव्हा एका भाषेतून दुसऱ्या भाषेत येते, तेव्हा अनुवादकाची कसोटी लागत असते. प्रत्येक शब्द, त्या शब्दामागची नेमकी भावना दुसऱ्या भाषेत आणावी लागते. अनुवादकानं अगदी चपखल असा अनुवाद करून दीप्ती नवल यांच्या लिखाणातील तरलता नेमकेपणाने वाचकांपर्यंत पोहचवली आहे.

'द मॅड तिबेटीयन' या आपल्या कथासंग्रहात अभिनेत्री म्हणून काम करताना आलेल्या अनुभवांपेक्षा माणूस म्हणून आलेले अनुभव छोट्या कथांच्या माध्यमातून मांडले आहेत. या कथासंग्रहात एकूण अकरा कथा आहेत. त्या कथांचा अवकाश फार मोठा नाही; पण त्या वाचकांच्या मनावर एक वेगळा ठसा उमटवतात. छोटेच अनुभव लेखिकेनं अत्यंत ताकदीनं मांडले आहेत. 'पियानो ट्यूमर' या कथेतील फिरोझ बाटलीबॉय कधी काळी पियानो वाजवत असतो, मग तो घरोघरी जाऊन शिकवण्या घेतो आणि आता पियानो स्वरात लावून देण्याचं काम करतो. सुंदर स्वरांच्या साक्षीनं जगलेलं आयुष्य आता अर्थिक कमतरतेमुळे जिकिरीचं होऊन बसलं आहे. एका टप्प्यावर काही सुरेल आठवणी जपत तो आयुष्याला तोंड देत आहे.

'दोघी बहिणी' या कथेत पहाडी गावातील पौगंडावस्थेतील दोन सुंदर मुलींचे केस भादरून, त्यांचा पूर्णतः गोटा करण्यात येतो. आई मुलींना सोडून निघून गेल्यामुळे, त्यांच्या लांबसडक केसांत उवा झाल्या आहेत. उवांवरचा शेवटचा उपाय म्हणून गनी आणि सनीचा गोटा करण्यात येतो. अपमानित झालेल्या दोघी घरातून पळून जायचं ठरवतात. 'अघटिताची चाहूल' या कथेतील नायकाला प्रवासात भेटलेल्या मुलीविषयी वाटणाऱ्या भावना किती क्षणिक ठरतात, याचं चित्रण आलं आहे.

'पाखरं' ही लेखिकेच्या जीवनातील अत्यंत संवेदनशील, अस्वस्थ करून टाकणाऱ्या अनुभवावर आधारित कथा आहे. माणूस म्हणून आपण भोवतालाकडे कधी कधी स्वार्थीपणानं पाहतो. ज्यांचं घरटं आपणं मोडलं आहे त्या पक्ष्यांना आपल्या घरात जागा देत नाही आणि हीच माणसाची स्वकेंद्रित वृत्ती त्याला कायमची जखम देऊन जाते. 'मुंबई सेंट्रल'मध्ये खेड्यातून आलेला साधा सरळ नायक मुंबईत पाय ठेवताक्षणी एका अधःपतनाची शिकार बनतो. एक फार मोठ्ठं 'नीतिभ्रष्ट' जग त्याच्यापुढे ठाकतं.

'नवी सकाळ' ही कथा एका विलक्षण नात्याची गोष्ट सांगते. आपल्या दिवंगत पतीच्या मौजमजेतून जन्माला आलेल्या एका लहान मुलाशी मायेचं, मैत्रीचं नातं जोडायला आलेली नायिका आहे.

'द मॅड तिबेटीयन– न्योनबा' तिबेटमध्ये राहणाऱ्या एका विचक्षण माणसाची कथा आहे. त्याला सतावणारी मुलं, त्यांचं त्या मुलांशी असलेलं नातं, भावनिक गुंतवणूक खूप बारकाव्यानिशी आपल्यासमोर येते. एका वेगळ्या विश्वात नेणारी ही कथा आहे. पहाडी प्रदेशातील माणसांविषयी एक अनोखं प्रेम निर्माण करणारी कथा आहे.

'द... द... दामन' या कथेत लेखिकेला खूप घाईत, गडबडीत असताना शाळेतील मैत्रीण भेटते. तिला खूप आनंद होतो. ती आठवणींचे पूल बांधून लेखिकेपर्यंत पोचण्याचा प्रयत्न करते; पण लेखिकेकडून नकळत दुखावली जाते. अतिव्यस्ततेमुळे आपण हरवून टाकलेल्या नात्यांची ही कथा मनाला चुटपूट लावून जाते.

अभिनेत्री म्हणून वेश्येची भूमिका करायला, खरी वेश्या कशी असते हे पाहायला गेलेल्या लेखिकेला भेटलेली एक वृद्ध वेश्या 'थुली' संकटातून सोडवते. अचानक समोर आलेल्या कटू अनुभवामुळे संकटात सापडलेल्या लेखिकेसाठी स्वतः वेदना सोसणारी 'थुली' लेखिकेच्या आठवणीतून जाता जात नाही.

काबुलीवाला या भूमिकेमुळे बालमनात घर करून राहिलेले अभिनेते बलराज साहनी लेखिकेला लहानपणी कसे भेटतात, त्या अतीव आनंद देणाऱ्या आठवणीची 'बलराज साहनी' ही कथा लहान मुलीच्या नजरेतून साकारली आहे.


'रुथ मेबेरी' या लेखिकेला पटकथावर व्हायचे आहे. सगळे आयुष्य ही धडपड करण्यात जाते. शेवटी हवी असलेली ओळख रुथला मिळते; पण रूथ या ओळखीपलीकडे गेलेली आहे.

दीप्ती नवल यांच्या या संग्रहातील कथा अनुभवकथा आहेत. हरवत चाललेली माती, महानगरातील माणसाचे भयाण एकटेपण, एकट्या माणसांचे जगणे अशा वाटांवरुन चालणाऱ्या या कथा मराठी वाचकांनाही एका वेगळ्या अनुभवाची प्रचिती देतील.

मेहता पब्लिशिंग हाऊस

**द मॅड तिबेटियन**

**दीप्ती नवल**




**पृष्ठे १३६, मूल्य १५० रुपये**

**'ग्रंथाली'च्या सभासदांना सवलतीत १२० रुपये**

राष्ट्रीय युवक दिन १२ जानेवारीला असतो, म्हणून त्या दिवशी किंवा त्याच्या पूर्वसंध्येला हा कार्यक्रम घेण्यासाठी आम्ही प्रयत्नशील होतो. पण तीन डॉक्टरांच्या सोईच्या तारखा १५ जानेवारीला जुळत होत्या, म्हणून तो दिवस निश्चित केला. डॉ. सुरेश तलाठी यांनी 'मागे वळून पाहताना' असे शीर्षक सुचवले होते आणि ते यथार्थ असल्याने तशी जाहिरात दोन महिने आधीच केली. परंतु पहिलीच जाहिरात पाहून सुनील देशमुख यांनी कळवले, ''आजच्या तरुणाईला काल-परवामध्ये रस नाही, त्यांना 'आज'मध्ये रस आहे आणि 'उद्या'ची आस आहे.'' त्यामुळे मुलाखतीचा फोकस निश्चित व बरोबर असला तरी, श्री. देशमुख यांचे मार्मिक निरीक्षणही महत्त्वाचे होते. म्हणून मग दुसऱ्या जाहिरातीपासून आम्ही 'मागे वळून पाहताना' हे उपशीर्षक केले आणि मुख्य शीर्षक केले 'पुढे जाण्यासाठी'. अर्थातच, सर्वांनी या बदलाला पसंती दिली, दाद दिली. त्यानंतर मुक्तांगण मित्र, महाराष्ट्र फाउंडेशन व साधना ट्रस्ट या तीनही संस्थांनी आपापल्या बाजूने कार्यक्रमाची निमंत्रणे धाडली. शेवटच्या आठवड्यात सोशल मीडियावरून थोडा पण डिसेंट पद्धतीने प्रचार केला गेला. त्यामुळे कार्यक्रमाला गर्दी होणार हे सर्वांनाच अपेक्षित होते. परंतु सायंकाळी साडेपाच ही वेळ दिली असताना, पाच वाजताच बालगंधर्व रंगमंदिर बाल्कनीसह गच्च भरले होते. बरोबर साडेपाचला कार्यक्रम सुरू केला, तेव्हा सभागृहात चारही बाजूंनी उभे असलेल्या श्रोत्यांना विचारपीठावर येऊन बसण्यास सांगितले आणि मग दोन-तीन मिनिटांतच विचारपीठावर येऊन त्या चौघांच्या आजूबाजूला व विंगेत मांडी घालून बसणाऱ्या श्रोत्यांची संख्या अडीचशेपेक्षा जास्त झाली. त्यानंतर बाहेरची गर्दी सभागृहात घुसली. अनेक लोक कडेने उभे राहिले, काहीजण मधल्या पॅसेजमध्ये येऊन बसले. कार्यक्रमाच्या प्रारंभी आनंद नाडकर्णी यांच्या 'वेध' या संस्थेच्या वतीने एक गीत सादर केले गेले. डॉ. नाडकर्णी यांनीच लिहिलेले व संगीत दिलेले ते गीत कार्यक्रमासाठी समयोचित म्हणावे असे होते. त्यानंतर 'मुक्तांगण मित्र'च्या मुक्ता पुणतांबेकर यांच्या हस्ते मान्यवरांचे स्वागत, डॉ. सुरेश तलाठी यांचे मनोगत, सुनील देशमुख यांनी अमेरिकेतून पाठवलेल्या संदेशाचे वाचन, या कार्यक्रमासाठी देणगी दिलेल्या तीन-चार व्यक्तींचा सत्कार, साधनाच्या संपादकांनी केलेले प्रास्ताविक-निवेदन, आणि अनिल अवचट यांच्या 'कुतूहलापोटी' या समकालीन प्रकाशनाकडून आलेल्या पुस्तकाचे प्रकाशन इतके सर्व सोपस्कार अवघ्या २५ मिनिटांत संपले. त्यानंतर बरोबर ६ ते ८ अशी दोन तास ही मुलाखत झाली. विवेक सावंत यांनी काही प्रश्न या तिघांसाठी समान आणि उर्वरित प्रश्न प्रत्येकासाठी वेगवेगळे अशी रचना मनाशी जुळवली होती. एवढेच नाही तर, त्या प्रत्येकाला स्वत:विषयी व अन्य दोघांविषयी बोलता येईल अशाही काही प्रश्नांची रचना केली होती. त्यासाठी त्यांनी २४ प्रश्न तयार ठेवले होते, मात्र दोन तासांच्या मुलाखतीत केवळ १२ प्रश्नच विचारता आले. त्या संपूर्ण दोन तासांत सभागृहातील दीड हजारापेक्षा अधिक लोक 'पीनड्रॉप सायलेन्स'चा अनुभव घेत होते, आवश्यक तिथे हशा-टाळ्या तेवढ्या मिळत होत्या.




**पुढे जाण्यासाठी**
**मागे वळून पाहताना**
**अनिल अवचट, अभय बंग**
**आनंद नाडकर्णी**




महाराष्ट्र फाउंडेशन व साधना ट्रस्ट यांच्याबरोबरच अनिल अवचट, अभय बंग व आनंद नाडकर्णी या तीन डॉक्टरांच्या तीन संस्थांचे (अनुक्रमे मुक्तांगण, निर्माण, वेध) आणि विवेक सावंत यांच्या एम.के.सी.एल. या संस्थेशी संबंधित लोक कार्यक्रमाला येणार असल्याने गर्दी जमणे यात विशेष काही नव्हते पण या गर्दीत वरीलपैकी कोणत्याही संस्थेशी-संघटनेशी संबंधित नसलेल्या लोकांची विशेषत: तरुणाईची गर्दी लक्षणीय होती. त्याहून अधिक महत्त्वाचे हे होते की, तिन्ही डॉक्टर जे काही बोलत होते ते 'स्व'च्या पलीकडे जाण्यासंदर्भातच होते, सामाजिकतेला भिडणारेच होते आणि तरीही ती संपूर्ण गर्दी कान गोळा करून ऐकत होती. तिघेही डॉक्टर असले तरी प्रत्येकाचे कार्यक्षेत्र, कार्यशैली व दृष्टिकोन वेगवेगळे आहेत आणि तरीही त्यांचे कार्य व दृष्टिकोन परस्परांना पूरक आहेत, तिघांचेही अंतिम ध्येय एकच आहे अशी भावना श्रोत्यांची झाली. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे तिघांचे म्हणणे स्वतंत्रपणे ऐकले असते तर त्यात परस्परविरोध आहे, असे जाणवले असते. मात्र तिघेही स्वत:विषयी व परस्परांविषयी जे बोलले ते लक्षात घेता त्यांचा प्रवास समांतर जाणारा असून, त्यात आंतरिक एकरूपता आहे, असे नव्यानेच उलगडले. त्यामुळे 'हेतूविना प्रयास आणि दिशेविना प्रवास' हे प्रारंभीचे गीत अगदीच समर्पक असल्याचा प्रत्यय मुलाखत संपत असताना सर्वांनाच आला असावा.

दुसऱ्या दिवशी सर्वच प्रमुख वृत्तपत्रांनी या कार्यक्रमाला विशेष स्थान देऊन गौरविले. नंतरच्या आठवड्यात संपूर्ण अडीच तासाच्या कार्यक्रमाची ध्वनिचित्रफित, यू-ट्यूबवर टाकण्यात आली आणि त्यानंतरच्या दोन आठवड्यांतच जवळपास पाच हजार लोक त्या मुलाखतीपर्यंत पोहोचल्याची नोंद झाली. आणि मग साधनाच्या १८ मार्च २०१७ च्या अंकात ती संपूर्ण मुलाखत शब्दांकन करून प्रसिद्ध केली आणि आता ती संपूर्ण मुलाखत पुस्तिकेच्या रूपात आणली आहे.

फक्त या मुलाखतीचीच पुस्तिका करावी अशी मूळ कल्पना होती, पण साधना अंकातील मुलाखत वाचून अनेकांनी अशी प्रतिक्रिया दिली की, वाचताना ही मुलाखत संपूच नये असे वाटत होते. म्हणजे काहीशी अतृप्ततेची भावना ती असावी. तेव्हा असे लक्षात आले की, या तीन डॉक्टरांनी मागील चार वर्षांत साधनात लिहिलेला प्रत्येकी एक लेख असा आहे की, जो या मुलाखतीला परिपूर्णता आणून देऊ शकेल. मग ते तिन्ही लेख 'परिशिष्टे' या विभागात टाकून ही पुस्तिका तयार केली आहे.

**पृष्ठे : ७२, मूल्य : ५० रुपये**
**'ग्रंथाली'च्या सभासदांना सवलतीत ४० रुपये**


## ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६१२०७४०३**

### धर्मधुरीण

**डॉ. प्रकाश लोथे**



''आपला धर्म अन् आपली संस्कृती ह्यात गोंधळ करतो आहेस, ख्रिश्चन धर्मात वर्णन केलेली सहिष्णुता क्षमाशीलता व अहिंसा हे आपल्या धर्मात यम नियम म्हणून समजले जातात. ते पाळल्याशिवाय योगी होता येत नाही, असे गीतेत तेराव्या अध्यायात आहे...आपण गीता चिंतनपूर्वक वाचत नाही हा आपला दोष आहे. रेव्हरंड फिशरसारखा देवमाणूस तुला भेटला हे तुझे सुदैव, पण मजसारख्या हजारो विधवांना मार्गाला लावणारे अण्णा कर्वे कोण आहेत श्याम? देवमाणूसच ना? जगात देवमाणसे असतात अन् नराधमसुद्धा. हिटलर अन् स्टालिन ख्रिश्चन नव्हते का?''

डॉ. प्रकाश लोथे यांची ही पहिलीच कादंबरी. चांगली भलीमोठी. त्यामुळे वाचताना धाकधूक होणे स्वाभाविक होते. परंतु ही धाकधूक आपोआप विरळ होत गेली, आणि नकळत ती पूर्ण वाचून होईपर्यंत तिच्यात गुंतून राहिलो. धर्म आणि धर्माचरण यात इतरांच्या धर्माशी तुलना होणे हे अनादी काळापासून चालत आले आहे. त्यातली शिकवण व त्याची श्रेष्ठता याबाबत प्रत्येक धर्मीयाचे स्वतःचे ठाम मत असू शकते. परंतु जे का रंजले गाजले, तयासी म्हणे जो आपुले, या उक्तीशी थांबलेल्यांचे काय? आपला म्हणणारा त्यांना परमेश्वर वाटू लागतो, यात चूक मानण्याचे कारण नाही. जगण्याला भ्रमावस्था प्राप्त असताना कुठेतरी आधार देणारा, समजून घेणारा भेटला, तर त्याच्याविषयीचे देवपण ह्रदयात विराजमान होणारच. अशावेळी कुणी त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न केला, तरी ते समजून घेणे अनुभवाच्या पातळीवर कठीण ठरू शकते. प्रस्तुतच्या कादंबरीची गुंफण याच आवर्ताला समोर ठेवून झालेली दिसून येते. ही गुंफण करताना लेखकाचा कस लागलेला आहे, हेही दिसून येते. आपल्याला जे म्हणायचे आहे, ते तसेच मांडता येणे ही लेखकाची अग्निपरीक्षा असते. निवडलेल्या व्यक्तिरेखा, त्यांच्या सभोवतालचे वातावरण, त्यांच्यात होणारा संघर्ष, त्यांच्यातील मानसिक समतोल, या सगळ्यांची व्यवधाने सांभाळून इप्सिताकडे पोहोचणे, यासाठी लेखकाकडे केवळ प्रतिभा असून चालत नाही, त्याला कौशल्याचीही जोड असावी लागते. तर अशी पाचशे पृष्ठांची कादंबरी वाचकाला शेवटपर्यंत खिळवून ठेवण्यास समर्थ ठरू शकते. ते समर्थपण लेखकाच्या ठायी आहे, हे आश्वासन ही कलाकृती देते, लेखकाविषयीची अपेक्षा वाढविते.

कर्मठ सनातनी ब्राह्मण, प्रवचनकार आबासाहेब हे शिरोडकर कुटुंबाचे प्रमुख. विदर्भाच्या पंचक्रोशीत त्यांचा वावर, मान, मोठेपणा. त्यांची स्वतःची मते या कर्मठपणाभोवती घट्ट बिलगून आहेत. प्रत्येक वागण्याला शास्त्रीय आधार सांगणारे. त्यापलीकडे जाणे, वा वेगळे काही मत मांडणे म्हणजे पाखंड, धर्म बुडणे. अशा घरात असणाऱ्या विधवा, परित्यक्ता महिलांच्या वाट्याला उंबरठ्याच्या आत कोंडून घेणे, केशवपन हे शस्त्र ठरवून करावे लागणे, शस्त्रासारखा शास्त्राचा आधार देणे आलेच. यातला कोंडमारा कुठेही उघड न करता येणे ठरलेलेच. त्यात सावत्रपणाची झळ. अशा कुटुंबात श्याम नावाचा मुलगा आहे, ज्याच्या जन्मापासूनचे भाकीत आहे, तो अल्पायुषी असल्याचे. श्याम हुषार आहे परंतु कौटुंबिक कलह आणि आर्थिक परिस्थिती यांचे तो सावज आहे. अशा सावजाने कितीही पळून जाण्याचा प्रयत्न केला तरी पळणार कुठे, किती? परंतु अल्लाच्या घरी देर आहे, अंधेर नाही, असा सांगणारा इक्रमली तेथे आहे. तिथेही अद्भुत शक्ती आहे, त्यासाठी लॉर्ड जिझस आहे, असा सांगणारा रेव्हरंड फिशर आहे.

विमल ही एक व्यक्तिरेखा, अभागीपणाचा शाप असलेली, हुशार, मनमिळाऊ, श्याम जिला समजून घेऊ शकतो. तिला आयुष्यात सुखी पाहण्यासाठी सर्वतोपरी मदत करण्यासाठी धडपडत राहतो. तरुण विधवेला घरात कोंडण्यापेक्षा जगातल्या मुक्त वातावरणात स्वतःच्या मनाप्रमाणे जगण्याचे स्वप्न दाखवतो. ते स्वप्न पाहण्याचे,उभे राहण्याचे बळ मिळाले ते अण्णा कर्वे यांच्यामुळे, परंतु या दोन्ही आधारस्तंभांना स्वीकारण्याची तयारी कर्मठ आबासाहेबांकडे नाही. आबासाहेबांना गोऱ्यांचा देव, त्यांचा धर्म, त्यांची शिकवण अमान्य आहे. आपला मुलगा त्या धर्माच्या प्रभावाखाली जाऊन ख्रिश्चन झाला तर...त्यांना छळणारी ही सर्वात मोठी भीती. मुसलमान ही जात विश्वास ठेवण्यासारखी नाही. त्यांच्याशी संबंध ठेवणे, त्यांच्या मोहल्ल्यात जाणेही त्यांना पसंत नाही. तर श्यामचे वर्तन नेमके त्यांच्या मतांना छेद देणारे. इक्रमली त्याचा मित्र आहे, उपाशीपोटी असणाऱ्या श्यामला स्वतःच्या डब्यातली रोटी तो खाऊ घालतो. तर रेव्हरंड फिशर शिक्षणापासून ते नोकरी, दवाखाना इथपर्यंत सर्व सहाय्य करतात. तेही श्यामने ख्रिश्चन धर्माचा स्वीकार करण्याची अपेक्षा न ठेवता. आबासाहेब शेवटपर्यंत ह्याच कोंडीने अस्वस्थ व श्याम त्यावर मात करण्यासाठी अस्वस्थ. हा संघर्ष वाचकाच्या चिंतनशीलतेला आवाहन करणारा आहे. परित्यक्ता असूनही विधवा म्हणून जगणारी आक्का, दंगलीत श्यामचं घर वाचवण्यासाठी धडपड करताना मृत्यू पावलेला इक्रमली, बेवारस दामू, समजून घेणारा, मदत करणारा, उदार मनाचा फिशर, स्वार्थी काकी, अण्णा कर्वे, या व्यक्तिरेखा ठळकपणे आपला ठसा उमटवून जातात. कथानकाला वेग देण्यासाठी पत्रांचा केलेला उपयोगही उत्तम साधला आहे.


कादंबरीला स्वातंत्र्यपूर्व काळाची पार्श्वभूमी आहे. इंग्रजांचे राज्य, स्वातंत्र्य लढा, गांधीजी, जागतिक महायुद्ध, विधवांचे प्रश्न, त्यावेळची सामाजिक परिस्थिती, विदर्भाकडील वातावरण, भाषा, संस्कृती, यांचे चित्रण अतिशय नेटकेपणाने मांडलेले आहे. त्यामुळे खांडेकरांच्या काळाची आठवण येते. सतीश भावसारांचे सूचक मुखपृष्ठ 'धर्मधुरीण' या कादंबरीला अर्थपूर्ण परिमाण देते.

**मूल्य ६०० रु. • सवलतीत ३०० रु.**

# ग्रंथपान

**अवनवी**

**उषा सेठ**




लहान लहान वाटणाऱ्या घटनांना एकत्र गुंफले तर त्यांची सुरेख अशी माळ होऊ शकते. कुटुंब, त्यातली माणसे, त्यांची आपसातली नाती, भांडणतंटे, व्यवहार, प्रत्येकाचे वैयक्तिक आयुष्य हे सगळे म्हटले तर मणीच. त्यांना एकत्र गुंफले तर त्याची देखील कादंबरी होऊ शकते, 'अवनवी'सारखी. उषा सेठ यांची ही कादंबरी, 'अवनवी', तरलपणे कौटुंबिक कथा, त्यातले नात्यातले धागेदोरे, एकमेकांकडे पाहण्याची दृष्टी, व्यवहार यांचे वर्णन करणारी कादंबरी आहे. किती तरलपणे, प्रत्येक घटनेचा अन्वयार्थ लावायचा तर तो किती नेमकेपणाने, त्यापासून दूर जायचे तर किती अलगदपणे, एमकेकांना समजून घ्यायचे तर किती समंजसपणे, नात्यांना जोडून ठेवायचे तर किती घट्टपणे, या सगळ्यांना आखीवपद्धतीने उत्तरे देणारी कादंबरी म्हणून हिच्याकडे पाहता येईल. अगदी आपण शीर्षकाकडे पाहिले तर त्यात एक वेगळेपण दिसून येते, अवनवी. मूळात ही कथा आहे 'अवनी' नावाच्या व्यक्तिरेखेची. ती सरळमार्गी असूनही अनोळखी मार्गाला आपलंसं करू शकते, म्हणून 'अवनवी'.

अवनी ही लग्नानंतर नवऱ्याच्या घरी येते, तेव्हा तिच्यासाठी हे जग नवीनच. नवरा एक काहीसा परिचय होत जाणारा, बाकी सगळेच अनोळखी. त्यांचे स्वभाव, वागणं-बोलणं, अपेक्षा, दैनंदिनी हे त्याहून अपरिचित. अशावेळी त्या सगळ्यांशी जुळवून घेणे, त्यांच्या परीक्षेत उत्तीर्ण होणे, ही तिच्यासाठी मोठीच कसरत. त्यात हे मारवाडी-जैन संस्कृतीत असलेले कुटुंब. त्या संस्कृतीलाही कुठे बाधा येणार नाही याची काळजी घेणे आलेच. हे सारे अवनीसाठी दिव्यच. परंतु स्वतःचे शिक्षण, पतीचा बांधकामाशी संबधित असलेला व्यवसाय, मुलींची शिक्षणं, त्यांची लग्ने, करिअर यातून स्वतःसाठी वेळ काढणे, स्वतःचे व्यक्तिमत्त्व घडवणे, वेळ मिळेल तेव्हा आश्रमात जाणे, तिथे असलेल्या निराधार महिलांना आधार देण्यासाठी वेगवेगळे उपक्रम शिकवणे, तिथली व्यवस्था पाहणे. हे सारे अवनी करीत राहते, तेही घरसंसार सांभाळून. हे सारे करता येते, तेही घरसंसार साभाळून, हे या कांदबरीच्या माध्यमातून लेखिका दाखवून देतात.

विनय, पती. श्रेया व नेहा या मुली. आकाश, सरिता, तेजस, समीर ही भावंड. या सगळ्यांच्या व्यक्तिरेखा प्रामुख्याने आणि तितक्याच प्रभावीपणे यात आलेल्या आहेत. शिक्षण, नोकरीच्या निमित्ताने परदेशात जाणे, तिथे स्थायिक होणे, तिकडेच विवाह करणे, परत येणे याही घटना या प्रवासात येतात. अवनी ज्या आश्रमात सेवाभावी वृत्तीने काम करते, त्या आश्रमातील पदाधिकारी, तिथले सहकारी, निराधार मुली, तिथले वातावण, आपसातले मतभेद यांची वर्णने अनुभवाला येतील अशीच आहेत. या सगळ्यात आनंद आहे, घुसमट आहे, सोडून दूर जाण्याचा विचारही जोडीला येतो. या सगळ्यात महत्त्वाचं आहे ते स्वतःचे स्वपण. त्यावर आघात सोसून सेवा करणे शक्य आहे का? किंवा प्रत्येकाला आपापला व्यवसाय आहे, स्वतःचे व्यक्तिमत्त्व आहे, तसे ते आपल्याला का असू नये, आपण आपल्या पायावर उभे का राहू नये, हाही विचार येथे अवनीच्या रुपाने मांडलेला आहे. नव्हे ती तशी वागते देखील.


कादंबरी म्हटली की तिचा आवाकाही तसाच विस्तृत, अनेक अंगांना व्यापणारा. आजूबाजूच्या घटना, प्रसंग, यांना टाळता न येऊ शकणारा. या कादंबरीला मुंबईची पार्शभूमी आहे. त्यामुळे इथे घडलेले बॉम्बस्फोट, कच्छचा भूकंप झाल्याने मुंबईच्या इस्पितळात आणलेले अनेक जखमी लोक, शेअर मार्केट, बांधकाम व्यवसाय, यांचा तपशील यात आलेला आहे. परदेशात प्रवास केल्याने तेथील वर्णने आहेत. ही एका स्त्रीची कहाणी, तरी तिची मानसिकता आणि प्रवाहातील बदल, इतरांच्या वागण्या-बोलण्यातील प्रकार व त्यांची निरीक्षणे, लिखाणातील सहजता आणि विचारांची परिपक्वता, वर्णनातील नेमकेपणा आणि त्यात असलेला आपलेपणा, यामुळे कादंबरी ही लेखिकेची न राहता ती वाचकांची होते. यात आलेले संवाद आणि त्या निमित्ताने व्यक्त झालेले विचार हे वाचकाला अंतर्मुख करणारे आहेत.

स्त्री ही नेहमी एका चौकटीत बंदिस्त असते. तिचे स्थान तिथेच राहील, यासाठी कुटुंब, समाज आणि संस्कृती असे सारेच ती चौकट मजबूत राहील याची काळजी घेत असतात. अशा वेळी एखादी अवनी या चौकटीतून मुक्त वावरण्याचा ध्यास घेऊ पाहते. ती तो कसा घेईल, याची कल्पना सतीश खानविलकर यांनी मुखपृष्ठावर साकार केली आहे. जी पाहताना, प्रत्येक स्त्रीला आपले प्रतिबिंब तिच्यात पाहता येईल.

**मूल्य ४०० रु. • सवलतीत २४० रु.**

## ग्रंथपान

**पारुल : एक प्रेमकहाणी**
**मूळ लेखक : हर्ष देहेजिया**
**अनुवाद : सविता दामले**



पारुल : एक प्रेमकहाणी, हातात घेताना खिळवून ठेवले ते मुखपृष्ठारील चित्राने. मुघलकालीन काही चित्रे पाहिलेली असल्याने, तिथे कुठे या कहाणीचा संदर्भ असावा, अशी शंका मनाशी विसावली. छान गडद लाल रंगाचा तळ चित्राच्या रेखाटनासाठी ठेवलेला. लाल रंग हा प्रेमाचे प्रतीक आहे, हा अंदाज साधारणपणे सर्वांनाच ठाऊक आहे. त्याचा पूर्ण वापर इथे केलेला. दोन प्रेमिक समोरासमोर पूर्णाकृती, राजघराण्यातील पेहराव आणि आभुषणे परिधान केलेले. मधोमध वृक्ष, त्यावर वेलींची नक्षी, कूंजन करणारे पक्षी. चित्राला फ्रेम केलेली, झालरने सजवलेले. सहजपणे मनात येऊन जाते ही प्रेमकहाणी शहाजहान-मुमताज, जयदेव-पद्मावती, महिवाल-सोहनी, संवतसिंह-बनी ठनी, चंडिदास-रमी, घनानंद-सुजन, माधवानल-कामदंदला, दुष्यंत-शकुंतला यांच्यापैकी कुणाची अजरामर कलाकृती तर नसेल? प्रेमकहाणी हा कधीही शिळा न होणारा, औत्सुक्य, आनंद-विरह, भावभावना, रंगोत्सवाच्या छटा, असा काळजाला हात घालणारा विषय. वाचताना आपल्याला तरुण करीत जाणारा विषय. त्याच उत्सुकतेने वाचायला घेतला. आणि वाचतच राहिलो. त्यात पूर्ण बुडून गेलो. एक वेगळीच अनुभूती अनुभवत राहिलो. विचारांची, कल्पनेची, तत्त्वज्ञानाची एकेक दालने खुली होत राहिली आणि त्यांच्या अद्‌भुत दुनियेने सर्वांगाने प्रफुल्लित होत गेलो. शेवटी जाणवले, आपण अनुभवले ते काय होते, कहाणी, नाट्य की काव्य? काव्यच. गद्य काव्य. खूप दिवसांनी असे काही वेगळे वाचायला मिळाले, वेगळीच अनुभूती देणारे. आणि अचंबाही वाटला तो लेखकाच्या प्रतिभेचा. किती सहजपणे हे काव्य त्यांच्या लेखनीतून अवतरले आहे! इतके तरल, ओघवते, सकस काव्य! पुन्हा पुन्हा वाचावेसे वाटणारे काव्य! हे काव्य आहे अभिसारिकेचे, वासकसज्जेचे, खंडिताचे, मानाचे, प्रौढाचे, विप्रलब्धाचे, मुग्धेचे, प्रकृतीचे. नायिकेची विविध रूपे इथे अशी पाहता आली, तिच्या आत्म्याची, प्रीतीची, विश्वासाची प्रचिती येत गेली.

या कहाणीत रुढार्थाने दोन व्यक्तिरेखा आहेत. प्रफुल्ल आणि पारुल. प्रफुल्ल व्यवसायाने तत्त्वज्ञानाचा प्राध्यापक आहे. तर पारुल ही ग्रामकन्या. प्रफुल्ल विवाहित आहे. पारुल अविवाहित. एका टप्प्यावर त्यांची भेट होणे, एकमेकांकडे आकर्षिले जाणे, त्यातून निर्माण होणारी ओढ, विरह, भेटीतील उत्कटता, प्रणय, श्रृंगार, विभक्ती, हे सारे प्रेमी जिवांच्या भोवती असणारे टप्पे इथेही आहेत. म्हणून ही कहाणी पूर्ण होत नाही, अथवा अपूर्ण राहत नाही. ती संथपणे एकेक टप्पा पार करीत पुढे प्रवास करीत जाते. या प्रवासाचे साक्षीदार आहेत, पारिजात आणि चाफा. बाग. कूजन करणारे पक्षी. आजूबाजूचा निसर्ग, वरचे आकाश. चंद्र, तारे, वाऱ्याची झुळूक आणि बदलत जाणारे मास, ऋतू. प्रेमरसाने ओथंबलेल्या या प्रेमवल्ली आपल्याच कोशात जखडलेल्या नाहीत. निसर्ग त्यांचा सखा आहे, ऋतुमानानुसार त्यांच्यात बदल होत जाताना दिसतात. प्रत्येक ऋतूचा, मासाचा संबंध त्यांच्या प्रेमाशी आहे, श्रृंगाराशी आहे. तसा पारंपरिकतेशीही नाते जोडून आहे.

कथानकात आलेला हळवेपणा, भावनिकता, उदात्तता, मनोव्यापाराची अगाधता, तात्त्विक, मर्मज्ञ दृष्टी वाचकाला खिळवून ठेवते. आपल्या मोहजालात जखडून टाकते. रंग, कुंकू, साडी, वेणीची पेड, श्रृंगार, प्रणय, सौंदर्य, सुंदरता, मौन, आत्मा, शाक्त, सालभंजिनी, बुद्धाचे तत्त्वज्ञान, त्यांचे नेमके चार प्रसंग, भागवत, दृष्टांत, उगवणारा कोंब, वेली, झाडे, पाने, फुले, प्रणयिनी अशी कितीतरी रूपके आहेत, ज्यांच्यावर भरभरून विचार व्यक्त झाले आहेत. कल्पना गुंफलेल्या आहेत. पारिजात आणि चाफ्याच्या सुगंधाने सारी कहाणीच सुगंधी केलेली आहे. बागेतल्या प्रत्येक फुलाने समर्पण दाखविलेले आहे. प्रेम, ऋतू आणि निसर्ग यांचा मिलाफ म्हणजे ही कहाणी; प्रणयापेक्षा आत्म्यांचा अमोघ संवाद, असे या कहाणीविषयी निश्चितपणे म्हणता येईल.

या कथानकाला लाभलेला कालखंड आहे बारा मासाचा, चैत्रापासून फाल्गुनपर्यंतचा. श्रृंगाराने उजळलेल्या रात्री आहेत अकरा. प्रकरणांचे खंड आहेत ते याच मासांच्या नावाने. प्रत्येक खंडाच्या सुरुवातीस त्या मासाची महती काव्यात्मक पद्धतीने दिलेली आहे. ती वाचत असताना आपल्याला दुर्गाबाई भागवतांच्या 'ऋतुचक्र'चे स्मरण सतत होत राहते. प्रल्हाद जाधव यांच्या 'तांबट'चे स्मरण होते. बदलणारा निसर्ग प्रेमवल्लींमध्येही कसा बदल घडवत राहतो, त्याचे सार येथे सापडते. लेखकाने स्वतः चे सर्वस्व यात ओतले आहे, असे सतत जाणवत राहते. मुळात लेखक हे गुजराती भाषिक असल्याने तिला लाभलेली पार्श्वभूमी त्याच मातीची आहे. इतकेच. एरव्ही कुठल्याही ठिकाणी ही कहाणी आपले अस्तित्व उजळण्यात यशस्वी झाली असती. अशा कलाकृतीचा अनुवाद करणे ही मोठी जोखमीची आणि प्रतिभेची कसोटी पाहणारी गोष्ट आहे. तिच्या गाभ्यालाच काय, पाकळीला देखील अनाघ्राततेपासून दूर नेणे अशक्य ठरावे अशी नाजूक बाब परंतु सविता दामले यांनी आपला संपूर्ण अनुभव या कलाकृतीच्या पाठीशी चपखलपणे उभा केलेला दिसतो. त्यामुळे ही कलाकृती अनुवादित न राहता ती अनुवादकर्तीची मूळ कृती आहे, असेच वाटत राहते.

**मूल्य २०० रु. • सवलतीत १२० रु.**


ग्रंथाली

# ग्रंथपान

''संशोधन ही जीवनवृत्ती असायला हवी. केवळ फावला वेळ घालविण्याकरिता आणि आपल्या नावामागे पदवी लावल्याने त्याला भारदस्तपणा प्राप्त होतो, या खुळ्या समजाने इकडे येणाऱ्यांना इतकेच विनम्रपणे सुचवावेसे वाटते की, 'बाबांनो, हा तुमचा प्रांत नाही. नाही, तुम्ही संशोधन म्हणून काहीबाही करालही, त्याकरीता तुम्हाला पदवीही मिळेल, आयुष्यभर ती तुम्ही लावून मिरवालही. पण ती आत्मवंचना ठरावी.' संशोधनाकरिता शारीरिक श्रम आणि त्याहीपेक्षा बुद्धी सतत झिजवायला हवी. वाचनाने, मननाने, चिंतनाने बुद्धी तैलधारेसारखी होईल हे पाहायला हवे. संशोधक बोलू लागला की, त्या विषयावर काही नवा प्रकाश पडत आहे, आजवरच्या त्याच्या अभ्यासाला वेगळे परिमाण मिळते आहे, असे जाणवावे...''

**शोधयात्रा**

**अनंत देशमुख**




डॉ. अनंत देशमुख यांचे 'शोधयात्रा' हे पुस्तक म्हणजे लेखसंग्रह आहे. वेगवेगळ्या चर्चासत्रांत सादर केलेले शोधनिबंध, मासिकांमधून अलक्षित राहिलेल्या विषयांवर प्रसिद्ध झालेले लेख, असे त्यांचे स्वरूप आहे. अतिशय गांभीर्यपूर्वक, विषयाला पूर्ण न्याय देणारे असे चिकित्सक लेखन वाचताना सहजपणाचा अनुभव वाचकाला यायला हवा, तो या शोधयात्रेत येतो. तोही असा, थक्क करणारा. विशेषतः भाषेचा विद्यार्थी नसलेल्यांना सुद्धा त्यात रुची वाटावी, इतकी प्रभावी आणि तितकीच रसाळपणे मांडणी या लेखांची केलेली आहे, एकेक धागा सुगरणीने विणावा तशी.

या ग्रंथाची तीन भागात विभागणी केलेली आहे, संशोधनपर, व्यक्तिपर आणि समीक्षा. ही विभागणी वाचकाची सोय म्हणून केलेली आहे परंतु त्यांचे सार पाहिले, तर ते संशोधनाचे आहे. संशोधन किती व कशा प्रकारे करायचे असते, त्याचा वस्तुपाठ हे लेख समोर ठेवतात. सर्वच लेख गुणात्मकदृष्ट्या एकमेकांशी जणू स्पर्धा करीत आहेत, असेच वाटत राहते. कुठलाही लेख घ्या, तो खिळवून ठेवतो. त्यांच्याच भाषेत संशोधनाचे मर्म सांगायचे तर, 'त्या विषयावर काही नवा प्रकाश पडत आहे, आजवरच्या त्याच्या अभ्यासाला वेगळे परिमाण मिळते आहे,' असे जाणवत राहते.

'आधुनिक मराठी साहित्य' या लेखाचा आवाका किती प्रचंड असावा? काव्य, नाट्य, एकांकिका, कथा, कादंबरी, चरित्र, आत्मचरित्र, निबंध, दलितकथा, श्रमिकसाहित्य, देशात घडणाऱ्या घटनांचे प्रतिबिंब दाखविणारे साहित्य, असा विशाल पट त्यांनी उलगडून दाखविलेला आहे. साहित्यिक आणि त्यांच्या साहित्यकलाकृतींची नावे यासह संदर्भ दिल्याने अभ्यासकांसाठी एक संदर्भसूचीच उपलब्ध झाली, असे या लेखाला मूल्य लाभले आहे. ललित लेखन करणारा लेखक व विचारप्रवर्तक लेखन करणारा लेखक अशी विभागणी करून त्यांच्या लेखनात समाज, संस्कृती, देश, जातपात, राजकारण, पाशवीवृत्ती, मानवी नातेसंबंध यांचे चित्रण करण्यास कुठल्या साहित्यकृती ठळकपणे आपली नाममुद्रा उमटवून आहेत आणि कुठे कुणाचे भान अपुरे पडले आहे, याचा शोध अतिशय चिकित्सकपणे घेतलेला दिसून येतो. लेखक लिहिताना केवळ निवेदन करतो आहे की, त्यात गुणात्मकदृष्ट्या काही वाढ करू पाहतो आहे, हे लेखन संख्यात्मक होत आहे की, गुणात्मक होत आहे, जीवनाभिमुख लेखन किती आहे, जगण्याच्या मूलभूत प्रश्नावर ध्यास, चिंतनाद्वारे कलात्मक पातळीवर आविष्कृत करण्याची लेखकाची दृष्टी कमी पडते की काय, अशा विविध पातळ्यांवरून आवर्ती विवेचनाचे पडसाद या लेखातून उमटलेले दिसतात.

कलेसाठी कला की जीवनासाठी कला, जीवनवाद आणि स्वायत्ततावाद, स्वतंत्रतावादी साहित्य, लौकिकवाद आणि अलौकिकवाद, आस्वादक शैलीवादी की वास्तववादी साहित्य, अशा अनेक दृष्टिकोनांतून साहित्याकडे गेल्या शतकात कसे पाहिले गेले याचे विवेचन 'गेल्या शतकातील साहित्यविचार' या लेखातून आले आहे. 'संक्षिप्त मराठी वाङ्मय कोशाच्या निमित्ताने' या लेखात देशमुखांनी जो चिकित्सकपणा दाखविलेला आहे, तो थक्क करणारा आहे. या कोशात किती ठिकाणी अवधानाचा विसर पडलेला आहे, यांची उदाहरणे पाहताना, डॉ. देशमुखांच्या तीव्र तैलबुद्धीची प्रचिती येते.

व्यक्तिपर लेखांमध्ये आलेल्या व्यक्ती आपणास ज्ञात असलेल्या. परंतु त्यांचे अज्ञातपण उलगडून दाखविताना ज्या अनेक पैलूंकडे आणि शक्यतांकडे ते निर्देश करतात, तो वाचताना आपणही काही क्षण थबकतो. बाळाजीपंत नातू हे त्याचे उत्तम उदाहरण म्हणता येईल. मर्ढेकर समजून घ्यायचे असतील तर पुन्हा मर्ढेकर समग्र वाचायला हवेत, अशी इच्छा प्रबळ निर्माण झाली, ती 'मर्ढेकरांच्या आदर्शलक्ष्यी चरित्राच्या प्रतीक्षेत' या लेखामुळे.

शोधयात्रेतील सर्वच लेख हे केवळ लेखन, आणि समीक्षा यांचे अंतरंग उलगडून दाखवत नाहीत, तर लेखक/संपादकाने कोणते भान जपायला हवे, संशोधकाची नजर कशाप्रकारे असावी, याचा आदर्श समोर ठेवतात.

शोधयात्रा ही अक्षरबागेतील रसास्वादाची आहे. बागेत गेल्यानंतर फुलपाखरांच्या विविधतेची, नवतेची आणि तितक्याच हळूवारपणाचीही शोधयात्रा अशीच असू शकते. अक्षरबागेतील वर्णमाला आणि बागेतील फुलपाखरांची नवता ही सारखीच नव्हे काय? किंवा या शब्दसुमनांच्या बागेत विहार करायला गेलात तर तिथे सापडणारी आस्वादांची अक्षरे ही फुलपाखरांची रूपे असतील, हे ध्यानात येतं का? असा प्रश्न जणू सतीश भावसार आपल्याला मुखपृष्ठ पाहताना विचारीत आहेत, असे वाटावे, अशा कलात्मकतेने हे मुखपृष्ठ त्यांनी सजविले आहे.

**मूल्य २५० रु. • सवलतीत १५० रु.**



डॉ. मीना भट्ट लिखित 'हृदयाच्या भूलगोष्टी' पुस्तक प्रकाशनसमयी डॉ. इंद्राणी, धनश्री धारप, डॉ. रा.अ. भालेराव, डॉ. अविनाश सुपे, लेखिका मीना भट्ट, डॉ. जी.बी. परुळेकर आणि डॉ. स्नेहलता देशमुख





सुधीर कारखानीस लिखित 'प्रतिबिंब' या पुस्तकाचे प्रकाशन पुणे येथे झाले. त्यासमयी श्रीधर देशपांडे, सुभाषचंद्र लेले, डॉ. वासुदेव भागवत आणि लेखक सुधीर कारखानीस



पुरुषोत्तम गावंडे लिखित 'डोळियांचा डोळा' या पुस्तकाचे प्रकाशन यवतमाळ येथे झाले. त्यासमयी लेखक पुरुषोत्तम गावंडे, कवी ज्ञानेश वाकुडकर, माजी कुलगुरू डॉ. भालचंद्र चोपणे, वामनराव गावंडे आणि सुदेश हिंगलासपूरकर



नीता चापले लिखित 'क्रिकेटच्या ऐश्वर्या' या पुस्तकाचे प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्यासमयी नेहा पेंडणेकर, नितीन चापले, सुदेश हिंगलासपूरकर, लेखिका नीता चापले आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

नितीन चापले, लेखिका नीता चापले, शिक्षणमंत्री विनोद तावडे, तेजस चापले आणि सुदेश हिंगलासपूरकर


सुदेश हिंगलासपूरकर, तेजस चापले, भाजप मुंबई शहर अध्यक्ष आमदार आशिष शेलार, लेखिका नीता चापले, नितीन चापले आणि धनश्री धारप





RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.

Postal Registration No. MCW/310/2016 -2018
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. १, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.